# माणूस

शनिवार । १५ मे १९७६ । एक रुपया

दरसाल पॅरिसला नाटकांचा हंगाम
सुरू झाला की प्रेक्षक विचारतात,
‘ यंदा अनुईचं कोणतं नाटक आहे ?’
‘ कधी आहे ?’
‘ कोणत्या थिएटरला आहे ?’
आणि मग त्या थिएटरवर जत्रा भरावी
तशी प्रेक्षकांची नुसती झिम्मड !

एक विशेष लेखमाला
चि. त्र्यं. खानोलकर स्मृतीनिमित्त

## माणूस
## वर्षारंभ अंकापासून

लेखक
प्रा. शांताराम शिंदे

साप्ताहिक माणूस

वर्ष पंधरावे – अंक : एकूणपन्नासावा (५०)

१५ मे १९७६

मूल्य : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
◻
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
◻
प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
◻
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
◻
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
◻
दूरध्वनी : ४३४५९
◻

# काळोखात बुडालेले पुण्याचे बालगंधर्व रंगमंदिर

शिरीष सहस्रबुद्धे

पुण्याचं बालगंधर्व रंगमंदिर हे केवळ पुण्याचंच नव्हे, तर उभ्या महाराष्ट्राचं एक सांस्कृतिक गौरवस्थान होऊन राहिलं आहे. पुणे महानगरपालिकेनं बांधलेलं हे सुसज्ज नाट्यगृह आशियातलं तिसऱ्या क्रमांकाचं आहे, असा अभिमान पुणेकर नेहमीच मिरवीत आलेले आहेत. या भव्य आणि वैभवशाली वास्तूत उत्तमोत्तम नाटकं पाहण्याची सवय रसिकांना गेली अनेक वर्षे जडलेली आहे. पद्मश्री पु. ल. देशपांडे यांच्या पुढाकारानं आणि कै. आचार्य अत्रे व इतर मान्यवरांच्या पाठिंब्यानं उभारल्या गेलेल्या या रंगमंदिरासाठी, महापालिकेनं छत्तीस लाख रुपयांहूनही अधिक खर्च केला आहे. आणि मुख्य म्हणजे, पुण्याची शान असणारं आणि 'नाट्यं भिन्नरुचेर्जनस्य बहुधाप्येकं समाराधनम्' अशी कालिदासकृत बिरुदावली मिरवणारं हे प्रशस्त रंगमंदिर म्हणजे आपल्या एका प्राणप्रिय नटश्रेष्ठाचं जिवंत स्मारक आहे!

–हे सगळं खरं आहे, आणि तरीही हेसुद्धा तितकंच खरं आहे की, अशा या रंगमंदिराच्या अस्तित्वावरच– त्यातल्या मूळ उद्देशांवरच– आज एका विलक्षण संकटाचं सावट आलेलं आहे. हे सावट म्हणजे सध्या गाजत असलेलं 'बालगंधर्व–बहिष्कार प्रकरण'. पुणेकरांना हे निश्चितच ठाऊक आहे आणि तरी दुर्दैव असं की, या प्रश्नासंबंधी अपेक्षित तेवढी आस्था– आपुलकी आणि जागृती पुणेकरांत दिसत नाही. ती असती तर, ही सार्वजनिक महत्त्वाची समस्या अशी भिजत घोंगड्यासारखी रेंगाळत पडलीच नसती.

होऊ नये ते झालं आहे खरं. बालगंधर्व रंगमंदिर हे विशुद्ध कलास्थान न राहता, राजकारणी डावपेचांच्या थंड्या कुस्तीचा आखाडा होऊ पाहत आहे. हा संघर्ष आहे, तो प्रामुख्यानं नाट्यव्यावसायिकांचं प्रतिनिधित्व करणारा नाट्यनिर्माता संघ आणि पुणे महानगरपालिका यांच्यात. तथापि सध्या तरी दोन्ही बाजूंनी हा प्रतिष्ठेचा प्रश्न केलेला दिसतो आणि म्हणूनच एक प्रकारचं थंडं युद्ध सध्या चालू आहे.

प्रश्न आहे तो हाच की, हा प्रश्न आता सोडवायचा कसा?

◻

बालगंधर्व रंगमंदिर १९६८ मध्ये बांधून पूर्ण झाले. यासाठी प्रारंभी भांडवली खर्च रु. ३६, ६२, ६२५ एवढा होता आणि त्यांपैकी सुमारे २२ लाख रु. हे कर्जाऊ स्वरूपात होते. एवढा खर्च आणि कर्ज पत्करून महापालिकेनं ही जबाबदारी का घेतली?

या रंगमंदिराच्या संकल्पनेत आणि उभारणीत पुढाकार घेतलेले श्री. पु. ल. देशपांडे यांनी या प्रश्नाचं अतिशय समर्पक उत्तर दिलं. त्यांच्या मतानुसार याची तीन चार प्रमुख कारणं होतात. प्रथमतः, महापालिका जसं शहराचं सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता याची दक्षता घेते, त्याचप्रमाणे, नागरिकांच्या मानसिक आरोग्याचं रक्षण आणि संवर्धन करणं हेही महापालिकेचं एक कर्तव्य आहे. बालगंधर्वसारख्या सांस्कृतिक स्थळांची निर्मिती हा या कर्तव्याचाच एक अपरिहार्य भाग आहे. याच उद्देशानं सारसबागेसारख्या उद्यानांची उभारणी पालिकेनं केलेली आहे. शहराचं सौंदर्य हेही कारण महत्त्वाचं आहेच. दुसरं असं की, बालगंधर्व रंगमंदिर हे सांस्कृतिक चळवळींचं केंद्र मानलं जावं, अशी इच्छाही त्याच्या उभारणीमागे आहे. ते व्यापारी तत्त्वावर बांधलेलं नाही, व्यापारी नफ्याची अपेक्षा त्यापासून करता येणारही नाही. 'बालगंधर्व'चं तिसरं महत्त्व हे भावनात्मक आहे : कै. बाल-

गंधर्वांची ती स्मृती आहे. चौथं कारण व्यावहारिक आहे : पुणेकरांना उत्कृष्ट नाटयकृती सुसज्ज प्रेक्षागृहात पाहायला मिळाव्यात हा उद्देश आहे.

अशा भव्योदात्त पार्श्वभूमीवर सुरू झालेल्या या रंगमंदिराला एका समस्येचं स्वरूप, कधी, कसं आणि का प्राप्त झालं ?

या तीनही प्रश्नांचं उत्तर एका शब्दात द्यायचं झालं तर, 'भाडेवाढीमुळे' असं म्हणावं लागेल. बालगंधर्वच्या भाड्यात, शनिवार, रविवार व सुट्टीच्या दिवशी दर प्रयोगास शंभर रु. वाढ करण्यात आली, तर इतर दिवशी हे पन्नास रु वाढीव आकारण्यात येऊ लागले. स्थायी समितीनं केलेल्या या ठरावाला, महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकासमवेत, मनपाच्या सर्वसाधारण सभेने मान्यता दिली आणि दि. १ एप्रिल १९७६ पासून नव्या दराने भाडे आकारण्याचे ठरले. तिथे या प्रकरणाला प्रारंभ झाला असं म्हणता येईल. भाडेवाढीचा विचार हा तसा जानेवारी महिन्यातच सुरू झाला होता. दै. केसरीच्या दि. १८ जानेवारीच्या अंकात भाडेवाढीचे हे वृत्त सर्वात प्रथम प्रसिद्ध झाले. यानंतरच्या घटना काहीशा संदिग्ध स्वरूपाच्या आहेत. मुंबई येथील नाटयनिर्माता संघाच्या सभेनंतर संघाचे चिटणीस श्री. अनंत काणे यांनी काढलेल्या पत्रकात, महापालिकेवर 'सहानुभूतीशून्य दिरंगाईचा' आरोप केला आहे. भाडेवाढीची बातमी वृत्तपत्रातून कळताच, दि. २० जानेवारी व दि. २६ फेब्रुवारी ७६ रोजी आपण महापालिका आयुक्तांशी पत्रव्यवहार केला, तथापि भाडेवाढीसंबंधी अधिकृत पत्र आपणास मिळायला '७ मार्च ७६ उजाडला', असा श्री. काणे यांचा दावा आहे. आणि अशा प्रकारे मनपाकडून योग्य तो प्रतिसाद योग्य मुदतीत न मिळाल्याने संघाने, एप्रिल–मे–जून या तिमाहीतील आपले ७४ प्रयोग रद्द केल्याचे दि. ४ मार्च ७६ रोजी मनपास कळविले. याउलट, मनपाच्या स्थायी समितीचे अध्यक्ष श्री. हनुमान अमराळे यांनी अशा प्रकारचा काहीही पत्रव्यवहार झाल्याचा इन्कार केला. 'नाटयनिर्माता संघाने भाडेवाढीबद्दल कोणतीही चर्चा न करता, एकदम एकतर्फी बहिष्काराचाच मार्ग स्वीकारला.' असा आरोप श्री. अमराळे यांनी केला आहे.

नाटयनिर्माता संघाच्या या एकजुटीच्या कृतीचं थोडं स्पष्टीकरण केलं पाहिजे. 'बालगंधर्व'चं दर तीन महिन्याचं बुकिंग केलं जातं, तेव्हा पूर्वीपासूनच सुमारे ७०% तारखा या नाटयनिर्माता संघास एकमुठीने देण्यात येतात. कारण नाटयनिर्मात्यांची ही एक प्रमुख व प्रातिनिधिक संस्था आहे. या सर्व तारखांचे फेरवाटप नाटयनिर्माता संघाच्या अंतर्गत केलं जातं. यंदाही एक एप्रिल ते तीस जूनपर्यंतच्या तिमाहीतील ११९ तारखांपैकी ६३% म्हणजे ७४ तारखा संघास देण्यात आल्या होत्या व उरलेल्या ४५ तारखा स्थानिक संस्था व अन्य कार्यक्रमांना देण्यात आल्या होत्या. संघाचे आपल्या सदस्यांवर बरेच वजन असल्याने या एकमुखी बहिष्काराद्वारे संघ म. न. पा. पुढे काहीसा पेचप्रसंग उभा करू शकला. एवढेच नव्हे तर, बहिष्काराची तीव्रता वाढवून म. न. पा. ला शरण आणण्यासाठी, आपल्या सदस्येतरांनाही प्रलोभन व दडपण इत्यादी मार्गांनी, त्यांच्या ४५ तारखा रद्द करायला लावण्याचा खटाटोपही या संघाने केल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. प्रयोगाचा सर्व खर्च भरून देण्याचे आमिष किंवा 'गंधर्व'ला प्रयोग केल्यास मुंबईत कोठेही प्रयोग होऊ न देण्याची धमकी, असे मार्ग या बहिष्कारासाठी खरोखरच वापरले जात असतील, तर हे पवित्रे अतिशय निंद्य ठरतात.

नाटयनिर्माता संघ व स्थायी समिती यांची परस्परविरोधी निवेदने लक्षात घेता, भाडेवाढीनंतर त्यांच्यात झालेल्या विचारसंपर्कासंबंधीचं सत्य शोधून काढणं सोपं नाही, तथापि ते आवश्यकही नाही. एक गोष्ट निश्चितपणे ध्यानात येते की, आपणहून समक्ष इतरांच्या भेटी घेऊन वाटाघाटी करण्याचे प्रामाणिक व भरीव प्रयत्न, संघ किंवा म. न. पा. या दोघांपैकी कुणीच केले नाहीत. झाला असेलच तर तो शुष्क पत्रव्यवहार आणि त्यानंतर दोघेही आपापल्या एकतर्फी भूमिका स्वीकारून ठाम पावित्र्यात तेथेच राहिले– अजूनही परिस्थिती 'जैसे थे' अशीच आहे. उभयतांशीही संबंधित नसलेले श्री. पु. ल. देशपांडे यांनीच फक्त आपणहूनच महापौर श्री. थोरात व अन्य म. न. पा. अधिकाऱ्यांची भेट घेऊन मध्यस्थी केली. आणि तडजोडीने प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला. तथापि त्याला अद्याप तरी यश आल्याचे दिसत नाही. मराठी नाटयपरिषद या मध्यवर्ती संस्थेने तडजोडीसाठी आपले प्रतिनिधी पाठवावेत, अशी विनंती करण्यात आल्याचं कळतं. तथापि अजूनही त्या दिशेनं प्रगती नसल्यानं रंगमंदिरासंबंधीचं प्रश्नचिन्ह कायमच आहे.

'बालगंधर्व'ची भाडेवाढ यापूर्वी दि. १ एप्रिल १९७१ रोजी करण्यात आलेली होती. त्यानंतर पाच वर्षांनी होत असलेल्या ताज्या वाढीमागची कारणं कोणती आहेत ?

–या प्रश्नाच्या उत्तराविषयीही मनोरंजक मतभेद आढळून येतात. प्रथमतः पु. ल. देशपांडे यांच्याशी केलेल्या चर्चेत त्यांनी असं मत व्यक्त केलं की, 'नाटयव्यवसाय हा एक अतिशय तेजीत चाललेला व्यवसाय आहे अशा गैरसमजुतीने, वाहत्या गंगेत हात धुऊन घेण्याचा हा प्रकार आहे. रंगमंदिर तोटयात

## केवळ नाइलाज...एक बाजू

...आधीच वाढलेल्या खर्चात ही भाडेवाढ मान्य करणे हे निर्मात्यांच्या दृष्टीने अत्यंत नुकसानीचे होते....

निर्माता संघाचे विनंतिपत्र मिळाल्यानंतरही महिनाभरात पुणे महानगरपालिकेने निर्मात्यांशी कोणताही विचारविनिमय केला नाही. उलटपक्षी निर्माता संघाला पूर्णतः अंधारात ठेवून विनंतिपत्र मिळाल्यानंतर तब्बल एक महिन्याने भाडेवाढीचा ठराव मंजूर केला गेला... वाटाघाटीच्या मार्गाने प्रश्न सोडविण्याची निर्माता संघाची इच्छा असतानाही महापालिकेच्या नोकरशाहीने सहकार्याचा हात झिडकारला. अशा परिस्थितीत अत्यंत व्यथित अंतःकरणाने आणि प्रतिकूल आर्थिक परिस्थितीच्या रेटयामुळे, निर्माता संघाला तारखा न स्वीकारण्याचा खेदजनक निर्णय नाइलाजाने घेणे क्रमप्राप्त झाले.

चालू नये' हे रास्तच, परंतु व्यापारी तत्त्वावर नफ्याची अपेक्षाही केली जाऊ नये.' श्री. देशपांडे अर्थातच भाडेवाढीचे विरोधकच आहेत.

नाट्यनिर्माता संघाने भाडेवाढीविरुद्ध जो गदारोळ उठवला आहे, त्यांत रंगमंदिराच्या नफ्यातोटयाबद्दल अवाक्षरही उच्चारीत नाहीत. मात्र 'नाट्यव्यवसाय बहुश: तेजीत नाही; 'बालगंधर्व' मधले बहुसंख्य प्रयोग तर तोटयातच जातात,' असा त्यांचा दावा असून, त्याच्या समर्थनासाठी काही आकडेवारीही त्यांनी सादर केली आहे.

**यासंबंधी म. न. पा. चा दृष्टिकोन काय आहे ?**

'–बालगंधर्व' मधील बहुसंख्य प्रयोग तोटयात चालतात, हा दावा स्थायी समितीचे अध्यक्ष श्री. अमराळे यांना मंजूर नाही. 'तोटा होत असता तर, तर हे प्रयोग लावले गेलेच नसते. तेव्हा तोटा होत तरी नसावा किंवा तो इतरत्र भरून तरी निघत असावा' असं त्यांचं म्हणणं. 'तोटा सोसणाऱ्या निर्मात्यांना बेसुमार जाहिरातखर्च कसा परवडतो,' हा त्यांचा सवाल ! प्रश्न तसा मार्मिक आहे आणि 'व्यावसायिक चढाओढीमुळे' याखेरीज त्याचं काही उत्तर निर्मात्यांकडे असेलसं मला वाटत नाही. श्री. अमराळे यांचा आणखी एक मोठा आक्षेप आहे तो निर्मात्यांनी तिकिटांच्या दरात अलीकडेच जी वाढ केली आहे, त्याला 'तिकिटांचे दर सातचे साडेसात व पाचचे साडेपाच' करताना निर्मात्यांनी महापालिकेसही विचारले नाही वा प्रेक्षकांच्या खिशाचाही विचार केला नाही. अशा स्थितीत 'भाडेवाढीविरुद्ध आपणाला विश्वासात न घेतल्याची ओरड करण्याचा निर्मात्यांना काय हक्क आहे ?' असा एक रोकडा प्रश्न त्यांनी विचारला आहे. आणि तिकिटातील वाढीमुळे त्रासलेल्या आमजनतेचा भाडेवाढीला पाठिंबाच आहे, असाही दावा श्री. अमराळे करतात.

निर्मात्यांच्या दरवाढीसंबंधी नाट्यरसिकांत असंतोष आहे, हे नाकारता येणार नाही. नाट्यव्यवसायातील तेजीसंबंधी सामान्यजनांचे नाना समज–गैरसमज आहेत, आणि श्री. अमराळे यांचे विचार म्हणजे अशा सामान्य समजुतींचंच प्रतिबिंब वाटतं. सुमारे दोन महिन्यांपूर्वी मुंबईच्या 'दै. नवशक्ती'च्या एका रविवार आवृत्तीतील, 'भटक्याची भ्रमंती' या सदरात नाट्यव्यावसायिकांवर जी आगपाखड केलेली होती, तीसुद्धा सामान्य जनतेच्या समज–अपसमजांचीच अभिव्यक्ती म्हणता येईल अशी होती. नटांच्या वाढत्या नाइट्स्, तिकिटांतील दरवाढ इ. आर्थिक बाजूंशी, इतर काही गोष्टींची तर्कदुष्ट सांगड या टीकालेखात 'भटक्या'ने घातली होती. या सगळ्या कोलाहलापासून अलिप्तपणे विचार केला तर नाट्यव्यवसायाच्या दुर्बल आर्थिक बाजूचं जे दृश्य श्री. पु. ल. देशपांडे व नाट्यनिर्माता संघाचे प्रतिनिधी मांडतात, त्यात तथ्य असल्याचं लक्षात येईल. निव्वळ तिकिटांतील दरवाढ पाहून नाट्यव्यवसाय हा तेजीत चाललेला धंदा आहे असं विधान करणं धाडसाचं होईल. पहिली गोष्ट अशी की आज चहूबाजूंनी अनेकपट वाढलेली महागाई लक्षात घेता तिकिटांत झालेली पन्नास पैसे दरवाढ नाममात्रच ठरते. १९३९ मध्येही सर्वांत महाग दर पाच रु. होताच. आज १९७६ मध्ये तो फक्त अडीच पटीने वाढलेला आहे. उलट नाटकाच्या निर्मितीचा एकंदर खर्च मात्र प्रचंड प्रमाणात (नाट्यनिर्माता संघाचा २००% वाढीचा दावा अतिशयोक्त मानला तरी) वाढलेला आहे. याशिवाय या व्यवसायातली आर्थिक अस्थिरताही धोकादायकरीत्या वाढत चालली आहे. इंडियन नॅशनल थिएटर – आय. एन. टी. – च्या 'ती फुलराणी' चं यश चटकन नजरेत भरतं, पण त्याचवेळी त्यांच्या 'कौंतेय' किंवा 'कोंडी'-सारख्या अयशस्वी व नुकसानीत आणणाऱ्या नाटकांकडे दुर्लक्ष करणं अन्यायाचं होईल. तेव्हा निर्मात्यांच्या दरवाढीमुळे मनपाची भाडेवाढ समर्थनीय ठरते असं नाही, तथापि याबरोबरच हेही मान्य केलं पाहिजे की रंगमंदिर फायद्यात चाललेलं असूनही भाडेवाढ केली जात आहे, असा जो काही आभास नाट्यव्यावसायिक प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष निर्माण करीत आहेत, तोही पुरेसा विश्वसनीय नाही. श्री. हनुमान अमराळे यांनी दिलेल्या माहितीनुसार गेली पाच वर्षे रंगमंदिरापायी महापालिकेस हजारो रुपये तोटा सहन करावा लागत आहे; तो टाळण्यासाठीच केवळ नाइलाजाने ही भाडेवाढ करावी लागत आहे. निर्मात्यांनी दिलेली मागची आकडेवारी खरी मानायची, तर ही अधिकृत आकडेवारीही तितकीच – किंबहुना अधिकच – विश्वासार्ह ठरण्यास प्रत्यवाय नसावा.

ही झाली भाडेवाढीमधील मनपाची बाजू. तथापि यातही शंकेला जागा नाहीत असे नाही. पहिली गोष्ट म्हणजे या खर्चाच्या रकमेत, दरवर्षी सुमारे सव्वा लाख रुपयांचा कर्जफेडीचा हप्ता समाविष्ट केलेला आहे. याचाच अर्थ एकीकडे तोटा होत असला, तरी दुसरीकडे रंगमंदिराच्या उभारणीसाठी घेतलेले कर्ज, त्याच्या मिळकतीतूनच फेडले जात आहे. बरेचसे कर्ज याप्रकारे फिटत आल्याचे कळते. अशा स्थितीत या भाडेवाढीला पर्यायच नव्हता काय ?

---

## रंगमंदिर चालूच राहील...दुसरी बाजू

...गेल्या पाच वर्षांत केवळ नाट्यसंस्था व रसिक यांच्यासाठी आम्ही तोटा सहन केला. निर्मात्यांनी मात्र तिकिटांचे दर वाढवले....

निर्माता संघाव्यतिरिक्त, १७६५-७६ मध्ये, स्थानिक व इतर संस्थांनी ५३३ तारखांची मागणी केली, पण आम्ही त्यांना फक्त १२८ तारखा देऊ शकलो. एप्रिल ७६ ते जून ७६ च्या तिमाहीत संघाखेरीज इतर संस्थांनी १९६ तारखांची मागणी केली, परंतु आम्ही त्यांना ४२ तारखा देऊ शकलो. तेव्हा निर्माता संघाने जरी प्रयोग रद्द केले, तरी बालगंधर्व रंगमंदिर सातत्याने चालूच राहील.

नाट्यनिर्माता संघाने बहिष्काराचा निर्णय घेण्यापूर्वी आमच्याकडे कोणत्याही प्रकारची विचारणा केलेली नाही; अथवा आमच्याशी संपर्क साधला नाही. त्यांनी एकांगी निर्णय घेतलेला आहे. या परिस्थितीत यापुढे बालगंधर्व रंगमंदिर १००% खुलेपणाने तारखांचे अर्ज मंजूर करण्यास मुक्त राहील. नाट्यनिर्माता संघास त्यांच्या सोयीच्या ७०% तारखा देण्याचे बंधन यापुढे आमच्यावर राहणार नाही. ◻

तथापि याहीपेक्षा महत्त्वाचा प्रश्न आहे तो असा की, गेल्या पाच वर्षांतील ज्या चार लाख रु. तोटयामुळे हा भाडेवाढीचा प्रसंग ओढवला, तो तोटाही अपरिहार्यच होता काय ? हा तोटा सातत्याने का वाढत राहिला आणि तो कमी करणे अशक्यच होते का, याची कारणमीमांसा करून जरूर ती उपाययोजना करण्याचे प्रयत्न झाले का? की भाडेवाढ हाच तोटयावरील एकमेव रामबाण उपाय करण्यात आला ?

—अशा प्रकारचे कोणतेही प्रामाणिक प्रयत्न झाल्याचे दिसत नाहीत. स्वतः श्री. अमराळे हेही यावर कोणतेच समाधानकारक उत्तर देऊ शकत नाहीत. रंगमंदिराचे व्यवस्थापन समाधानकारक नसले तरीही तिथे तब्बल ३९ सेवक नेमलेले आहेत; ही संख्या आवश्यकच आहे काय, याची कसून तपासणी व्हायला हवी. अतिरिक्त सेवकवर्ग हेही प्रचंड मेंटेनन्स खर्चाचं एक महत्त्वाचं कारण असू शकेल. अन्यथा, 'बालगंधर्व' प्रमाणेच सुसज्ज असलेले 'रवीन्द्र नाटयमंदिर' हे मुंबईचं सरकारी नाटयगृह, जर कमी भाडयातही सुरळीतपणे चालविलं जाऊ शकतं, तर 'बालगंधर्व' लाच तोटा का व्हावा ?

'बालगंधर्व' कडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन 'कमर्शिअल' नाही, कलावादीच आहे, असं श्री. अमराळे बजावून सांगतात. ही गोष्ट सिद्ध करण्याचा भाडेवाढीशिवाय इतर कोणताच मार्ग त्यांना का सापडू नये ? दर वाढवून तोटा भरून काढणं अवघड नसलं; तरी ते न वाढवता जमाखर्चाचा मेळ घालणं अधिक विधायक झालं असतं. ◻

बालगंधर्व रंगमंदिराच्या या प्रश्नातली गुंतागुंत वाढली आहे, ती मनपा. व नाटयव्यावसायिक यांच्यातील अविश्वास व परस्परसामंजस्याचा अभाव यामुळे. दोघांच्याही एकमेकांविरुद्ध बऱ्याच तक्रारी आहेत.

मनपा. ची बाजू प्रथम पाहू.

श्री. अमराळे यांनी नाटयनिर्माता संघाची 'बालगंधर्व' मधील तारखांची मक्तेदारी व त्यामुळे झालेली त्यांची 'हम करेसो कायदा' वृत्ती यांचा आवर्जून उल्लेख केला. पहिल्यापासून सुमारे ७०% तारखा संघाला देऊन मनपा.नेच त्यांची मक्तेदारी निर्माण केली व आता ती डोईजड होऊ लागल्याचे त्यांनी सांगितले. तसेच या तारखांचे अंतर्गत वाटप होत असताना काही संशयास्पद गैरप्रकार व काळे व्यवहार होत असावेत असाही संशय घ्यायला जागा आहे, असेही त्यांच्याकडील ऐकीव बातम्यांवरून दिसते. एकमुखी व एकतर्फी बहिष्काराद्वारे जे दडपशाहीचे व अडवून शरण आणण्याचे धोरण संघाने सध्या अवलंबिले आहे, त्यावर श्री. अमराळे यांचा विशेष आक्षेप आहे.

नाटयव्यावसायिकांची नाराजी नेमकी कशात आहे ?

—त्यांची तक्रार आहे ती मुख्यतः व्यवस्थापनासंबंधी.

बालगंधर्व रंगमंदिराच्या प्रारंभकालात श्री. सबनीस हे म. न. पा. अधिकारी त्याचे व्यवस्थापक होते. नाटयविषयक ज्ञान व आस्था आणि कलाकारांविषयी आपुलकी या त्यांच्या गुणवैशिष्टयांबद्दल दुमत आढळले नाही. तथापि त्यांच्यानंतर त्या योग्यतेचा व्यवस्थापक रंगमंदिराला लाभला नाही, असंही एकमुखानं सांगितलं जातं. इथला व्यवस्थापक हा नुसता प्रशासक असून उपयोग नाही, तो शक्यतो नाटयक्षेत्रातलाच असावा,

## ही आकडेवारी...

याविषयी 'मनोरंजन' या संस्थेनं पुरवलेली आकडेवारी अशी :—

(अ) एक नवे नाटक उभे करण्यासाठी निर्मात्यास कमीत कमी रु. २५००० पासून सुमारे पाऊण लाख रु. इतका जास्तीत जास्त खर्च करावा लागतो.

(ब) मुंबईच्या संस्थेस पुण्याला येऊन बालगंधर्वात एक प्रयोग करायचा झाल्यास ते मुंबईतील प्रयोगापेक्षा बरेच खर्चिक पडते. अशा वेळी रु. ४०० रंगमंदिर भाडे, रु. ६०० जाहिरात (सुमारे), व रु. २०० किरकोळ (परवाना, तिकीट छपाई व विक्री, ब्लॉक्स वगैरे), रु. १००० ते १२०० वाहतूक (कलाकार व सामान यांची ने-आण) आणि सुमारे १२०० ते १८०० रु. कलाकारांचे वेतन (नाइट) असा एकूण खर्च किमान रु. ४००० तरी होतो तथापि काही निवडक प्रयोगांनाच रु. ४५०० पर्यंत उत्पन्न होते व बहुसंख्य प्रयोग सुमारे १५०० रु. पासून ३५०० रु. पर्यंतच उत्पन्न होत असल्याने तोटयात जातात.

(क) 'मनोरंजन' या संस्थेच्या व्यवस्थेखाली जानेवारी १९७६ मध्ये बालगंधर्वात ३१ नाटयप्रयोग झाले. यातील ५ प्रयोग 'लोकल कॅन्व्हासिंग' चे असल्याने तोटयाचा प्रश्न नव्हता. ३ प्रयोग हौशी नाटयसंस्थांचे होते, ते नुकसानीत गेले.

उर्वरित २३ व्यावसायिक नाटयप्रयोगांपैकी फक्त १० प्रयोगांत संस्थेस काही नफा होऊ शकला. या दहा प्रयोगांतही चार प्रयोग, 'ती फुलराणी' (आय् एन्. टी., मुंबई) या एकाच नाटकाचे होते व दोन प्रयोग 'गुंतता हृदय हे' (अभिजात, मुंबई) या एकाच नाटकाचे होते. ही दोन नाटके सर्वत्र लोकप्रिय आहेतच.

इतर संस्थांचे, राहिलेले १३ प्रयोग पूर्णपणे तोटयात गेले.

## —आणि हीसुद्धा आकडेवारीच...मनपा. ची

| वर्ष | जमा (रु.) | खर्च (रु.) | तोटा (रु.) |
|---|---|---|---|
| १९७१–७२ | ३,३४,७२१ | ३,७३,४२६ | ३८,७०५ |
| १९७२–७३ | ३,४१,२९७ | ३,९५,२४७ | ५३,९५० |
| १९७३–७४ | ३,४३,४०८ | ४,२३,३०० | ७९,८९२ |
| १९७४–७५ | ३,५८,१९६ | ४,९६,६१४ | १,३८,४९८ |
| १९७५–७६ | ३,३८,५०० | ४,६२,७९९ | १,२४,२९९ |
| एकूण | १७,१६,१२२ | २१,५१,४६६ | ४,३५,३४४ |

निदान हौशी, जाणकार व आस्थेवाईक असावा अशी अपेक्षा करणं चुकीचं नाही. यासाठी नाटकाशी संबंधित अशा सर्व बाजूंचे प्रतिनिधी समाविष्ट असलेली 'व्यवस्थापन सल्लागार समिती' नेमावी अशी स्वागतार्ह सूचना श्री. पु. ल. देशपांडे यांनी केली आहे, तिचा विचार व्हावा.

म. न. पा. व सेवकवर्ग यांची बेपर्वाई व नाट्यव्यावसायिकांची त्यामुळे होणारी पिळवणूक ही त्यांची दुसरी महत्त्वाची तक्रार. यासंबंधी रंगमंदिरातील एअरकंडिशनिंग प्लँटचं उदाहरण देता येईल. गेले नऊ महिने ही व्यवस्था बहुश: बंदच आहे आणि तरीही एकूण भाड्यात एअरकंडिशनिंगचा आकारही घेतला जातोच. मुंबईत अशा प्रकारे प्लँट बंद असेल, तर त्याचं भाडं निर्मात्याला परत केलं जातं, असं ऐकलं. याच धर्तीवर 'बालगंधर्व-मधील प्लँट बंद असलेल्या प्रयोगांचं प्लँटचं भाडं परत मिळावं', या निर्मात्यांच्या मागणीला योग्य तो प्रतिसाद अद्याप मिळालेला नाही. एअरकंडिशनिंग बंद असतानाही त्याचा आकार घेण्याचा हा मामला अजबच. एवढेच नव्हे तर, श्री. अमराळे यांनी याविषयी निर्मात्यांनी एकही अर्ज केला नसल्याचं ठासून सांगितलं, याचं आश्चर्य वाटलं. याखेरीज नाट्यप्रयोगानंतर कलाकारांची राहण्याची जी व्यवस्था रंगमंदिरात आहे, तिचेही भाडं दुप्पट करण्यात आलं आहे, त्यातील गैरसोयी मात्र दूर करण्यात आलेल्या नाहीत. विशेष म्हणजे भाडेवाढीबाबत खंबीर पावले उचलणारे म. न. पा. अधिकारी, रंगमंदिराच्या सुव्यवस्थित व्यवस्थापनाविषयी कोणतेही निश्चित धोरण ठरवू शकत नाहीत व आश्वासन देऊ शकत नाहीत! भाडेवाढ समर्थनीय ठरण्यासाठी, आवश्यक त्या सुधारणा घडविण्याची तयारी का नसावी? रंगमंदिराचे उत्पन्न अन्य काही मार्गांनी वाढवता येणार नाही का? याचाही विचार झाला पाहिजे. 'प्रेक्षागृहात ११०० खुर्च्या बसवणं सहज शक्य असताना फक्त ९८९ खुर्च्याच सामावल्या आहेत', या निर्मात्यांच्या विधानात तथ्य असल्यास, त्या दिशेनंही प्रगती व्हावी. कारण या मार्गानं निर्मात्यांचं उत्पन्न वाढलं, तर भाडेवाढीबद्दल तक्रारीचा सूर टिकणार नाही.

या व अशा इतर प्राथमिक दर्जाच्या व्यावहारिक सुधारणांबरोबरच काही मूलभूत धोरणात्मक बदलही व्हायला हवे आहेत. हे रंगमंदिर खऱ्या अर्थानं सांस्कृतिक चळवळींचं केंद्रस्थान व्हावं, या दृष्टीनं श्री. पु. ल. देशपांडे यांनी काही सूचना केल्या आहेत. त्यानुसार हौशी–प्रायोगिक नाट्यकलाकार आणि बालनाट्य-चळवळ यांना सक्रीय प्रोत्साहन दिलं गेलं पाहिजे. त्यासाठी त्यांनी काही विशेष सोयी–सवलती उपलब्ध करून द्याव्यात. उदाहरणार्थ, रविवार सकाळ व मोठ्या सुट्ट्यांतील सकाळच्या सर्व वेळा बालनाट्यासाठी राखीव ठेवाव्यात. प्रायोगिक-हौशी नाटके व बालनाट्ये यांना रंगमंदिराच्या भाड्यातही सवलत द्यायला हरकत नाही. सारांश, सध्याची समस्या ही केवळ शंभर रुपयांच्या भाववाढीपुरतीच मर्यादित न ठेवता, रंगमंदिराच्या स्वरूपात काही आमूलाग्र व विधायक परिवर्तन घडविण्याची एक संधी या दृष्टीनं या सर्वच गुंतागुंतीच्या प्रश्नोपप्रश्नांची समाधानकारक

## ही जाहिरात काय दर्शविते ?

मराठी नाट्यपरिषदेसारख्या संस्थेनं पोशाखी नाट्यसमेलनं भरवण्याबरोबरच अशा एखाद्या प्रश्नात आपण होऊन लक्ष घातलं, तर त्याचं स्वागतच होईल. तथापि नाट्यपरिषद आणि कलाकारही या प्रश्नात मूग गिळून बसलेले दिसतात. तेव्हा हा प्रश्न कलात्मक वगैरे नसून शुद्ध आर्थिक असल्याचंच दृश्य दिसतं.

नाटकाकडे पाहण्याच्या या निव्वळ धंदेवाईक दृष्टिकोनाचाच परिणाम या क्षेत्रातल्या गळेकापू चढाओढीत झालेला दिसतो. सध्या बालगंधर्व रंगमंदिरात नाटकं जवळजवळ बंदच असली, तरी संगीताचे ऑर्केस्ट्रा वगैरेसारखे कार्यक्रम मात्र अधूनमधून होत आहेत आणि यामुळे या समस्येला, 'हॅव्ज्' आणि 'हॅव् नॉट्स्' यांच्यातल्या उग्र संघर्षाचे स्वरूप निष्कारणच आणण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. वानगीदाखल, शनिवार दि. १ मे ७६ रोजी रात्री 'बालगंधर्व'मध्ये सादर झालेल्या, 'दास्तान–ए–मीनाकुमारी' या कार्यक्रमाची ही चिथवणीखोर जाहिरात :–

### काही झालं तरी बालगंधर्व रंगमंदिराची सर कुठंही येणार नाही

भव्य प्रासाद, रमणीय वातावरण, त्याची आलिशानता, ऐट, ऐश्वर्य, काही वेगळंच! पाऊल ठेवताक्षणी येणारा मोगऱ्याचा धुंद गंध, पाठीमागून आला मोगरेवाला अशी आर्त आरोळी, स्लीव्हलेस, बेलबॉटम इ. रंगीबेरंगी कमनीय इंद्रधनुष्यांतून ओथंबणाऱ्या इंटिमेटच्या सुगंधी वातावरणात एखाद्या 'दास्तान-ए-मीनाकुमारी' सारखा एका शापित राजकुमारीच्या जीवनावरील दर्जेदार कार्यक्रम. त्याची लज्जत काही औरच. बस्स यार, प्रोग्रॅम पाहावा, ऐकावा तर तो बालगंधर्व रंगमंदिरातच–

(केसरी व इतर दैनिके, दि. २८ एप्रिल ७६)

बालगंधर्व रंगमंदिराचं गुणगान करण्यासाठी मीनाकुमारीच्या कथाकारांची काहीच आवश्यकता नव्हती, ती गोष्ट सर्वश्रुत आहेच. आग विझवता येत नसेल तर गप्प राहावे, निदान त्यात तेल ओतू नये हा विवेकही फार थोड्यांना असतो. नाट्यरसिकांच्या या जाहिरातीवरच्या प्रतिक्रिया तीव्र प्रतिकूल होत्या. ◻

सोडवणूक करण्यात यावी. ◻

बालगंधर्व रंगमंदिराची ही दुर्दैवी समस्या उद्‌भवली, त्याला आज दोन महिने होऊन गेले. आजपर्यंतचं सर्वांगीण चित्र हे असं आहे. तडजोडीची विश्वासार्ह संभाव्यता अजून तरी दृष्टिपथात नाही. नाटचनिर्माता संघ व म. न. पा. या दोहोंच्या बाजू, शक्य तितक्या निःपक्षपातीपणाने मांडलेल्या आहेत. दोन्ही पक्षांचे दोष, ते करीत असलेल्या–केलेल्या–चुका वगैरे पाहता, कुणा एकाच्याच बाजूने अनुकूल कौल देणं कुणासही शक्य होईलसं वाटत नाही. नाटचव्यावसायिकांच्या कित्येक प्रश्नांची व आक्षेपांची समाधानकारक उत्तरं श्री. हनुमान अमराळे (अध्यक्ष, स्थायी समिती, म. न. पा.) देऊ शकलेले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. याउलट संघानं आपल्या ७४ तारखांच्या भरवशावर मोठ्या गुर्मीनं आणि म. न. पा. ला शरण आणण्याच्या फाजील विश्वासानं, पुरेसा विचारविनिमय न करता, एकतर्फी बहिष्कार पुकारला, ही त्यांची चूक आहे. उभयपक्षांनीही वाटाघाटीसाठी कोणताच सक्रीय पुढाकार घेण्याचा मोठेपणा दाखवला नाही, हेही कटू सत्य आहे. श्री. अमराळे यांनी तर यापुढे निर्माता संघाशी काहीही संपर्क न साधण्याचा व रंगमंदिर स्वतःच्या हिंमतीवर चालविण्याचा आततायी निर्णय जाहीर केला आहे. दरम्यान रंगमंदिरात, तुरळक संगीत-वजा (ऑर्केस्ट्रा इ.) कार्यक्रम सोडता शुकशुकाटच आहे. 'कोणत्याही परिस्थितीत रंगमंदिर तोटचात चालणार नाही', असं आश्वासन देणारे म. न. पा. आयुक्त श्री. गुप्ते रजेवर गेले आहेत आणि या ऐन मुट्टीच्या मोसमात रंगमंदिरात अंधार दिसतो. म. न. पा. व संघ दोघेही आपापल्या इरेला पेटून नाटचगृहाच्या अस्तित्वाशीच खेळत आहेत. ◻

लेखाच्या प्रारंभी म्हटल्याप्रमाणे, प्रश्न आहे तो हा की, हा पेच आता सोडवायचा कसा?

–केवळ भाडेवाढीचाच गुंता उकलायचा तर, ते तडजोडीनं किंवा एका बाजूच्या शरणागतीनं कदाचित यथावकाश शक्य होईलही. पण प्रश्नाची सर्वांगीण सोडवणूक करायची झाली तर, उभयपक्षांनी सामान्य-जनांचा विचार करणं, आणि ते होत नसल्यास जागृत लोकमताचा त्यांच्यावर दबाव येणं आवश्यक आहे. या सर्व प्रकरणात, नाटक व नाटचगृह हे दोन्ही ज्यांच्यासाठी आहे, त्या प्रेक्षकांचा विचार कोणीच करीत नाही; ही खेदाची गोष्ट आहे. मनपा व निर्माते यांच्या रस्सीखेचीत नाटक सर्वसामान्यांपासून अधिकाधिक दूर जात आहे. 'बहुसंख्य प्रयोग तोटचात जातात,' असा कांगावा करणारे निर्माते, या तोटचाचं कारण तिकिटांतील सरसकट दरवाढ हेच आहे, ही गोष्ट सोयिस्करपणे विसरतात. नाटक ही करमणूक महाग आहे आणि म्हणूनच गेल्या काही वर्षांत, निदान पुण्यातील सामान्य प्रेक्षक हा चित्रपटांकडे जास्त वळत असल्याचे दिसते. अशा स्थितीत सामान्यांची सहानुभूती निर्मात्यांना असणं कठीणच. गेली कित्येक वर्षे नाटचव्यवसायाला शासनाने करमणूक-करातून मुक्त ठेवलेलं आहे, त्यामागेही सर्वसामान्यांपर्यंत नाटक पोहोचविण्याचाच उद्देश आहे. तथापि तिकिटांतील दरवाढीमुळे तो विफल ठरत आहे. यात शासनाचेही हकनाक आर्थिक नुकसान असल्याने, सामान्य जनतेच्या वतीनं शासनानं, नाटकाच्या दरावर नियंत्रण घालण्यासारख्या कृती करून या प्रश्नात हस्तक्षेप करायला हवा. जाहिरातबाजीवर अवाजवी उधळपट्टी करून निर्माते तो खर्च प्रेक्षकांचे खिसे कापून वसूल करू म्हणतील, तर ते चालू देता कामा नये. जाहिराती हे फक्त एक उदाहरण झालं. असे अनेक अनावश्यक खर्च कमी करून निर्मात्यांनी प्रथम दरकपातीचा प्रयत्न करायला हवा. साडेसात व साडेपाच रुपये दराच्या पंचवीस रांगा व दोन रुपयाच्या दोन रांगा या हिशेबानं प्रयोग तोटचात जातील तर त्यात नवल काय?

तेव्हा प्रेक्षकांच्या जिवावर जगणाऱ्या कलाकारां व नाटचनिर्मात्या मंडळींनी या एकूण प्रकरणात त्यांच्याकडे उपेक्षेच्या दृष्टीनं पाहावं, हें शोभणारं नाही. त्याबरोबरच, नागरिकांकडून करआकारणी हे उत्पन्नाचं प्रमुख साधन असणाऱ्या महानगरपालिकेनं, बालगंधर्व रंगमंदिर हे स्थायी समिती किंवा म. न. पा. च्या खाजगी मालमत्तेपैकी नसून ती सार्वजनिक मालकीची महत्त्वाची वास्तू आहे आणि या सांस्कृतिक केंद्राचे आपण विश्वस्त आहोत, या गोष्टी लक्षात घेऊनच, आपल्या हट्टापायी पुणेकर नाटकांना वंचित होणार नाहीत, अशा बेतानं पावलं उचलावीत. उभय बाजूंनी आपली जबाबदारी आणि परिस्थितीचं गांभीर्य लक्षात घेऊन तडजोडीला त्वरित तयार झालं पाहिजे. हा प्रश्न अखेरीस तुम्हाआम्हा प्रेक्षकांच्या जिव्हाळ्याचा आहे, त्यांच्या प्रतिष्ठेचा नव्हे, हे त्यांना उमजलं तरच 'बालगंधर्व'ला आज चोहीकडून झाकोळून टाकणारा अंधार विरून जाईल.

हे घडलं पाहिजे. घडवलं पाहिजे! ◻ ◻


पूर्णिया

अनिल अवचट

किंमत : सहा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे ३०

# अविकसित जग

## नैरोबी परिषदेपुढील प्रश्न

वा. दा. रानडे

नैरोबी येथे 'अंक्टाड' परिषद चार मेपासून सुरू झाली असून चार आठवडे चालणार आहे. 'अंक्टाड' म्हणजे युनायटेड नेशन्स कॉन्फरन्स ऑन ट्रेड अँड डेव्हलपमेंट. (संयुक्त राष्ट्र संघटनेची व्यापार व विकास परिषद) जगातील श्रीमंत राष्ट्रे आणि गरीब राष्ट्रे यांच्यातील दरी बुजवून–निदान बरीच कमी करून–गरीब राष्ट्रांच्या व्यापारवाढीची व विकासाची योजना तयार करणे हा परिषदेपुढील मुख्य विषय आहे.

जगातील श्रीमंत राष्ट्रे व गरीब राष्ट्रे यांच्या विकासात फार मोठी तफावत आहे. एकचतुर्थांश राष्ट्रे श्रीमंत असून तीनचतुर्थांश गरीब आहेत. जगातील एकूण उत्पादनापैकी ९३ टक्के उत्पादन एकचतुर्थांश श्रीमंत राष्ट्रांमध्ये होते, तर तीनचतुर्थांश राष्ट्रे फक्त ७ टक्के उत्पादन करतात. विषमतेची दरी केवढी मोठी आहे याची यावरून कल्पना येईल. एकोणतीस देश विकासाच्या एवढ्याखालच्या पातळीवर आहेत की, गेल्या दहा वर्षांत तेथील लोकांच्या दरमाणशी उत्पन्नात कोणतीही वाढ झालेली नाही, चाळीस देशांवर चलनवाढ, मंदी, अन्नटंचाई यांचा फार गंभीर परिणाम झालेला आहे. कोकोसारखे एकच पीक किंवा एकाच खनिजाच्या निर्यातीवर ज्या राष्ट्रांची अर्थव्यवस्था अवलंबून आहे, त्यांच्या निर्यातीच्या उत्पन्नात भाव कमी झाल्याने निम्मी घट झालेली आहे. झांबियास ९० टक्के परकीय चलन तांब्याच्या निर्यातीपासून मिळते. तांब्याची किंमत १९७२–७४ या काळात टनाला १२०० पौंड होती. ती १९७५ मध्ये ५०० पौंडांपर्यंत खाली आली.

अविकसित राष्ट्रांनी आपल्यापुढे ठेवलेली विकासाची उद्दिष्टे तशी फार धाडसी किंवा अशक्य कोटीतली नाहीत. येत्या २४ वर्षांत म्हणजे या शतकाअखेर त्यांना आपले औद्योगिक उत्पादन ७ टक्क्यांवरून २५ टक्क्यांपर्यंत न्यावयाचे आहे आणि औद्योगिक मालाची निर्यात वीसपट वाढवावयाची आहे. पण ही उद्दिष्टे गाठणेही सोपे नाही. हा केवळ श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी भरून काढण्याचा प्रश्न नसून तांत्रिक ज्ञानाच्या बाबतीतील दरीही भरून काढावयाची आहे. आठ आफ्रिकन राष्ट्रांचा १९७० साली अभ्यास करण्यात आला असता त्यात असे दिसून आले की, या राष्ट्रांमध्ये दर दहा हजार लोकसंख्येमागे फक्त सहा इंजिनिअर व शास्त्रज्ञ हवे आहेत तर विकसित राष्ट्रांचे हेच प्रमाण दर दहा हजार लोकसंख्येमागे ११२ इंजिनिअर व शास्त्रज्ञ असे आहे. विकसित राष्ट्रांच्या पातळीला येण्यासाठी अविकसित राष्ट्रांना केवढा मोठा पल्ला गाठावा लागणार आहे याची यावरून कल्पना येईल.

तांत्रिक व औद्योगिक विकासासाठी अविकसित राष्ट्रांची मोठी गरज भांडवलाची आहे. घेतलेल्या कर्जाची मुदतीत फेड करणे त्यांना कठीण जात आहे. नवे कर्ज काढून जुने फेडावयाचे असा या राष्ट्रांचा प्रयत्न असतो. कर्जाच्या या वाढत्या बोजातून अविकसित राष्ट्रांना मुक्त कसे करावयाचे हा नैरोबी परिषदेपुढील महत्त्वाचा प्रश्न आहे. तो सुटणे विकसित राष्ट्रांच्या धोरणावर अवलंबून आहे. भरमसाठ व्याजे आकारणाऱ्या सावकारांची भूमिका त्यांनी घेतल्यास हा प्रश्न सुटण्यास मदत होणार नाही. कर्जाच्या अटी जाचक ठेवावयाच्या नाहीत आणि ऋणको राष्ट्राशी व्यापार वाढवून त्याची आर्थिक स्थिती सुधारून कर्जफेड करणे त्याला सोपे जाईल अशी परिस्थिती निर्माण करावयाची असे धोरण संपन्न राष्ट्रांनी स्वीकारावयास युनोच्या सभासद राष्ट्रांपैकी ७७ अविकसित राष्ट्रांनी एक गट स्थापन करून नव्या आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेची एक योजना तयार केली आहे. या गटात सुरुवातीला ७७ राष्ट्रे होती म्हणून ७७ राष्ट्रांचा गट या नावाने तो ओळखला जात असला, तरी आता या गटाची सभासद संख्या १११ झाली असून संयुक्त राष्ट्र संघटनेत त्यांचे बहुमत आहे. विकसित आणि विकसनशील राष्ट्रांत सध्या असलेला आर्थिक असमतोल दूर करणे हे या योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. याबाबत तपशीलात जाऊन काय करता येईल हे ठरविण्याच्या दृष्टीने नैरोबी परिषदेला महत्त्व आहे.

हे प्रश्न सोडविण्यासाठी नैरोबीला दोन दिशांनी प्रयत्न केले जाणार आहेत. एक प्रयत्न म्हणजे आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत वस्तूंच्या किमतीतील चढउतार थांबवून ते स्थिर राखणे. यासाठी वस्तूंचा राखीव साठा उभारण्याची योजना ७७ राष्ट्रांच्या गटाने सुचविली आहे. वस्तूंचे भाव घटले की, निर्यातीपासून मिळणारे उत्पन्न घटते ते घटू नये, बऱ्याच प्रमाणात स्थिर राहावे हा यामागील उद्देश आहे. पश्चिम युरोपातील राष्ट्रांची सामूहिक बाजारपेठ आणि आफ्रिका कॅरेबिअन समुद्र व पॅसिफिक महासागर विभागातील राष्ट्रे यांच्यात 'लोम करार' नावाचा एक करार झाला तो याच धर्तीचा आहे. या कराराचे महत्त्व हे की, अमेरिकेच्या खालोखाल महत्त्वाची बाजारपेठ म्हणून मानल्या जाणाऱ्या पश्चिम युरोपच्या सामूहिक बाजारपेठेतील राष्ट्रांना किमती स्थिर राखण्याच्या तत्त्वास अविकसित राष्ट्रांनी बांधून घेतले आहे. दुसरा प्रश्न कर्जफेडीचा. काही अविकसित राष्ट्रांना काही कर्जांची फेड करणे जवळजवळ अशक्यच आहे आणि इतर कर्जांच्या बाबतीतही कर्जफेडीची मुदत वाढवून घ्यावी लागेल.

पृष्ठ २६ वर

# त्याने कोणावर कधीही विश्वास ठेवला नाही



अलेक्झांडर सोल्झेनित्सिनलिखित ' फर्स्ट सर्कल ' या कादंबरीतील काही भाग (४)

स्टॅलिनची प्रत्येक कृती अर्थपूर्ण ठरावी, असं खरं तर त्यात होतं तरी काय? जर तरुण जोसेफनं असेच भुवया वर करून एखाद्याकडे पाहिलं असतं, तरीही तो अगदी असाच दिसला असता ना? पण त्या दिवसांत त्याच्या धारदार, विखारी नजरेला कुणीच घाबरत नसे, किंवा त्याच्या हालचालींमागचा भयंकर अर्थ सांगण्याचा कुणी प्रयत्नही करत नसे. पण जेव्हा काहींची डोकी उडवली गेली तेव्हापासून मात्र लोक आपल्या 'नेत्याच्या' प्रत्येक हालचालीचा अर्थ लावू लागले. त्यातून सूचित होणाऱ्या धमक्या, इशारे किंवा आज्ञा समजून घेऊ लागले. स्टॅलिनच्या जेव्हा हे लक्षात आलं, तेव्हा मग त्यानं स्वतःकडेच पाहायला सुरुवात केली आणि मग त्याला हेही कळून चुकलं की, आपल्या नजरेतही एक अर्थपूर्ण सूचकता असू शकते! आणि तेव्हापासून ह्या साऱ्या गोष्टी इतक्या जाणीवपूर्वक जोपासल्या की, लोकांवर त्याच्या नजरेचा आणखीनच भयंकर परिणाम होऊ लागला!

अखेर स्टॅलिननं आपल्या अत्यंत कठोर नजरेनं अबाकुमोव्हकडे पाहिलं, आणि आपल्या पाइपच्या दांड्यानं खुर्चीकडे यायला खुणावलं. अबाकुमोव्ह मनातनं आनंदला. घाईनं पुढं होऊन तिथल्या खुर्चीवर बसला.तसा तो खुर्चीच्या टोकावरच, केव्हाही उठून उभं राहता येईल, असाच बसला होता. स्टॅलिन आपल्या टेबलावरच्या कागदांकडे पाहतच राहिला.

'ठीक!'

वेळ आली होती. आता संभाषणाचा धागा पकडून कोणत्याही परिस्थितीत ते चालू ठेवणं हे गुपित अबाकुमोव्हला पुरतं ठाऊक होतं. अबाकुमोव्हनं घसा खाकरला आणि उत्साहपूर्ण स्वगत म्हणायला तो पुढे सरसावला. (स्टॅलिनच्या उपस्थितीत अबाकुमोव्हचा वाचाळपणा उफाळून येई आणि मग त्या भरात तो स्टॅलिनला अव्वाच्या-सव्वा आश्वासन देऊन टाकत असे. पण नंतर मात्र आपल्या ह्या मूर्खपणाबद्दल तो स्वतःलाच शिव्या मोजत बसे! आणि मग स्टॅलिन जरी जरा घुश्श्यात असला, तरी अबाकुमोव्हला आपल्या जिभेवर नियंत्रण ठेवता येत नसे. आणि मग त्याची आश्वासनंसुद्धा अधिकाधिक भयंकर होत जात!)

अबाकुमोव्हच्या रिपोर्टातला सर्वांत आकर्षक मुद्दा म्हणजेच त्याचा नेहमीचाच, विस्तृत प्रमाणावर विखुरलेल्या हेरांच्या आणि देशद्रोह्यांच्या वाईट वाईट गटांचा त्यानं लावलेला शोध! आणि ह्या शोधाकरताच केवळ स्टॅलिनला हा रिपोर्ट नेहमीच आवडत असे. दर वेळी (प्रत्येक वेळी नव्या-नव्या) गँगचा बंदोबस्त कसा करण्यात आला याचं वर्णन करायला अबाकुमोव्ह कधीच विसरत नसे. उदाहरणार्थ, आज त्यानं फ्रूंझच्या मिलिटरी अॅकॅडमीतल्या एका विरोधी गटाची कथा तयार केली होती आणि आता तो स्टॅलिनला हे पटवून देणार होता की, ह्या सर्वांचे तपशील पुरवायला त्याला बरेच दिवस लागणार आहेत.

पण आत्ता सुरुवातीला त्यानं स्वतः केलेल्या, टिटोच्या उच्चाटनाच्या यशस्वी प्रयत्नांचं वर्णन करायला सुरुवात केली ! (पण ते प्रयत्न खरोखरीच यशस्वी होतील किंवा नाही याचीही त्याला कल्पना नव्हती !) तो म्हणाला की, टिटोची बोट ब्रिओनी बेटाकडे जायला निघण्यापूर्वीच तिच्यावर एक टाईमबाँब ठवण्यात येईल. स्टॅलिननं चमकून वर पाहिलं आणि विझू लागलेल्या पाइपाचे त्यानं काही झुरके घेतले. त्यानं फक्त एवढीच गोष्ट केली आणि कसलीच उत्सुकता दाखवली नाही. पण अबाकुमोव्हला स्टॅलिनच्या वागणुकीबद्दल चांगली समज होती. म्हणूनच त्यानं मनोमन ओळखलं की, आपण योग्य मुद्द्याला हात घातला आहे. स्टॅलिननं विचारलं,

'पण रॅन्कोव्हिकचं काय ?'

नक्कीच ! नक्कीच ! ती सगळी चांडाळचौकडी रॅन्कोव्हिक, कार्देज, पिजेद, कशी काय एकदम उडवून देता येतील याचाच त्यांनी शोध घेतला पाहिजे. त्यांच्या अंदाजाप्रमाणे ही घटना येत्या वसंतऋतूच्या आतच घडेल. (अर्थात ह्या नियोजित स्फोटात त्या बोटीवरचे सारेच खलाशी ठार होतील ! पण असल्या तपशीलांशी अबाकुमोव्हला काही घेणं नव्हतं ! आणि 'खलाशांचा मित्र' स्टॅलिनला ह्या मरणाऱ्या खलाशांच्या संख्येत तर कोणतीच उत्सुकता नव्हती !)

मग थंड झालेल्या पाइपाचे झुरके घेत घेत आपल्या मंत्र्याच्या फुगीर नाकाकडे शून्य नजरेनं पाहणारा स्टॅलिन मनात विचार तरी कसला करत होता ? स्टॅलिन ज्या पक्षाचा नेता होता त्याची सुरुवातच मुळी, व्यक्तिगत हिंसाचाराला जाहीर तिलांजली देऊन झाली. पण हाही विचार आत्ता त्याच्या मनात नव्हता किंवा दहशतीचा वापर करून वरचं स्थान मिळवण्याच्या मार्गाबद्दलही त्याला कोणतीही शंका नव्हती. पाइपचे झुरके घेत घेत तो ह्या बेढब, तांबूस चेहऱ्याच्या, लालभडक कानाच्या, पाजी माणसाला—अबाकुमोव्हला—न्याहाळत होता. तेव्हाच स्टॅलिनच्या मनात गोळा होऊ घातलेले विचार, एखाद्या उत्साही, तत्त्वशून्य, लाचार कनिष्ठाला पाहून त्याच्या मनात होणाऱ्या प्रतिक्रियेसारखेच होते.

आपण अबाकुमोव्हवर विश्वास तरी किती टाकावा ? की त्याच्यापासून मुक्तता करून घेण्याची वेळ आली आहे ? या क्षणी तरी स्टॅलिनच्या मनात हे दोनच विचार प्रामुख्यानं रेंगाळत होते. स्टॅलिनला हे पक्कं ठाऊक होतं की, पंचेचाळीसमध्ये अबाकुमोव्हनं प्रचंड कमाई करून ठेवली आहे ! पण आजवर त्यानं वाट पाहिली आणि अबाकुमोव्हला शिक्षा करण्याचा मोहही आवरला. अबाकुमोव्ह 'असल्या प्रकारचा' माणूस आहे यातच स्टॅलिन खूष होता. लोभी लोकांची 'व्यवस्था' लावणं तर फारच सोपं असतं. भौतिक गोष्टींच्या मोहात जे पडत नाहीत, अशा (उदा. बुखारीन) लोकांच्या बाबतीत स्टॅलिन नेहमीच उदासीन असे. त्यांचं उद्दिष्टच त्याला समजू शकत नसे आणि त्यांची 'व्यवस्था' लावणं त्याला फारच जड जात असे.

स्टॅलिन अबाकुमोव्हचं व्यक्तिमत्त्व एखाद्या पुस्तकासारखं वाचू शकत असला, तरी त्याचा त्या माणसावर विश्वास नव्हता. लोकांवरचा अविश्वास हेच जोसेफ स्टॅलिनच्या व्यक्तिमत्त्वाचं प्रमुख वैशिष्ट्य होतं. त्याची जीवधारणा तेवढी एकच होती.

त्यानं स्वतःच्या आईवर कधी विश्वास ठेवला नाही. तरुणपणी देवळात जाऊन ज्याच्यापुढे तो नतमस्तक होत असे, त्या देवावरही त्यानं विश्वास ठेवला नाही.

स्वतःच्या पक्ष-सहकाऱ्यांवरही त्याचा विश्वास नसे. (विशेषतः जे खंदे वक्ते आहेत त्यांच्यावर तर त्याचा मुळीच विश्वास नव्हता !)

आपण स्वतः सक्तीनं कामाला लावून मग त्यांच्यावर नजर ठेवल्याखेरीज, शेतकरी बियाणं पेरतील आणि गव्हाचं पीक काढतील-यावरही त्याचा मुळीच विश्वास नव्हता.

हद्दपारी भोगणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांवर त्याचा विश्वास नव्हता. उत्पादनाचे लक्ष्य लादल्याशिवाय कामगार काम करतीलच, यावरही त्याचा विश्वास नव्हता.

एखादं उद्दिष्ट खच्ची न करता, त्याची परिपूर्ती बुद्धिवादी करतीलच यावर त्याचा विश्वास नव्हता. युद्धक्षेत्रावर सुरक्षापथक आणि 'पीनल बटालिअन्स' असल्याखेरीज सैनिक किंवा जनरल्स लढतील, यावरही त्याचा विश्वास नव्हता.

आपले नातेवाईक, आपल्या बायका आणि आपल्या रखेल्या यांच्यावरसुद्धा त्यानं कधीच विश्वास ठेवला नाही.

आपल्या मुलांवरही तो विश्वासून राहिला नाही. (आणि नंतर तो किती बरोबर ठरला !)

आपल्या प्रदीर्घ पण संशयभऱ्या आयुष्यात त्यानं फक्त एकाच व्यक्तीवर विश्वास ठेवला.

तोच माणूस, ज्यानं अवघ्या जगाला दाखवून दिलं की, त्याला स्वतःची कुवत ठाऊक होती.

कोणती माणसं आवडावी आणि कोणाचा द्वेष करावा, माघार कधी घ्यावी नि आपल्या शत्रूला मैत्री कधी देऊ करावी याचं सदैव भान होतं.

हाच माणूस, ज्याच्यावर स्टॅलिनचा पूर्ण विश्वास होता तो म्हणजे 'अॅडॉल्फ हिटलर !'

हिटलरनं जेव्हा पोलंड, फ्रान्स, बेल्जिअम पादाक्रांत केला आणि त्याची बाँबफेकी विमानं खुद्द इंग्लंडवर घिरट्या घालू लागली तेव्हाच स्टॅलिननं मनोमन त्याची प्रशंसा केली आणि एक मत्सरी आनंदानं तो पुलकित झाला !

घाबरलेला मोलोटोव्ह बर्लिनहून परत आला. हिटलर आपल्या फौजा पूर्वेकडे वळवत आहे अशा वार्ता येऊन ठेपल्या. हेसनं इंग्लंडला धाव घेतली आणि चर्चिलनं स्टॅलिनला प्रतिहल्ला चढवण्याचा इशारा दिला. बायलो-रशियातला प्रत्येक डोमकावळा आणि गॅलिशियातली झाडंझुडपंदेखील युद्धाच्या गर्जना करू लागली. येणाऱ्या प्रत्येक दिवशी रशियातल्या प्रत्येक बाजारपेठेत, प्रत्येक कामगार-स्त्री युद्धाचं भविष्य वर्तवू लागली. फक्त स्टॅलिनच तेवढा, ह्या सर्व गदारोळात, अविचल राहिला.

तरीही त्याचा हिटलरवर विश्वास होता !

हा विश्वास त्याला चांगलाच महागात पडला. त्याच्या बदल्यात त्याला आपल्याच आयुष्याची किंमत चुकवावी लागली. यापुढे कोणाकोणावरच विश्वास न ठेवायला त्याचा मृत्यू हे कारण त्याला पुरेसं होतं.

¤

तिथल्या त्या विषारी संशयास्पद वातावरणात राहण्यापेक्षा अबाकुमोव्हला मृत्यू परवडला असं वाटू लागलं. त्या मूर्ख पेट्रो

पॉपिवोचकडून टिटोविरोधी लेख लिहून घ्यायचे काम करण्याचाच आता त्याला कंटाळा आला ! कुठलीही कामगिरी पार पाडण्यासाठी माणसाचा प्रचंड ताफा अबाकुमोव्हच्या हाताशी हजर होता. आत्ताच्या परिस्थितीत टिटोच्या खुनाचा कट यशस्वी होईल किंवा नाही हे सांगणं फार कठीण होतं. आणि असल्या घाणेरड्या क्लृप्त्या योजण्याच्या तर तो पूर्ण विरुद्ध होता.

पण अबाकुमोव्ह आपल्या बॉसला पुरता ओळखून होता. त्याच्यासाठी सर्व ताकद पणाला लावून कुठलंही काम करणं हे सुद्धा जीवावर बेतणार होतं. स्टॅलिनला अपयश जसं मान्य नसे तसंच फार कौशल्यानं काम करणाऱ्याच्याही तो विरुद्ध असे. म्हणूनच अबाकुमोव्हला या दोन्हींतला सुवर्णमध्य साधावा लागे. अपयश आणि कुशलता ह्या दोन्ही गोष्टी त्याला आपल्या प्रत्येक क्षेत्रातील सर्वोच्चतेला आव्हान देणाऱ्या भासत असत. त्याच्याशिवाय कोणालाही पूर्णत्वाला पोहोचू दिलं जात नसे.

म्हणूनच अबाकुमोव्ह अर्ध्यामुर्ध्या उत्साहानंच काम करीत असे. मिडास राजा जसं हात लावील त्याचं सोनं करीत असे, तसंच स्टॅलिनसुद्धा आपल्या स्पर्शात सगळ्या गोष्टी भिकार करून सोडत असे. आज मात्र अबाकुमोव्हला वाटलं की, स्टॅलिन जसजसा त्याचा रिपोर्ट ऐकत गेला, तसातसा स्टॅलिनचा चेहरा उजळतही होता. टिटोच्या खुनाच्या कटाचं विस्तारानं वर्णन करून झाल्यावर अबाकुमोव्ह फ्रूंझ ॲकॅडमी आणि थिऑलॉजिकल ॲकॅडमी असल्या विषयाकडे झटकन वळला. स्टॅलिन काहीतरी आठवू पाहत होता. क्षणभर त्याच्या कपाळावर ठळक आठ्या पडल्या. त्याच्या भल्या मोठ्या नाकपुड्या थरथरल्या. मग त्यानं आपली भेदक नजर अबाकुमोव्हवर स्थिर केली. (मंत्रिमहाशय अबाकुमोव्ह, शक्य तितका निष्पाप आणि प्रामाणिकपणाचा आविर्भाव दाखवण्याचा प्रयत्नात राहिला !) पण निश्चितच तो निसटता विचार स्टॅलिन पुन्हा पकडू शकला नाही. त्याच्या कपाळावरच्या आठ्या जणू त्याचा मानसिक गोंधळच दाखवत होत्या.

स्टॅलिननं एक निश्वास टाकला.

मग आपला पाईप भरला आणि पेटवला.

'हं बरोबर !'

पहिला झुरका घेताच त्याला काही तरी आठवलं. पण आताही एक किरकोळ आठवण होती. तो काही मुख्य विचार नव्हता.

'गोमुल्काचं काय ? त्याला अटक केलीत ?

पोलंडमध्ये गोमुल्काला त्याच्या सर्व पदांवरून हाकलण्यात आलं होतं आणि आता तो आपल्या भीषण भवितव्याकडेच नेला जात होता. 'होय ! गोमुल्काला पकडण्यात आलं !'

अबाकुमोव्हनं बसल्या जागेवरून किंचित उठल्यासारखं करूनच हे उत्तर दिलं. (खरं तर गोमुल्काच्या अटकेची बातमी त्यानं स्टॅलिनला कधीच सांगितली होती !) लोकांना पकडणं हा अबाकुमोव्हच्या खात्याच्या हातचा खेळ होता !

स्टॅलिननं टेबलावरचं एक बटण दाबलं. भिंतीवरचे दिवे उजळले आणि खोली प्रकाशानं भरून गेली. स्टॅलिन बसल्या जागेवरून उठला आणि पाईपचे झुरके घेत घेत येरझारा घालू लागला. अबाकुमोव्ह समजला की, आता चौकशी संपली आहे आणि बॉस आता सूचना सांगायला सुरुवात करील. भल्यामोठ्या नोटपॅडचं पान त्यानं उघडलं, पेन बाहेर काढलं आणि पॅड मांडीवर ठेवून लिहून घेण्याची तयारी केली. (आपल्याला काय सांगायचंय ते लोकांनी लिहून घ्यावं हे 'नेत्याला' आवडत असे !)

पण स्टॅलिन मात्र पाईप ओढत ओढत शांतपणे येरझारा घालतच होता. अबाकुमोव्हला जणू तो विसरला होता. देवीच्या वणांनी भरलेला त्याचा करडा चेहरा अगदी आक्रसून गेला होता. तो काहीतरी आठवण्याचा कधीचाच प्रयत्न करत होता. तो जेव्हा अबाकुमोव्हच्या बाजूनं गेला, तेव्हा आपल्या नेत्याचे खांदे वाकल्याची अबाकुमोव्हला जाणीव झाली आणि त्यामुळेच तर, स्टॅलिन आणखीनच बुटका आणि खुजा दिसत होता. अबाकुमोव्हला असं निश्चित वाटत होतं की, ह्या 'म्हाताऱ्याची' आता पुरती दहा वर्षंही या जगात उरली नाहीत ! पण अबाकुमोव्ह असले विचार नेहमीच दडवून टाकी ! कारण समजा आपल्या मनातल्या विचारांची नोंद करणारी एखादी गुप्त सामग्री भिंतीमध्ये दडवून ठेवण्यात आली असलीच तर ! त्याला वाटलं, 'जितकं लवकर–तेवढं बरं.' निदान त्याचं आणि त्याच्या सर्वोच्चपदावरील सहकाऱ्यांचं पुढचं आयुष्य तरी सुसह्य आणि सुखदायक होईल !

स्टॅलिनला पुन्हा एकदा विस्मृतीचा झटका आला होता. त्याचं मन त्यालाच मानायला तयार नव्हतं. अबाकुमोव्हला विचारायच्या प्रश्नांची नोंद त्यानं मघाशी बेडरूममधून ह्या अभ्यासिकेत येतानाच आपल्या मनातच करून ठेवली होती. पण आता तो ते सारंच विसरला होता. तो इतका अगतिक झाला की, आठवण्यासाठी तो आपल्या मेंदूला ताण द्यायलाही असमर्थ होता.

त्यानं झटक्यात आपलं तोंड वळवलं. समोरच्या भिंतीवर लक्ष केंद्रित केलं आणि मग त्याला आठवलं ! पण ही काय त्याला मघाशी आठवायची होती ती आठवण नव्हती. दोन रात्रींपूर्वी तो क्रान्तीच्या संग्रहालयात गेला असता, त्याला आठवू न शकलेली आणि तेव्हापासून मनात सलणारी ती घटना होती.

–ती घटना सदतीसमधली. क्रान्तीचा विसावा वर्धापनदिन होता तो. तोवर क्रान्तीच्या इतिहासाचा अर्थ लावताना इतके बदल झालेले स्टॅलिनला दिसले ! मग स्वतःच जातीनं क्रान्तीच्या वस्तुसंग्रहालयाला भेट द्यायचं स्टॅलिननं ठरवलं ! त्यांनी काही मूर्खागत चुका तर केल्या नाहीत ना, हेच त्याला तिथं पाहायचं होतं ! एका खोलीच्या दारातून (जिथे आता तो प्रचंड टेलिव्हिजन सेट ठेवण्यात आला होता) त्यानं जेव्हा समोरच्या भिंतीवर लावलेली झेल्याबोव्ह आणि सोफिया पेरोवस्काया यांची दोन प्रचंड पोर्ट्रेट्स् पाहिली तेव्हाच त्याचे डोळे खाडकन उघडले. जनता पक्षातले ते दोघे दहशतवादी होते आणि त्यांनीच दुसऱ्या अलेक्झांडरची हत्या केली ! त्यांचे सताड उघडे डोळे अगदी निर्भय दिसत होते ! विजयोन्मादानं चमकत होते ! त्या खोलीत प्रवेश करणाऱ्या प्रत्येकाच्या अंगावर जणू ते वसकन ओरडत होते,

'ह्या जुलूम करणाराला ठार मारा !'

ह्या आदर्श क्रान्तिकारांना बघताक्षणीच एखाद्या बाणाने भोसकल्यासारखी स्टॅलिनची वाचाच बसली. स्टॅलिन बाजूला झाला. तो काहीतरी गुरगुरला, खोकला आणि मग आपल्या थरथरत्या बोटांनी

स्थान त्या चित्रांकडे निर्देश केला. ती चित्रं ताबडतोब काढून टाकण्यात आली आणि त्याचबरोबर क्रान्तीच्या स्मृती म्हणून जपून ठेवलेले, दुसरा अलेक्झांडर खुनाच्या वेळी ज्या गाडीतून गेला होता तिचे अवशेषदेखील लेनिनग्राडच्या पॅलेसमधून हलवण्यात आले आणि तेव्हापासूनच स्टॅलिननं स्वतःसाठी असंख्य निवासस्थानं आणि आश्रयस्थानं निरनिराळ्या जागी बांधून घेतली. तेव्हापासूनच त्याला गजबजलेल्या शहरी जीवनाचा उबग आला आणि मॉस्कोजवळच्या बंगल्यात तो राहू लागला. तिथल्या त्याच्या संरक्षकांच्या निवासस्थानाला अगदी लागून असलेल्या ह्या सुरक्षित अभ्यासिकेत स्टॅलिन आपलं उर्वरित आयुष्य व्यतीत करू लागला.

जसजसे अधिकाधिक लोक तो ठार करत गेला तसतशी त्याला आपल्याच जीवाची भीती वाटू लागली. आपल्या स्वतःच्या संरक्षकव्यवस्थेत नवीन नवीन सुधारणा काय करता येतील याचा विचार करण्यातच स्टॅलिन सदैव गुरफटलेला असे. उदाहरणार्थ, पहारा करणाऱ्या व्यक्तींची नेमणूक पहाऱ्याच्या फक्त तासभर आधी करण्याचा नियम, पहाऱ्यावरचे सैनिक वेगवेगळ्या बराकीतूनच निवडणे! त्यामुळे त्यांचा अजीबात पूर्वपरिचय नसतो! शिवाय ते चोवीस तासांहून अधिक काळ एकत्र राहू शकत नाहीत! आणि त्यामुळेच ते कोणताही कट करण्याची शक्यता नसते! त्याच्या राहत्या बंगल्याची रचना एखाद्या चक्रव्यूहासारखी केली होती. तो त्यानं खास स्वतःच्या मार्गदर्शनाखाली बांधून घेतला होता! बंगला एकाबाहेर एक अशा तीन संरक्षक भिंतींनी वेढला होता आणि त्या भिंतींची दारं समोरासमोरही येत नव्हती. तिथं झोपण्याच्या असंख्य खोल्या होत्या. रात्रीची विश्रांती घेण्याआधी फक्त थोडा वेळ स्टॅलिन आज आपणाला कोणती खोली झोपण्यासाठी तयार ठेवायची त्याबद्दल सूचना देत असे!

स्वतःच्या संरक्षणासाठी काळजीपूर्वक उभारलेली यंत्रणा, हे स्टॅलिन आपल्या भ्याडपणाचं लक्षण तर मुळीच समजत नसे. पण त्या साऱ्यांतून त्याची चांगली समज व्यक्त होत असे. पण वस्तुस्थिती अशी होती की, ह्या माणसाची सुरक्षितता, मानवी इतिहासाच्या दृष्टीनं फार फार महत्त्वाची होती! भले जरी इतर लोक त्याकडे अशा दृष्टीने न पाहोत! स्टॅलिननं खेड्यातल्या आणि शहरातल्या सर्व कनिष्ठ पुढाऱ्यांना, संरक्षक-व्यवस्थेबाबतचं, आपलं उदाहरण गिरवायला सांगितलं होतं. संरक्षकांशिवाय अगदी स्वच्छतागृहात जायचीदेखील त्यांना बंदी होती. आणि विशेष ओळखू न येणाऱ्या तीन तीन मोटारींच्या ताफ्यातूनच प्रवास करायची त्यांच्यावर सक्ती होती. ¤

आता ह्या क्षणी म्युझियममधल्या त्या पोर्ट्रेट्सची आठवण झाल्यावर स्टॅलिन त्या खोलीच्या मध्यावरच अंमळ थांबला आणि आपल्या हातात पाईप हवेत उंचावत त्यानं अबाकुमोव्हला विचारलं,

'पक्षाच्या अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी तुम्ही काय करताय?'

जेव्हा स्टॅलिननं आपली मान किंचित कलवूनच विचारलं तेव्हा त्याच्या नजरेत एक अनिष्टसूचक भावना चमकली.

हातातलं नोटपॅड सावरतच अबाकुमोव्ह अर्धामुर्धाच उभा राहिला. (तो सरळ उभा राहिला नाही! लोकांनी शांत बसून राहिलेलंच स्टॅलिनला आवडत असे!) आणि मग ह्या अगदी अनपेक्षित विषयावर गडबडीनं बोलू लागला. स्टॅलिनच्या भेटीत असे वरचेवर घडत असे. आणि जराशा टाळाटाळीचा स्टॅलिन 'वाईट हेतू' असाच अर्थ लावत असे!

'मार्शल! आम्ही त्यासाठीच तर आहोत!' स्वतःच्या भावना दुखावल्यासारखा अबाकुमोव्हच्या आवाजाला कंप सुटला. तो पुढे म्हणाला, 'मार्शल, तुम्ही शांतचित्तानं कार्य करावंत! चिंतन करावंत! आणि देशाचं भवितव्य घडविण्यासाठी मार्गदर्शन करावंत! आणि हे करण्यासाठी तुमच्या सुरक्षिततेला जपावं हेच तर माझ्या खात्याचं काम आहे!' (स्टॅलिननं जरी पक्षातल्या अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेबद्दल विचारलं असलं तरी तो ते स्वतःच्या संदर्भातच विचारत आहे, हे अबाकुमोव्हला पुरतं ठाऊक होतं!)

'सर्व प्रकारच्या तपासण्या केल्याशिवाय आणि संशयितांना पकडल्याशिवाय माझा एकही दिवस जात नाही!'

कलत्या मानेनं तिथेच एखाद्या डोमकावळ्यासारखा उभा राहिलेल्या स्टॅलिननं अबाकुमोव्हकडे रोखून पाहिलं आणि तो गंभीरपणे म्हणाला,

'मला एकच सांग, अजूनही आपल्याकडे दहशतवादात सापडलेल्यांची प्रकरणं पुढे येतात काय?'

अबाकुमोव्हनं एक निश्वास टाकला.

'अशी प्रकरणं आपल्याकडे आता शिल्लक नाहीत असं तुम्हाला सांगायला, मार्शल मला खरोखरीच आनंद वाटला असता! पण ती तशी अद्याप आहेतच!'

स्टॅलिननं आपला एक डोळा मिटून घेतला. तरीही त्याचा दुसरा डोळा खुशीत चमकलाही

'ही चांगली गोष्ट आहे! म्हणजे तुम्ही तरी तुमच्याकडून प्रयत्नाची शर्थ करता आहात!'

नेता उभा असताना आपण बसूनच बोलणं अबाकुमोव्हला बरं वाटेना. म्हणून तो खुर्चीवरून थोडासा उठला आणि म्हणाला,

'आम्ही अशी प्रकरणं फारशी चिघळू देत नाही! आम्ही त्याचा पूर्वावस्थेतच निकाल लावून टाकतो! आणि एकोणिसाव्या कलमाखाली त्यांना शिक्षाही करून टाकतो!'

'छान! फार छान!'

स्टॅलिन प्रोत्साहन देणाऱ्या आवाजात म्हणाला आणि त्यानं अबाकुमोव्हला बसायला सांगितलं—

'म्हणजे तुला असंच म्हणायचंय की, लोकांमध्ये अजूनही असंतोष आहे?'

अबाकुमोव्हनं पुन्हा एकदा सुस्कारा सोडला आणि खालच्या स्वरातच तो म्हणाला,

'होय मार्शल! निदान काही टक्के तरी—'

(लोकांमध्ये असंतोष नाही असं विधान करायला अबाकुमोव्ह काय मूर्ख नव्हता! नाहीतर मग त्याच्या सगळ्या खात्याची गरजच काय उरली असती?)

स्टॅलिन आपुलकीनं त्याला म्हणाला,

'तू अगदी बरोबर आहेस! तुला तुझ्या कामाची कल्पना आहेच! आणि ते मलाही ठाऊक आहे! काही लोक असंही म्हणतात की, आता असंतोषच उरलेला नाही आणि आपल्याला मत देणारा प्रत्येक-

जण सुखीच असतो. तुला काय म्हणायचंय यावर ?' स्टॅलिन छद्मी-पणे हसला.

'याला राजकीय आंधळेपणा म्हणायचा की आणखीन काही ? ते आपल्याला मत देतात याचा अर्थ ते सुखीच आहेत असं नाही ! किती असतील असे ? पाच टक्के ? – दहा टक्के ? –'

'होय ! हे अगदी खरं आहे ! पाच, फार तर सात टक्के असतील !'

अबाकुमोव्ह खात्री पटल्यासारखं म्हणाला.

स्टॅलिन आपल्या डेस्ककडे चालत गेला आणि त्याच्या बाजूनं पुढे झाला. अबाकुमोव्हचे गेलेलं अवसान परत आलं होतं. त्याचे मघाशी तापलेले कानही आता थंडगार पडले होते. मग तो म्हणाला,

'माझी अडचण हीच आहे की, मी स्वतःच्याच कामावर कधी संतुष्ट राहत नाही !'

स्टॅलिननं आपल्या हातातला पाईप एका अ‍ॅश-ट्रेवर झाडला. मग त्यानं विचारल,

'तरुण पिढीची मनःस्थिती कशी काय आहे ?'

त्याचे प्रश्न सुरीसारखे धारदार होते. त्यातला एखादा जरी तुमच्या वर्मी लागला तर तुम्ही आटोपलातच ! अबाकुमोव्ह जर असं म्हणाला असता की, 'तरुणांचा मूड चांगला आहे,' तर तो त्याचा राजकीय आंधळेपणा ठरला असता ! आणि त्याउलट जर तो 'तरुणाचा मूड वाईट आहे' असं विधान करता, तर त्याचा अर्थ त्याची भवितव्याच्या उज्ज्वलतेवर श्रद्धाच नाही, असाच झाला असता ! अबाकुमोव्हनं काही तरी बोलायला हात पसरले. पण मग काहीच बोलू नये एवढंच त्यानं ठरवलं.

'आपणाला तरुणांकडे अधिक लक्ष द्यायला हवं ! आणि चुकीच्या मार्गानं जाणाऱ्यांबाबतीत तर आपण अधिकच कठोर झालं पाहिजे !' स्टॅलिन ठासून म्हणाला आणि अबाकुमोव्हने घाईघाईने नोटस काढून घ्यायला सुरुवात केली.

स्टॅलिनचे डोळे चमकून गेले. त्यानं आपल्या पाईपात पुन्हा एकदा तंबाखू भरला. तो पेटवला आणि पुन्हा एकदा त्या खोलीत येरझारा घालायला सुरुवात केली. तो त्वेषानं बोलत राहिला–

'विद्यार्थ्यांच्या मनस्थितीवर तर तुम्ही डोळ्यात तेल घालून लक्ष द्यायला हवं. त्यांचा निःपात करा. एकेक नाही तर गटागटानं त्यांना नेस्तनाबूत करा आणि कायद्यानं संमत केलेली जास्त शिक्षा त्यांना ठोठवा ! दहा वर्षांची पुरणार नाही; पंचवीस वर्षांची असू द्यात ! दहा वर्षांचा तुरुंगवास म्हणजे सुटीसारखा संपून जातो. शाळकरी पोरांना दहा वर्षांची शिक्षा ठीक आहे. पण त्यांना मिसरुड फुटू लागलेली दिसली तर सरळ पंचवीस वर्षांचा तुरुंगवास भोगू द्यात ! ते तरुण आहेत ! यातनं देखील ते वाचून राहतील !'

अबाकुमोव्हनं सर्व मुद्दे नीट उतरवून घेतले. विचारांच्या लांबलचक मालिकेतला हा पहिला दुवा होता. स्टॅलिन पुढे सांगतच होता–

'आणि राजकीय तुरुंगाचं विश्रांतिगृहात रूपांतर होऊ देणं आपल्याला परवडणार नाही ! बेरिया मला सांगत होता की, राजकीय तुरुंगात लोकांना अजूनही खाण्याच्या वस्तूंची पार्सल्स मिळतात म्हणून !'

अबाकुमोव्ह जड स्वरात उद्गारला, 'आपण ते सारं बंद करू या ! मार्शल, ती आमचीच चूक होती ! तुम्ही त्याबद्दल आम्हाला क्षमा करावी !' (ती खरोखरच घोडचूक होती आणि अबाकुमोव्हला तेवढं तरी समजायला हवं होतं !)

आपल्या तंगड्या फाकवून स्टॅलिन लिहीत बसलेल्या अबाकुमोव्हसमोर उभा राहिला. 'कितीदा तुला हीच गोष्ट मी सांगायची ? आता तरी पक्कं लक्षात घे–'

तरी त्याच्या आवाजात संताप जाणवत नव्हता. त्याच्या डोळ्यातनं हेच सूचित होत होतं की, अबाकुमोव्ह त्याचा मुद्दा बरोबर ध्यानात घेईल म्हणून ! स्टॅलिन आपल्याशी कधी इतका स्पष्ट आणि चांगलं बोलल्याचं अबाकुमोव्हला आठवत देखील नव्हतं. त्याच्या मनातली भीती कुठल्या कुठे पळून गेली. नेहमीच्या परिस्थितीतल्या सर्वसामान्य माणसासारखाच तो विचार करू लागला. त्याच्या कामातली एक महत्त्वाची समस्या किती तरी दिवस त्याच्या मनात सलत होती आणि आता बॉसजवळ ती बोलून दाखवायला हीच वेळ योग्य होती. तो चमकणारी नजर रोखून म्हणाला, 'आम्हाला समजलंय मार्शल ! सगळं समजलंय !' (आम्ही हा शब्द तो सर्व खात्यांकरता वापरत होता !) आपल्याला कशाकशाची निकड आहे तेही आम्हाला चांगलं समजलंय ! वर्गसंघर्षच आता प्रखर करायला हवाय ! आता तर देहांताची शिक्षासुद्धा रद्द करण्यात आली आहे !


# पॅपिलॉन
# पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

अशा परिस्थितीत आमचं काम किती कठीण होऊन बसलंय ! गेली दोन-अडीच वर्षं आमच्या सहनशक्तीचाच अन्त पाहिला जात आहे ! ज्या लोकांना ठार करायचंय त्यांची अधिकृतरीत्या मोजदादही करता येणं अशक्य झालंय ! फाशी देणारांचे पगार भागवण्याची कोणतीच तरतूद कायद्यात केलेली नाही आणि पूर्वी खरं तर या हिशोबांनीच आमच्या सर्व वह्या भरून गेलेल्या असत ! याखेरीज लेबर कँपवर त्रास देणाऱ्यांना काबूत आणायला देहांताच्या शिक्षेची धमकी देण्याएवढा दुसरा प्रभावी मार्गही अस्तित्वात नाही ! मार्शल, आम्हाला देहांताची शिक्षा द्यायचा हक्क हवाच आहे. तो तुम्ही आम्हाला परत मिळवून द्या !'

आपले हात छातीला लावून आणि आपल्या नेत्याच्या कोळपलेल्या चेहऱ्याकडे अपेक्षेनं पाहत पाहतच अबाकुमोव्हनं त्याला कळकळीची विनंती केली.

स्टॅलिनच्या मिशा किंचित थरथरल्या. तो जवळजवळ हसलाच आणि जाणीवपूर्वक म्हणाला,

'मला ठाऊक आहे ! मी त्याचाच विचार करतोय !'

हे मोठं आश्चर्यच होतं ! त्याला सगळ्याचीच माहिती असते आणि तुम्ही काही विचारण्यापूर्वीच त्यानं त्यावर विचार केलेला असतो. आपल्या दैवी ज्ञानाच्या तो माणसाच्या मनातले विचार ओळखून टाकत असे. स्टॅलिन सचिंत झाला. मग तो शून्य नजरेनं दूरवर पाहत म्हणाला,

'आता एखाद्या दिवशी तुम्हाला देहांताची शिक्षा परत मिळेल ! आणि ते शिस्त राखण्याचं एक उपयुक्त साधन ठरेल !'

त्यानं खरोखरच ह्यावर विचार केला होता. पाश्चिमात्यांना दाखवून देण्यासाठी त्यानं दाखवलेल्या ह्या आवेशाबद्दल गेली दोन वर्षं त्याला तीव्रतेनं खेद वाटत असे. देहान्ताची शिक्षा रद्द करताना त्यानं स्वतःच्याच तत्त्वांना बगल दिली होती. लोक पूर्णतः लाचखोर आणि विश्वासघातकी नसावेत, यावर त्यानं विश्वास ठेवला ! राजकीय प्रवक्ता आणि लष्करी नेता म्हणूनची त्यांची सबंध कारकीर्द एकाच तत्त्वावर आधारलेली होती. ते म्हणजे शिक्षा कोणतीही असो,

पदावनती,

छळवणूक,

वेडयांच्या इस्पितळातली रवानगी,

जन्मठेप,

हद्दपारी,

एकदा शत्रू म्हणून जाहीर केलेल्याला द्यायला ती अपुरीच ठरते! मृत्यूइतकी दुसरी कोणतीही विश्वासार्ह आणि अखेरची शिक्षा नाही हेच खरं ! आणि जेव्हा जेव्हा स्टॅलिनच्या डोळ्यांच्या खालच्या पापण्या लवू लागत तेव्हा तेव्हा निर्णय एकच असे, तो म्हणजे मृत्यू ! त्याहून हलकीसलकी शिक्षा त्याच्या प्रमाणातच बसत नसे !

आणि मग स्टॅलिननं जेव्हा आपली नजर उज्ज्वल भवितव्याकडून समोरच्या अबाकुमोव्हकडे वळवळी तेव्हा त्याचे लबाड डोळे चमकले.

'आणि ज्यांना गोळ्या घालायच्या त्यांच्यातला तू पहिलासुद्धा असशील, अशी भीती तुला नाही वाटत ?'

एखाद्या मूकस्वरासारखा 'गोळ्या घालणे' हा शब्दच मुळी त्याला मुळी ओझरता ऐकू आला, पण तो स्पष्ट करून सांगायची त्याला गरजही नव्हती. पण त्या शब्दानं अबाकुमोव्हचं रक्तच गोठून गेलं. स्टॅलिन तर त्याच्यापासून हातभर अंतरावरच उभा होता. तो मुद्दामच आपल्या मंत्र्यानं हा विनोद कसा काय पचवला तेच पाहत होता. उठावं की बसावं, अबाकुमोव्हला काहीच कळेना ! लटपटत्या पावलांनीच तो कसाबसा उठला आणि म्हणाला,

'मार्शल, मी...मी जर त्या शिक्षेला लायक असेन–मला जर तुम्हाला गोळ्या घालायच्या असतील तर–मी–'

स्टॅलिननं कठोर पण भेदक नजरेनं त्याच्याकडे पाहिलं. तो शांतपणे मनातल्या मनात साहजिकच एकच एक विचार करत होता–

'अबाकुमोव्हपास्नं सुटका करून घेण्याची वेळ खरोखर आली आहे का ?' ह्या मारेकऱ्यांना कामाच्या त्वेषानं जखडून ठेवा. मग मोक्याच्या क्षणी त्यांची जबाबदारी घेणंच नाकारा. आणि मग अती उत्साहाबद्दल त्यांनाच शिक्षा करा ! असं तो नेहमीच करत असे. आणि ही युक्ती कधीच फसत नसे. असाही दिवस निश्चित उगवणार होता, ज्या दिवशी अबाकुमोव्हचं नशीबही त्याच मार्गाला जाणार होतं, तो म्हणजे मृत्यूच !

'बरोबरऽ जेव्हा तू मरायला पात्र ठरशील, तेव्हाच तुला गोळ्या घालू या !' स्टॅलिन हसूनच म्हणाला.

आपल्या पसंतीचं बक्षीसच जणू तो अबाकुमोव्हला त्याच्या प्रसंगावधानासाठी देत होता ! आपल्या नेत्याच्या संकेताचा मान राखण्यासाठी अबाकुमोव्ह परत जागेवर बसला. स्टॅलिननं क्षणभर विचार केला आणि अबाकुमोव्हनं जन्मात त्याच्या तोंडी न ऐकलेल्या अशा मृदू स्वरात म्हणाला,

'अबाकुमोव्ह, लौकरच तुला खूपच काम करावं लागेल. सदतीस सालातलेच उपाय आपण पुन्हा एकदा अमलात आणू यात. मोठं युद्ध करण्यापूर्वी फार मोठी 'साफसफाई' ही करावी लागतेच.'

'पण मार्शल, आधीच आपण पुष्कळांना तुरुंगात घालत नाही काय ?' मोठ्या धाडसानंच अबाकुमोव्हनं विरोध दर्शवला. पण स्टॅलिननं तो प्रश्न हसण्यावारीच नेला आणि म्हणाला, 'तू थांब आणि पाहतच राहा ! जेव्हा आपण कामाला खरी सुरुवात करू आणि प्रत्यक्ष जेव्हा लढाईला तोंड फुटेल ना तेव्हा तर आपण आपल्या कामाचा वेग (लोक मारण्याचा !) आणखीनच वाढवू ! त्याचाच अर्थ सुरक्षादलांना अधिक सत्ता ! मोठी अंदाजपत्रकं ! अधिक पगार !–मी हात आखडणार नाही–'

स्टॅलिननं शांतपणे अबाकुमोव्हला जायला सांगितले, तेव्हा तो एवढंच म्हणाला,


'बस. आता पुरे झालं !'

अबाकुमोव्हला कळेना, आपण चाललोय की आकाशात तरंगतोय! तो अभ्यासिकेबाहेर आला आणि त्यानं पॉस्क्रिओबिशेवकडून आपली ब्रिफकेस परत घेतली. आता निदान महिनाभर तरी तो मोकळेपणी श्वासोच्छ्वास करू शकणार होता. याशिवाय बॉसबरोबरच्या–त्याच्या संबंधातलं एक नवं पर्व सुरू झाल्याची अबाकुमोव्हला जाणीव झाली !

त्याला उघड उघडच गोळ्या घालण्याची धमकी देण्यात आली होती !

पण तो तरी काय अखेर बॉसनं केलेला एक विनोदच की !

□ □



# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी १९४८-४९

## पु. ल. इनामदार

### प्रकरण सात : टांचणे, टिपणे, तयारी

लाल किल्ल्यातील न्यायालयात १२ जुलैपासून १९ जुलैपर्यंत डॉ. परचुरे यांच्याविरुद्धचे साक्षीदार जगदीश गोयलपासून मॅजिस्ट्रेट श्री. राजबहादूर अटल यांची परीक्षणे झाली होती. त्यांच्या परीक्षणांसाठी विचारायचे मुद्दे मी लिहून काढलेच होते. साक्षीदारांच्या परीक्षणाची प्रतिलिपी हाती येताच त्यावरून व मूळच्या मुद्यांवरून मी झालेल्या पुराव्याचे, बचावपक्षाच्या वतीने करावयाचे तर्कनिवेदन तयार करावयाला सुरुवात केलीच होती. जसजसे साक्षीदार होऊ लागले, तसतसे झालेल्या परीक्षणाच्या दृष्टीने अगोदर लिहून ठेवलेल्या मुद्यांमधून हवे ते ठेवायचे, नको ते बाद करायचे व आहेत त्यांमध्ये दुरुस्ती करायची व नवीन सुचेल तेही लिहायचे असे मी रोज करीतच होतो. साक्षीदार श्री. अटल यांच्या परीक्षणानंतर पुढे झालेल्या पोलिससाक्षीदार श्री. पाटील, थोरात, श्री. देऊळकर व श्री. मंडलिक यांच्या परीक्षणाच्या प्रती मला मिळाल्या त्याबद्दल विचार करायला लागलो तेव्हा माझे मन कधी, ‘आपण हे करू शकलो नाही’ अशा विचारांच्या टोचण्यापायी त्रासून जायचे, कधी काही विचारायचे राहून गेले असे वाटून मन कळवळायचे; कधी ‘आपण अपेशी ठरलो तर’ असा विचार मला भिववायचा. मनाच्या ह्या हिंदकळण्याने मी भोवंडून जात असे. पण घेतलेला वसा टाकायचा नाही अशा निश्चयाने मी काम चालूच ठेवले होते. घेतलेला वसा टाकू नये हा निश्चय होता, की वसा टाकल्याने होणाऱ्या नाचक्कीची मानहानी वाटत होती? की माझ्या मनाचा अमंगळपणा मला सहन होणार नाही असे मला वाटत होते? मी वसा टाकला नाही हे खरे, पण ते परमेश्वराची करुणा भाकीत– ‘माझ्यापुढला अंधार दूर कर, मला मार्ग दाखव’ जर्मन महाकवी गटेसारखे विनवतो, ‘प्रकाश– आणखी प्रकाश!’ कबुलीजबाबासंबंधी न्यायालयासमोर आलेला पुरावा वाचताना ‘पाषाणाची खोळ घेऊनी बैसलासी’ असे वाटून कासया हे ‘फोल उपणूं भूस’ असा प्रश्न पडायचा नि ‘तुका म्हणे आता मांडिले निर्वाण’ असे म्हणण्यापर्यंत पाळी यावयाची.

आशा निराशेच्या हिंदोळ्यावर असे हेलकावे खाताना नोव्हेंबर १९४८ मध्ये एका भल्या पहाटे मी मॅजिस्ट्रेट श्री. अटल यांच्या-परीक्षणाची प्रतिलिपी समोर घेऊन टेबलाशी बसलो होतो. अचानकच माझे विचार, श्री. अटलमहोदयांनी आपल्या मुख्य परीक्षणात कोठडीतल्या कैद्याचा कबुलीजबाब लिहून घेण्यापूर्वी मॅजिस्ट्रेटने घ्यावयाच्या काळजीविषयी काय केले हे सांगितले होते आणि जे ऐकताना मला मॅजिस्ट्रेट महोदय नि महाअधिवक्ता महोदय ‘अतीच’ करीत आहेत असे वाटले होते, त्या भागावर खिळले. ‘का बरे मला असे वाटले? काय आहे त्यामध्ये असे वाटण्याजोगे?’ असा माझा मलाच प्रश्न पडला. म्हणून मी त्या भागातले श्री. अटलमहोदयांचे एकेक वाक्य हळूहळू वाचायला लागलो. आणि अगदी नकळतच ‘हे काम करायला किती वेळ लागला याचा अंदाज घेऊया’ असे वाटून श्री. अटलमहोदयांचे एक काम वाचायचे नि ते करायला किती वेळ लागला हे कागदावर लिहायचे असे मी करू लागलो. कोर्टामध्ये १९ जुलैला कूटपरीक्षण करतेवेळी या भागाकडे मी लक्ष दिले नव्हते तरी, श्री. अटलमहोदयांना एक प्रश्न विचारला होता की, ‘आपण किल्ल्यावर एकंदर किती वेळ होतात?’ नि त्यावर अटलमहोदयांनी ‘साधारण तीन तास’ असे कोर्टाला सांगितलेही होते हे मला आठ-

वत होते म्हणून एखादी वेळ सांगण्याची चूक झाली आहे का? हे पाहायला म्हणून मी कागदावर श्री. अटलमहोदयांच्या एकेका कृतीची व त्याला लागलेल्या वेळेची मोजदाद करू लागलो. साक्षीदार अटलमहोदय म्हणतात की, ते किल्ल्यावर 'साधारणपणे तीन तास' होते. साक्षीदार श्री. पाटील, थोरात म्हणतात, डॉ. परचुऱ्यांबरोबर श्री. अटल 'जवळजवळ दोन तास होते व नंतर मेजर छत्रे यांना बोलावणे पाठवले.' साक्षीदार श्री. देऊळकर सांगतात की, 'मॅजिस्ट्रेट महोदय व पोलिस अधिकारी किल्ल्यावर साधारणपणे अडीच ते तीन तास होते.' या तिघांही अधिकारी मंडळींना जास्त प्रश्न विचारायचे धैर्य मला झाले नव्हते. श्री. अटलमहोदयांनी हे तर म्हटलेच नव्हते की, १८ फेब्रुवारी ४८ ला त्यांना कोर्टात हजर व्हायला उशीर झाला होता. म्हणजे ते कोर्टात ११ वाजता पोचले असतीलच. ते किल्ल्यावर जायला घरून सकाळी सात वाजता निघाल्याचे सांगतात. तेव्हा किल्ल्यावरून परत येताना ते तेथून दहा वाजता निघाले असतील असे समजायला हरकत नाही. म्हणजे राहिलेले तीन तास त्यांनी किल्ल्यावर कसे खर्च केले? मी वेळाच्या जमाखर्चाचा ताळेबंदच लिहायला सुरुवात केली. जमेच्या डाव्या बाजूला तीन तासांची जमा दाखवली. खर्चाच्या बाजूला अटल घरून सकाळी सात वाजता निघाले म्हणजे त्यांना किल्ल्यावर पोचायला दहा मिनिटे तरी लागलीच असतील, तर खर्चाच्या उजव्या बाजूला खर्चाची पहिली नोंद १० मिनिटे. नंतर तेथे गेल्यावर टेबल, खुर्ची, पहाऱ्याचा शिपाई, वगैरेंची व्यवस्था करायला– पण श्री. अटलमहोदय स्वत: काही वेळ– किती वेळ– लागला सांगतात का ते पाहू या! धारा १६४ क्रिमिनल प्रोसिजर कोडान्वये– अपराधविधिसंग्रहाप्रमाणे–कैद्याला कबूलीजबाबाचा अर्थ व त्याचे महत्त्व व त्याचा परिणाम वगैरे समजावून सांगण्याकरता अटल म्हणतात त्याप्रमाणे 'साठ मिनिटे' लागली. ठीक आहे, खर्चाची दुसरी नोंद साठ मिनिटे. पुढे कैद्याचा कबुलीजबाब काय आहे हे ऐकून घ्यायला अटल म्हणतात त्याप्रमाणे 'पंचेचाळीस मिनिटे' लागली तेव्हा खर्चाची तिसरी नोंद पंचेचाळीस मिनिटे. त्यानंतर अटल म्हणतात की, 'मी कैद्याला समजाविले की, असा कबुलीजबाब देऊ नको. त्याचा उपयोग तुझ्याविरुद्ध केला जाईल, तुला शिक्षा होईल. पण कैद्याने ऐकले नाही.' तेव्हा कैद्याला विचार करायला अर्धा तास वेळ दिला.' असे अटलमहोदय सांगतात हेही ठीकच आहे. तेव्हा खर्चाची पुढली नोंद तीस मिनिटे म्हणजे हा वेळपर्यंत अटलमहोदयांनी किल्ल्यावर नमनाची नांदी व पूर्वरंगामध्येच एकशे पसतीस मिनिटे खर्च केली म्हणायची. ठीक आहे. कायद्याने हे सर्व करायला हवे होते, नि मॅजिस्ट्रेट महोदयांनी केले ते रीतसरच झाले. पुढे अटलांनी कबुलीजबाब लिहून घेतला. त्याला किती वेळ लागला म्हणता? अटलांनी त्याबद्दल काहीच सांगितले नाही. ठीक आहे. खर्चाच्या नोंदीची ही जागा सध्या कोरी-खुली ठेवू या! पुढे मॅजिस्ट्रेट महोदयांनी काय केले? जमेतला वेळ थोडाच उरला आहे. खर्चाच्या वरकड नोंदींचा अंदाज जरा हात आखडून करायला हवा. सुरुवातीची टेबलखुर्ची, पहाऱ्याचा शिपाई वगैरेंची व्यवस्था करायला पाच मिनिटे, प्रास्ताविक प्रश्न नि उत्तरे लिहावयाला– जवळ जवळ दीड-पानभर मजकूर लिहिला आहे– तर त्याला कमीत कमी वीस मिनिटे लागली असतीलच, तर तशीच नोंद करू या. कबुलीजबाबाची सात लिहिलेली पाने कैद्याला मॅजिस्ट्रेटने वाचून दाखवायला, दहाच मिनिटे घेऊया– मग डॉक्टरांनी स्वत: कबुलीजबाबाची सात पाने वाचून पाहिली त्यालाही दहाच मिनिटे धरू या. मग त्या सात पानांवर डॉक्टरांनी आपल्या सात स्वाक्षऱ्या– सह्या केल्या त्याला पाच मिनिटे धरू या. त्यानंतर त्या कबुलीजबाबाशेवटी मॅजिस्ट्रेट अटल यांना धारा १६४ क्रि. प्रो. कोडाप्रमाणे 'प्रमाणपत्र' लिहायचे. त्याच्या सहा-सात ओळी व स्वत: प्रत्येक पानावर सह्या केल्या त्याला दहा मिनिटे. नंतर मेजर छत्रे यांना बोलावणे पाठवून ते येईतो वाट पाहिली आणि ते आल्यावर बंदी डॉक्टर परचुऱ्यांना मॅजिस्ट्रेट अटल यांनी मेजर छत्रे यांच्या हवाली केले, याला दहा मिनिटे लागली असतील, तर ती मिनिटे. म्हणजे किती वेळ किल्ल्यावर खर्च झाला? ५+६०+४५+३०+०+२०+१०+१०+५+१०+१० मेळ = २०५ म्हणजे तीन तास पंचवीस मिनिटे. असो! जमेचा सगळा वेळ खर्च होऊन वर पंचवीस मिनिटे खर्च झालीत. नांदी-पूर्वरंग-आरती बुवांची पूजा यांच्यातच सगळा वेळ संपला. मग बुवांच्या आख्यानाचे काय? आपण तर त्याकरिता खर्चामध्ये शून्यच धरले आहे. म्हणजे आख्यान कुठे लिहिले? किल्ल्यावर तर वेळ उरलाच नव्हता? मग काय बुवांनी आख्यान घरीच केले होते की काय? पण आपण प्रथम हे आख्यान–कबुलीजबाव–लिहायला-किती वेळ लागतो ते स्वत: तर मोजून पाहू या! मी अधीर होऊन घड्याळाकडे बघत कबुलीजबाबाच्या प्रमाणित प्रतीवरून कागदावर स्वत: ते लिहिले, शब्द नि शब्द उतरविले. तर दोन तासांपेक्षा जास्त वेळ निघून गेला होता! अरे, घड्याळात किती वाजले हे आपण लक्षात घेतले नाही. कोर्टात जायची तयारी केव्हा करायची? मी घाईघाईने कागद आवरले, सामान ब्रीफकेसमध्ये भरले व स्नान करून जेवायला जाण्यास तयार झालो. मनामध्ये विचारांचा गोंधळ चालला होता. अटलमहोदयांनी कबुलीजबाबाचे कागद किल्ल्यावर लिहिले नाहीत, घरून लिहून आणले होते, हे त्यांच्याच शब्दावरून सिद्ध होत आहे तर? अरे देवा रे! खरे का हे सारे? पण खरे का नाही? नाही, नाही, याचा शांतपणे विचार करायला हवा. कुठे तरी आपलीच चूक होत असेल! मॅजिस्ट्रेट श्री. राजबहाद्दूर अटल व ॲडव्होकेट जनरल श्री. दफ्तरी अशी चूक करणार नाहीत, कोर्टाच्या पुराव्यात चूक राहू देणार नाहीत...' अशा विचारात मी सकाळची न्याहारी केली नि मुकाट्याने कोर्टात गेलो. हातात कबुलीजबाबाची प्रमाणित प्रतिलिपी होती. जवळ पेन्सिल नि कागदाचा तुकडाही होता. कबुलीजबाबाचे एकंदर शब्द किती आहेत ते हळूहळू मोजीत होतो. ते एकूण १४०० पेक्षा जास्ती भरले. याशिवाय पहिल्या दीड पानावरचे प्रश्नोत्तराचे शब्द वेगळेच. म्हणजे एकूण लिहिले गेलेले शब्द जवळ जवळ १७००–१८०० भरले. ठीक आहे. प्रमाणित प्रतिलिपी देताना प्रतिलिपीबद्दल कार्यलिपिकाने २००० शब्दांवर प्रतिफल (charge) मागितले होते. मग हे अठराशे शब्द लिहिताना किती वेळ लागावा? नुसती झरझर नक्कल करून घ्यावयाला मला दोन तास लागले होते. पण डॉ. परचुरे सांगत गेले असतील व मॅजिस्ट्रेट अटलमहोदयांनी तेवढे लिहिले असेल आणि डॉक्टर परचुरे हिंदीमध्ये बोलले असतील पण अटलनी कबुलीजबाब इंग्रजी भाषेत लिहिला होता. म्हणजे सांगितलेले इंग्लिशमध्ये लिहिण्याला आणखीनच वेळ लागणार.

कबुलीजबाबाचा सगळा मजकूर अटलांनी लिहिला तोदेखील स्वच्छ, रेखीव व सुबक अक्षरात लिहिला. याचा अर्थ कबुलीजबाब लिहून घ्यायला दोन तासांपेक्षा कितीतरी जास्त वेळ लागला असणार. मग हा वेळ श्री. अटलांनी किल्ल्यावर कोठून मिळवला ? असे तर झाले नाही ना की, अटलजींनी केवळ कबुलीजबाबाचे कागदच किल्ल्यावर लिहिले. बाकी कायद्याने आवश्यक अशा इतर सर्व गोष्टी त्यांनी किल्ल्यावर काही एक केल्या नाहीत ! पण असें केले असेल तर, तेही कायद्याविरुद्ध होईल ! माझ्या विचारात मी गर्क होतो. स्वत:ला एक एक शंका विचारायची व त्याचे उत्तर शोधून स्वत:लाच द्यायचे. कोर्टामध्ये असताना मी कोणाजवळ याबद्दल अवाक्षर बोललो नाही. स्वत:लाच म्हणत होतो की, अटलांनी किल्ल्यावर कबुलीजबाबच केवळ लिहिला बाकी कायद्याप्रमाणे करावयाच्या गोष्टी त्यांनी केल्या नाहीत असे मी का म्हणू ? मी हे केले, मी ते केले, मी कायदापालनामध्ये काहीही चूक केली नाही असे त्यांनी कोर्टाला सांगितले– व तेही मुख्य परीक्षणात, अॅडव्होकेट जनरल दफ्तरींच्या प्रश्नांना उत्तर देताना. कूटपरीक्षणामध्ये मी त्यावर एक प्रश्नही विचारला नव्हता. धैर्यच झाले नव्हते मला- कारण ते खरे– कायद्यानुसार आवश्यकच होते असेच सर्वजण म्हणणार. ते खोटे आहे, अतिरंजित आहे असे म्हणण्याचासुद्धा मला अधिकार नाही. मला ते खरे, शब्द नि शब्द खरे असेच मानले पाहिजे. अगदी शपथेवर सांगितलेले सत्य म्हणून कोर्टसुद्धा त्याविरुद्ध मला एक अक्षर बोलू देणार नाही. कारण ते सत्य नाही असे दाखवणारे कूटपरीक्षणाचे प्रश्न मी कुठे विचारले होते ? मला, कोर्टालाही ते सत्य आहे असेच मानायला हवे !

मी कोर्टातून परत येताना टॅक्सीमध्येच एकीकडे श्री. डांगे यांना ' संध्याकाळी जेवण झाल्यावर माझ्या खोलीत याल का ?' असे विचारले. ' का ? काय काम आहे ?' त्यांनी मला विचारले. पण मी 'या म्हणजे सांगेन.' असे म्हणून गप्प झालो. रात्रीचे जेवण झाल्यावर ते माझ्या खोलीत आलेही. माझ्या हाती काय लागले आहे हे मी थोडक्यात त्यांना समजावून सांगितले व त्यांना म्हटले की, या कबुलीजबाबाचा मजकूर एकाने सांगायचा नि दुसऱ्याने लिहायचा असे करून ते लिहायला किती वेळ लागतो हे मला अजमावून पाहायचे आहे, त्यासाठी तुमची मला मदत हवी आहे. डांगे यांना मी काय सांगत आहे हे लक्षात यायला जरा वेळ लागला. पण त्यांनी अटलमहोदयांच्या कथनामधला संबंधित भाग एक एक वाक्य वाचला व त्यावरोबर मी लिहिलेला वेळाच्या जमाखर्चाचा ताळेबंदही पाहत गेले. खर्चाची बेरीज तपासून पाहिली. पाटील, थोरात व देऊळकर यांच्या कथनामधला आवश्यक भागही वाचला नि एकदम त्यांचा चेहरा आश्चर्याने उजळला. उठून उभे राहत ते उद्गारले, 'फारच छान ! अगदी भीमटोला !' नि डांग्यांनी माझ्या पाठीवर धप्पकन शाबासकी दिली ! 'अहो ! असे काय ? तुमच्याकडून शाबासकीची दाद घ्यायला मी नाही बोलावले तुम्हाला ! मला तुमची मदत हवी आहे. वेळाच्या खर्चाचा ताळेबंद तपासायचा, तसेच कबुलीजबाब एकाने सांगून दुसऱ्याने लिहायचा याला किती वेळ लागतो हे नीट अजमावून पहायचे आहे. असे करा, प्रथम तुम्ही सांगा–मी लिहितो. ' ठीक आहे. आपण तसे करून पाहूया पण आज, आताच नाही. मी उद्या सकाळी तुमच्याकडे येईन तेव्हा आपण हे बघू. आता तुम्ही शांतपणे झोप काढा.' असे म्हणून ते निघून गेले. मी खोलीचे दार लावून घेतले नि गुडघे टेकून माथा जमिनीवर ठेवीत म्हटले, देवा ! तू दयाळू आहेस ! तू कृपाळूही आहेस ! माझ्या हाकेला असाच धावून येत जा. मला तुझ्या साहाय्याची फार गरज आहे !'

दुसऱ्या दिवशी श्री. डांगे लवकर–सकाळीच माझ्याकडे आले. आम्ही दोघांनी कामाला सुरुवात केली. त्यांनी मला कबुलीजवाबाचे एक एक वाक्य शुद्धलेखन लिहायला सांगितल्यासारखे सांगितले नि मी लिहिले. वेळ पाहतच होते ते. सगळे लिहून झाल्यावर वेळ पाहिली तर जवळजवळ अडीच तास लागले होते. श्री. डांगे पुन्हा संध्याकाळी आले, त्यावेळी कबुलीजबाबाचे शुद्धलेखन सांगणारा मास्तर मी झालो व ते विद्यार्थी झाले. त्यांचे लिहिणे माझ्यापेक्षा जलद. पण एकूण वेळ त्यांचाही दोन तास वीस मिनिटे झाला ! मी अजमावलेला वेळ फारसा चुकीचा नव्हता. श्री. डांग्यांनी मला सुचविले की, कबुलीजबाबाच्या तर्कनिवेदनाच्या सगळ्या मुद्यांचे मी एक टाचण तयार करावे नि मग ते घेऊन श्री. भोपटकर यांच्याशी सल्लामसलत करावी. मी त्याप्रमाणे मला सुचलेल्या सर्व मुद्यांचे क्रमवार एक टाचण टाईपरायटरवर लिहून काढले. ते दोन-तीन दिवसांत तयार झाले. हे लिहिताना मला आणखी एक मुद्दा सुचला तो असा की, साक्षीदार देऊळकरांनी माझ्या कूटपरीक्षणात त्यांनी कायदा व अनुभवाने तयार केलेली प्रश्नपरीक्षणाची जी खास पद्धत कोर्टाला सांगितली होती, त्याप्रमाणेच कबुलीजवाबही लिहिला गेला होता ! या कबुलीजबाबात दुसऱ्याच परिच्छेदात डॉक्टरांनी आपल्या कुटुंबातल्या सगळ्या नातेवाईकांची सख्ख्या नि चुलत नात्याच्या सगळ्या पुरुषांच्या नावांची यादी दिली होती. ग्वाल्हेरच्या मॅजिस्ट्रेट अटलमहोदयजींना ही विद्या कुठून व कशी सुचली ? ग्वाल्हेरच्या न्यायाधीशाचे लिहिणे म्हणजे नाव, पित्याचे नाव, वय, धंदा लिहून झाल्यावर सुरुवात ' गवाह-मुलजिमने बहलफ बयान किया की,' असे लिहून आक्षेपित घटनेचा मजकूर सुरू करायचा. गवाह असला तर मुलिजम शब्द नाही व मुलजिम असला तर गवाह व बहलफ शब्द नाही. (साक्षीदार-अभियुक्ताने शपथ घेऊन सांगितले की...) याचा अर्थ अटलमहोदयजींनी घरी बसून देऊळकरांच्या प्रश्नपरीक्षणाची सहीप्रत लिहून काढली होती व ते सहा कागद घेऊन व एक कोर्टाचा छापील फॉर्मचा कागद घेऊन ते किल्ल्यावर आले होते नि...माझे मुद्यांचे टाचण तयार झाल्यावर आलेल्या रविवारी मी व डांगे भोपटकरांना भेटायला गेलो. माझ्या प्रश्नाबद्दल माहिती सांगून, ' मी म्हणतो ते बरोबर होईल का ' याविषयी त्यांचे मत विचारले. त्यांना माझ्या प्रश्नाचा–तर्कविचारांचा एकंदर गोंधळ समजायला जरा वेळच लागला पण समजून घेताना त्यांनी त्यांच्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे मला प्रश्न विचारायला सुरुवात केली.

---

## 'फारच छान ! अगदी भीमटोला !' डांगे उद्गारले.

---

'तुम्ही मॅजिस्ट्रेटला याबद्दल कूटपरीक्षणात प्रश्न का नाही विचारला ?'

'मी का विचारावा ? आणि नाही विचारला म्हणून काय झाले ? मी अटलजींचे म्हणणे सगळे खोटे असे कुठे म्हणतो. त्यांनी कबुली-जबाबाचे कागद अगोदर लिहिले असावेत असे मी त्यांना विचारले आहे. त्यांनी 'नाही' असे उत्तर दिल्याने काय होते ? हे बाकी सगळे खरेच मानावे लागेल व त्यामुळेच त्यांचे नाही म्हणणे खोटे ठरते ! मुख्य परीक्षणात अॅडव्होकेट जनरलच्या परीक्षणाच्या उत्तरात हे सर्व सांगितले आहे, ते खोटे कसे म्हणायचे ? हे सगळे खोटे म्हणायचे— त्यांनी किल्ल्यावर कायद्याने आवश्यक असलेली शंकासमाधानाची काळजी घेतली नसेल तर मग त्यांनी लिहून घेतलेला कबुलीजबाब योग्य ती काळजी न घेता लिहिला गेला असे म्हणावे लागेल आणि तेही धारा १६४ क्रि. प्रो. कोडच्या विरुद्ध कार्यवाही केल्यासारखे होईल व त्यादृष्टीनेही कबुलीजबाब अग्राह्य व अवैधानिक आहे. आणि हेही बघा की, कबुलीजबाबाची सगळी घाटणी श्री. देऊळकरांनी त्यांची खास अशी प्रश्नपरीक्षणाची पद्धत बनविली आहे म्हणून सांगितले त्याबरहुकूम आहे. ग्वाल्हेरच्या मॅजिस्ट्रेटना ही देऊळकरी विद्या कशी सुचली ? आणि डॉक्टरांना पिस्तुलाबाबत धमकी दिली असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. डॉक्टरांच्या मोठ्या भावाला पकडले, त्यांच्या कोवळ्या मुलाला पकडले, त्यांच्या बायकांची ठाण्यात बोलावून जबानी घेतली, काय करावे डॉक्टरांनी ? कबुलीजबाब न देण्याचा हट्ट करून सगळ्या कुटुंबाला देशोधडीला लावावे ?...' माझा स्वर तापला असावा. माझे हावभावही उत्तेजन दाखवीत असावे. भोपटकरांनी हाताने मला थांबा असे म्हणत व तोंडावर हसू दाखवीत म्हटले, 'हो. हो. हो. अहो रागावू नका. तुम्ही कोर्टासमोर असे कराल तर कसे चालेल ? शांत व्हा—हे सारे शांतपणे सांगा !' शेवटी ते म्हणाले, 'मी हे कबूल करतो की, तुमच्या या तर्कनिवेदनाने तुम्ही तुमच्या बचावामध्ये बराच जिवंतपणा आणला आहे. नीटपणे सगळा विचार करा. मी तुम्हाला पूर्ण यश चिंतीतो.'

नवजीवन मिळाल्यागत उत्साहाने मी खोलीवर परत आलो. येताना मी डांगे यांना माझ्या ह्या मुद्यांची कुणाजवळ वाच्यता न करण्याबद्दल सांगितले. मला खात्री होती की, भोपटकर याबद्दल कुणाजवळ काही बोलणार नाहीत.

त्यानंतर मी डॉ. परचुऱ्यांच्या विरुद्ध असलेल्या, तसेच गोपाळ गोडसे विरुद्ध असलेल्या एक एक साक्षीदाराबाबत तर्कनिवेदनाच्या मुद्यांचे टाचण करावयाच्या उद्योगात शिस्तबद्ध रीतीने काम करू लागलो. कटाच्या आरोपाबाबतच्या पुराव्याबद्दल, विशेष करून नथूरामच्या दिनांक २८, २९ व ३० जानेवारीच्या काळातल्या हाल-चालींविषयी, त्यातून आपटेला बाजूला सारायला कोणत्या पद्धतीने, कोणत्या दृष्टिकोणाने तर्कनिवेदन तयार करायला हवे, याबद्दल जास्त गंभीरपणे मी विचार करायला लागलो. कारण एकदा आपटेला बाजूला काढले की, २० नि ३० जानेवारीच्या दोन्ही घटनांना वेगळे दाखविण्याचे पुष्कळ सोपे होईल व गोपाळ गोडसेला व इतरांनाही खुनाच्या कटाचा बचाव करणे सोपे जाईल, असे मला वाटत होते. यासाठी प्रत्यक्षातली घटना अशी दि. २८ ची होती. कारण त्या दिवशी ग्वाल्हेरहून आपटे नथूरामबरोबर दिल्लीला न जाता मुंबईला गेला व एकटा नथूराम दिल्लीला गेला असा बचावाचा आधार होता हे मला माहीत होते. म्हणून त्यादृष्टीने विचार करून मी दि. २८ जानेवारी ४८ ला नथूराम व आपटे दोघे दोन दिशेला गेले असे कसे व कोणत्या भूमिकेवरून सांगायचे याचा विचार केला. या मुद्यावर व स्वतः नथूरामच्या वतीने व आपटे यांच्या वकिलांकडून बोलले जाईल हे मला अपेक्षित होतेच. याच सुमारास अॅडव्होकेट जनरल श्री. दफ्तरी यांचे तर्कनिवेदन सुरू झाले होते व त्यांनीही बचावाच्या या कहाणीबद्दल बचावपक्षावर बरीच टीका केली होती व कोर्टासमोर बचावपक्षाला विचारले होते की, दि. २५ जानेवारी ते ३० जानेवारी या दिवसांत असे काय विशेष घडले होते की, २५ जानेवारीच्या अगोदरपावेतो बचावपक्षाच्या म्हणण्याप्रमाणे सारा घोळ केवळ अहिंसक निदर्शने करण्याचा होता तर २५ जानेवारीनंतर नथूरामने महात्मा गांधींची हत्या करण्याचा एवढा गंभीर निर्णय एकाएकी का म्हणून, कोणत्या कारणाच्या संदर्भात घेतला ? बचावपक्षाने अशी कोणतीही घटना, कोणतेही कारण दाखविण्याचा प्रयत्नही केला नाही असे ठासून कोर्टापुढे मांडले गेले होते. हे म्हणणे एकापरीने खरेही होते. म्हणून झालेल्या त्या घटनांवर आधार ठेवून मी माझ्या दृष्टिकोणाने श्री. दफ्तरींच्या प्रश्नाचे उत्तर लिहून काढले. ते लिहिताना नथूराम व नारायण आपटे यांच्या स्वभावविशेषांवर भर देऊन या प्रश्नाचे उत्तर देण्याचा प्रयत्न केला. त्या निवेदनाचा लेख मी या कहाणीत शेवटी देणार आहे.

कटाच्या कहाणीचा आधार म्हणून अभियोगपक्षाने उभी केलेली साक्षीदारांची एक त्रयी न्यायालयासमोर होती. ही त्रयी म्हणजे प्रोफेसर जैन, माननीय मोरारजीभाई होममिनिस्टर मुंबई व श्री. अंगदसिंग. अभियुक्त मदनलाल हा मुंबईला असताना आपल्या पोटपाण्यासाठी काही तरी धडपड करावी, भीक मागू नये, या पंजाबी-सिंधी निर्वासितांच्या वागणुकीप्रमाणे मुंबईच्या प्रोफेसर श्री. जैन यांची विद्यार्थ्यांसाठी लिहिलेली काही पुस्तके कमीशनवर विकण्याचे काम पत्करतो. हा मदनलालची ओळख असण्याचा प्रोफेसर मजकुरांचा आधार. पुढे मदनलालने प्रोफेसरांच्या पुस्तक-विक्रीमध्ये काही विशेष लाभ नाही या कारणानेच असावे, स्वतः मुंबईला फळे—मोसंबी विकावीत असे ठरवून, मोसंबी स्वस्तात मिळविण्यासाठी अहमदनगरला कूच केले. तेथेच मदनलाल हा करकरेच्या संपर्कात आला व मदनलालने नाशिक अहमदनगर येथे फळांच्या खरेदीसाठी शोध केला व तेथेच निर्वासितांच्या छावण्यांमधून प्रचार करण्याचे कामही करायला त्याने सुरवात केली. मदनलालसारख्या सोळा सतरा वर्षांच्या पोरक्या पंजाब्याची महाराष्ट्रासारख्या परक्या प्रांतातली ही परवड लक्षात घेतली म्हणजे मदनलालची आपल्या दुःखापेष्टांची दाद मागण्यासाठी निदर्शने करण्याकडे प्रवृत्ती व्हावी यामध्ये काही नवल नव्हते. मदनलालने नाशिक, नगर येथेही निर्वासितांच्या वतीने निदर्शने केल्याचे म्हटले होते. याच संदर्भात मदनलालची व बडगेची ओळख झाली होती व बडगेच्याच नादाने असावे बहुतेक, मदनलालच्या मनात दिल्लीला जाऊन महात्मा गांधींसमोरच निदर्शन करण्याचे यावे हे क्रमप्राप्त होते; व याच भूमिकेतून मदनलाल दिल्लीला गेला व तेथे २० जानेवारी १९४८ ला संध्याकाळी महात्माजींच्या प्रार्थना सभेत त्याने तथाकथित 'बॉम्ब' उडविण्याचे विक्रमी कृत्य केले.

हे भारतातल्या सगळ्या रेडिओवर व वर्तमानपत्रांतून पानभर पसरलेल्या शीर्षकांनी सनसनाटी बातमी म्हणून प्रसिद्ध केले. हे माझे मदनलालच्या बाबतीतले वर्णनाचे सूत्र. अशा सनसनाटी बातम्या वाचल्या नि जर का त्या सनसनाटी कृत्याचा कर्ता आपल्याला माहीत आहे असे सामान्य वाचकांच्या लक्षात आले तर एक सर्वसाधारण अनुभव आहे की, असे वाचक त्या कर्त्याची आपली ओळख असल्याचे सांगत फिरतात व ते सांगताना पुष्कळसे पदरचे तिखटमीठ लावून त्या ओळखीच्या मुरमुऱ्याची चवदार भेळ बनवितात. असे जर पराचा कावळा या म्हणीत गुंफलेले अनुभव सत्य आहेत, तर मदनलालची ओळख असल्याचे भूषण लाभलेल्या जैनी प्रोफेसर महाशयांची प्रतिक्रिया काय व्हावी ? प्रत्यक्षात, काय, केव्हा व कोणत्या क्रमाने घटना घडल्या हे त्यांचे त्यांनाच माहिती. पण कोर्टाच्या पुराव्यात अभियोगपक्षाची कहाणी अशी की, प्रोफेसर जैनांना 'मदनलालच्या बॉम्ब स्फोटाची' बातमी वाचून हे आठवले की, हा मदनलाल आपल्याला ठाऊक आहे व प्रोफेसर महाशयांना (केव्हा ते कधीच स्पष्ट झाले नाही पण) हेही आठवले की, या मदनलालने प्रोफेसर महाशयांना सांगितले होते म्हणे की, मदनलालचे काही साथीभाई 'महात्मा गांधींचा खून' करण्याच्या विचारात आहेत. मदनलालने असली भयंकर नि गुप्त बातमी प्रोफेसर मजकुरांना सांगितली, तेव्हा ती ऐकायला तेथे एक 'अंगदसिंग' नावाचा मनुष्यही हजर असल्याचे निघाले. प्रोफेसर मजकुरांनी ही बातमी मुंबईचे मुख्यमंत्री श्री. बाळ गंगाधर खेर यांना सांगायचा प्रयत्न केला. मग जैनी प्रोफेसरांनी श्री. मोरारजीभाईंना (तेव्हांच्या मुंबई सरकारचे गृहमंत्री) मुख्यमंत्री खेर यांच्यासमोर सांगितले. महात्मा गांधींच्या हत्येचा विचार–कट–काही महाराष्ट्रीय मंडळी करत आहेत, ही बातमी कळून कमीत कमी मुंबई प्रांताच्या गुजराती गृहमंत्र्यांची प्रतिक्रिया काय व्हावी ?

मुंबईच्या पोलिस खात्याच्या मंत्र्याची प्रतिक्रिया काय, कशी व केव्हा झाली हे त्यांचे त्यांना माहीत. पण या अभियोगपक्षाच्या कहाणीचा पुरावा पहाताना झालेली ग्वाल्हेरसारख्या गावढ्या गावात वकिलीचा व्यवसाय करणाऱ्या माझ्यासारख्या 'क्षुद्र कोणीतरी'ची प्रतिक्रिया साधीशी होती. 'पूज्य बापूजींच्या खुनाच्या कटाचे' वृत्त कळून कोणत्याही भारतीय सुपुत्राने काय केले असते ? कोणत्याही भारतीय पोलिस विभागाच्या मंत्र्याने काय केले असते ? पोलिस ठाण्यामध्ये जाऊन आपल्याला मिळालेली हत्येच्या कटाची पहिली बातमी, त्यासंबंधी माहीत असलेल्या एकच का होईना पण त्याच कटवाल्याच्या नावनिशीसहित पोलिसांना सांगितली असती व ती पोलिस अधिकाऱ्याने तात्काळ 'हत्येच्या गुन्ह्याच्या कटाचे अनुसंधेय वृत्त'–इनफर्मेशन ऑफ कॉग्निझिबल ऑफेन्स–पोलिस डेली डायरीत–'रोजनामच्या'मध्ये दर्ज केले असते. होममिनिस्टरांनी पोलिस ठाण्यावर न जाता पोलिस प्रमुखालाच घरी बोलावले असते. त्या अधिकाऱ्याने स्वतःची जबाबदारी लक्षात ठेवून सगळी सूत्रे हलवायला तात्काळ सुरुवात केली असती–रोजनामच्यामध्ये नोंद करण्यापासून सर्व विधिक्रम पाळला असता.

प्रत्यक्षात पुराव्यात काय दिसले ? श्री. मोरारजीभाईंनी महात्मा गांधींच्या खुनाच्या कटाची बातमी २१ जानेवारीला प्रोफेसर जैनांकडून ऐकली–मुख्यमंत्री बाळ गंगाधर खेरांसमोर ऐकली व त्यानंतर त्यांनी डेप्युटी कमिशनर, पोलिस मुंबई, नगरवाला यांना ही बातमी रात्री रेल्वे स्टेशनवर सांगितली व ते स्वतः अहमदाबादेस निघून गेले. तेथे सरदार वल्लभभाईंनासुद्धा सांगितली. त्यानंतर २४ जानेवारीला पुन्हा जैनांना मोरारजीभाई भेटले. त्या वेळी त्यांना मदनलालचा सहकारी नगरचा करकरे याचे नावसुद्धा कळले. करकरेचे नाव मोरारजीभाईंना सरकारी फायलीमधून माहीत होते. नथूरामचे नाव पुण्याच्या 'अग्रणी'चा संपादक म्हणून पोलिस विभागाला चांगलेच माहीत होते. नथूरामकडून वारंवार जमानती रक्कम मागितली जाऊन ती जप्तही झाली होती. इतके होऊनसुद्धा मुंबई प्रांताच्या पोलिस विभागाने कटाच्या गुन्ह्याची नोंद दिल्ली पोलिसांच्या सूचनेवरून तीन–चार फेब्रुवारीच्या सुमारास केली व एकदम गुन्ह्याची चौकशी 'कट आहे' असे समजून करावी असे आदेश दिले गेले व चौकशीची सूत्रे नगरवाला यांच्या हाती मुंबईचे स्पेशल कमिशनर म्हणून दिली जाऊन चौकशी सत्र सुरू झाले. याचा अर्थ असा झाला की, प्रोफेसर जैनांनी माननीय खेर व माननीय मोरारजीभाई यांना कटाची बातमी २१ फेब्रुवारीला सांगितली, त्या दिवशी काही लेखी नाही. नगरवालांना २१ ला रात्री सूचना दिली त्याचा लेख नाही–२४ फेब्रुवारीला जैन मोरारजींना भेटले त्याचा लेख नाही–करकरेचा शोध नाही–इतरांचे प्रश्नपरीक्षणही नाहीच व ३० जानेवारीला गांधीजींचा खून झाल्यावर सगळी धरपकड एकदम म्हणून सुरू झाली. मदनलाल २० जानेवारीला व नथूराम ३० जानेवारीला घटनास्थळीच बंदी झाले होते. या दोन्ही गुन्ह्यांची सांगड अगदी अंदाजाने पहिल्याने घातली ती दिल्लीच्या पोलिसांनी ! त्यानंतर ३–४ फेब्रुवारीला प्रोफेसर जैनांचे नाव नगरवालांना मोरारजीभाईंनी सांगितले व मग मुंबईच्या पोलिसांच्या आदेशबरहुकूम खुनाच्या कटाला गृहीत धरून उच्च अग्रहक्काचे चौकशीसत्र सुरू झाले ! नि १३ फेब्रुवारीला मोरारजीभाईंच्या प्रश्नपरीक्षणाचा लेख लिहिला व त्यानंतर प्रोफेसर जैन व अंगदसिंग महाशयांचा !

या कोर्टासमोरच्या पुराव्याला धरून बचावपक्षाच्या सगळ्या वकिलांनी–शंकर किस्तैय्याचा सरकारी वकील वगळून–आपापल्यापरीने काही तर्कनिवेदन करायचे मला अपेक्षित होतेच. कारण सगळ्यांनी–श्री. भोपटकर – ओक – मेंगळे – डांगे – वानर्जी आदींनी मोरारजीभाईंचे कूटपरीक्षण केले होते. कूटपरीक्षण केले नाही एकट्या मीच. तरीपण मी पुराव्याचा विचार करताना माझ्या अल्पबुद्धीला जे सुचले त्या दृष्टीने एक तर्कनिवेदनाचा लेख लिहून काढला होता. तोदेखील मी या कहाणीत शेवटी देणार आहे.

मी शेवटी परिशिष्ट म्हणून देणार असलेले वरील दोन्ही लेख व माझ्या पक्षकारांच्या संबंधाच्या पुष्कळशा साक्षीदारांविषयीच्या मुद्द्यांचे टाचण मी माझ्यासाठी लिहिले. सुटया कागदांवर टाईप करून तयार केले. पुष्कळशी वाक्ये, परिच्छेद लिहून काढली. उद्देश तोंडी तर्कनिवेदन करताना, ती तोंडात पाठ झालेली असावी हा होता. हे माझे काम, कोर्टामध्ये डिसेंबर १९४८ च्या पहिल्या आठवड्यात ॲडव्होकेट जनरल श्री. दप्तरींचे तर्कनिवेदन सुरू झाले तेव्हादेखील चालूच होते. दिवसेंदिवस माझा आत्मविश्वास वाढावत होता. नानाप्रकारचे विचार मनात येत. त्या सगळ्या विचारांतला अतिप्रेरक विचार म्हणजे हा असे : 'मी पुराणप्रसिद्ध दिल्लीच्या

भूमीवर, इतिहासप्रसिद्ध लालकिल्ल्यात काम करायला आलो आहे; येथेच स्वातंत्र्यसेनानी सुभाषचंद्र बोस यांच्या चार सहकारी अधिकाऱ्यांविरुद्ध ब्रिटिश राजसत्तेने 'आझाद हिंद फौज–आय. एन. ए.–खटला' या नावाने जगभर गाजलेला अभियोग चालविला होता. याच न्यायालयापुढे अभियुक्तांचे वकील म्हणून पंडित जवाहरलाल नेहरूसुद्धा बॅरिस्टरीचा झगा व गळबंद घालून उभे राहिले होते. येथेच ना. श्री. भुलाभाई देसाईंनी आपल्या मंजुळ पण धाराप्रवाही भाषेत, कोर्टापुढे सगळ्या वकिलांना आदर्श झालेल्या चार अभियुक्तांच्या वतीने प्रसिद्ध तर्कनिवेदन केले होते. आता मी ज्यात काम करीत आहे हे लालकिल्ल्यातले दुसरे अभियोगपर्व, अगदी त्याच पूर्वीच्या इमारतीत नाही, तरी शेजारच्या इमारतीत चालले आहे. मुगल सम्राट बहादुरशहाच्याविरुद्ध ब्रिटिश राजसत्तेने चालवलेला अभियोगदेखील याच किल्ल्यातल्या राजवाड्यात चालला होता. या न्यायालयात मी श्री. आत्मचरणजी आय. सी. एस. या न्यायाधीशासमोर, भारतात नामांकित असे मुंबईचे श्री. सी. के. दफ्तरी, श्री. जे. सी. शहा व पंजाबच्या रायबहादुर ज्वालाप्रसादांसारख्या अभियोगपक्षाच्या वकिलश्रेष्ठांच्याविरुद्ध उभा राहून काम करीत आहे. तसेच पाटण्याचे श्री. पी. आर. दास, मुंबईचे श्री. जमनादास मेहता, पुण्याचे श्री. भोपटकर यांच्यासारख्या वकिलश्रेष्ठांच्याबरोबरीने काम करीत आहे नि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकरांसारख्या विभूतीमत्त्व पावलेल्या अभियुक्तांच्यावतीने काम करीत आहे. हा अभियोग इतिहासाच्या अजरामर पानांमधून 'महात्मा गांधी खून खटला' या नावाने उल्लेखिला–लिहिला जाईल!' मी माझ्याकडून होतील तितके कष्ट उत्तम तऱ्हेनें करून तडीला नेले पाहिजेत असे वाटून मी 'परमेश्वरा, माझा धावा ऐकून यावेळी माझ्या मदतीला उभा राहा. मला माझ्या जिवलगांच्या प्रीतीला पात्र होऊ दे' अशी दयाळू परमेश्वराची करुणा भाकीत असे!

[क्रमशः]

# राजहंस प्रकाशन सूची


| | | | |
|---|---|---|---|
| १ | शिलंगणाचं सोनं | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| २ | शनवारवाड्यातील शमादान | ब. मो. पुरंदरे | ३ – ५० |
| ३ | पुरंदरच्या बुरुजावरून | ब. मो. पुरंदरे | ४ – ०० |
| ४ | पुरंदऱ्यांचा सरकारवाडा | ब. मो. पुरंदरे | ७ – ०० |
| ५ | फिडेल, चे आणि क्रांती | अरुण साधू | ७ – ०० |
| ६ | परसूच्या पशुकथा | वसंत सबनीस | २ – ०० |
| ७ | सहा साहसे | दा. सी. देसाई | २ – ०० |
| ८ | पूर्णिया | अनिल अवचट | ६ – ०० |
| ९ | गुजरायेतील मराठी राजवट | वि. गो. खोबरेकर | ७ – ०० |
| १० | कोठे आणि कधीतरी | डॉ. सुधीर फडके | १० – ०० |
| ११ | रातराणी | विजय तेंडुलकर | १२ – ०० |
| १२ | आणि ड्रॅगन जागा झाला | अरुण साधू | १४ – ०० |
| १३ | एका पराभवाची कहाणी | अनंत भावे | १५ – ०० |
| १४ | शतपावली | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १५ | श्रीग्रामायन | श्री. ग. माजगावकर | १५ – ०० |
| १६ | आनंदाच्या दाही दिशा | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| १७ | नाझी भस्मासुराचा उदयास्त | वि. ग. कानिटकर | ४५ – ०० |
| १८ | पॅपिलॉन | रवींद्र गुर्जर | २५ – ०० |
| १९ | हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील अज्ञात कथा | अशोक परळीकर | १२ – ०० |
| २० | देवाघरचा पाऊस | रवींद्र पिंगे | १० – ०० |
| २१ | मॅक्झिम गॉर्की | सुमती देवस्थळे | १० – ०० |

पुस्तके

# रोटरी आणि मी : लेखिका - हॅझेल हर्स्ट

अनुवाद : डॉ. शरद अभ्यंकर

मी तीन दिवसांची असताना औषधोपचारातील गफलतीमुळे माझे डोळे गेले, म्हणजे जवळ जवळ मी जन्मांधच होते म्हणानात. तुम्हाला माझी कहाणी एखाद्या परीकथेसारखी वाटेल. एक अपंग व्यक्ती प्रचंड अडचणींवर मात करून आनंद, कीर्ती आणि कौटुंबिक सुख प्राप्त करून घेते हे नवलच नाही का? पण माझ्या कहाणीत यापेक्षाही जास्त काही आहे. मला वाटते माझे आयुष्य इतके समाधानी आणि समृद्ध झाले याचे कारण माझ्या निकटवर्ती असणाऱ्या व्यक्तींनी माझ्या अपंगत्वाशी प्रथम तडजोड केली आणि मग निश्चयाने, सातत्याने आणि सुरेखपणे त्या अपंगत्वाची जाणीवही ठेवली नाही.

माझे आई-वडील – त्यांच्या काळाच्या मानाने अतिशय शहाणे लोक – त्यांनी मला आधार दिला, पण ते मला न जाणवू देता दिला. माझी भावंडे एकमेकांशी जशी वागत तशीच माझ्याशीही वागत. जगातील अनेक देशांत माझे दत्तक वडील म्हणून काम करणारे आणि माझ्या शिक्षणाकरता खर्च करणारे रोटरी सभासद मी एखाद्या डोळस व्यक्तीप्रमाणेच हुशार, सुसंस्कृत आणि रीतिभातीची असेन अशीच अपेक्षा ठेवीत असत.

ज्यांना दृष्टीचे वरदान लाभलेले असते त्यांना 'अंधत्व' हा नुसता शब्ददेखील 'महारोग' या शब्दाप्रमाणे हृदयात थरकाप उडवतो. पण माझे अंधत्व हा मला शाप म्हणावे की आव्हान? मला डोळे असते तर मी इतकी प्रगती केली असती, इतके शिक्षण घेतले असते आणि इतरांच्या इतकी उपयोगी पडले असते काय? आयुष्यातले क्षुल्लक आनंद, – उन्हाचा स्पर्श, फुलांचा सुगंध, शेकोटीची ऊब..., मला आताइतकेच प्रिय वाटले असते का? परमेश्वरावरील आणि माणसावरील माझी निष्ठा इतकी समर्थ राहिली असती का? अनेक वेळा, अत्यंत गंभीरपणे, मी म्हणते की, माझे आयुष्य पुन्हा जगण्याची मला संधी मिळाली, तर मी हेच आयुष्य पत्करीन – अगदी अंधत्वासकट! चला तर माझ्याबरोबर माझ्या आयुष्याची सफर करायला, म्हणजे मी असे का म्हणते ते समजेल...

माझ्या एका ज्ञानेंद्रियाची उणीव भरून काढण्याकरता माझी इतर ज्ञानेंद्रिये प्रगल्भ झाली पाहिजेत हे माझ्या आईने ओळखले होते, आणि हे काम तिने इतके सुंदर बजावले आणि माझ्या भावंडांनाही इतक्या उत्तम रीतीने शिकवले की, मी सहा वर्षांची होईपर्यंत इतर सर्वजण, हरघडी वापरीत असलेला एक महत्त्वाचा अवयव आपल्याजवळ नाही, याची मला जाणीवही नव्हती.

पण मग एके दिवशी मात्र ही गोष्ट त्यांना मला सांगावीच लागली. आई ज्याकरता प्रार्थना करत असे, असा चमत्कार घडून आला. आमच्या कुटुंबातल्या मंडळींच्या आग्रहावरून सेंट मेरीज ॲकॅडमीने मला त्यांची पहिली अंध विद्यार्थिनी म्हणून प्रवेश द्यावा असा आमच्या बिशपसाहेबांनी फतवा काढला; आणि अचानकपणे हिवाळी सत्रापासून मला शाळेत जाणे आवश्यक झाले.

शाळेत प्रवेश मिळाल्याचे पत्र आईने पुन्हा एकदा वाचले, मनाचा निश्चय केला आणि मला शोधायला ती मागल्या अंगणात आली.

तो दिवस – सर्वसामान्य दिवसासारखाच सुरू झाला – तरी माझ्या स्मरणातून कधीही जाणार नाही. सफरचंदाच्या झाडाला बांधलेल्या झोक्यावर मी नेहमीप्रमाणे बसले होते. पानांची सळसळ, झोक्याची करकर आणि अंगणात फिरणाऱ्या टर्की कोंबडीचे चक, चॉक नेहमीप्रमाणेच सुरू होते. पण स्वयंपाकघराच्या दरवाजाचा फाडकन आवाज आलेला मात्र वेगळा होता. आई कधी दरवाजा असा आपटत नसे. ती जवळ आली ती सावकाश पावलांनी. काहीतरी महत्त्वाचे घडणार आहे हे ओळखून मी तिचा झगा पकडला.

'आई?'

आपल्या दणकट हाताने हनुवटी उचलून ती म्हणाली, 'बाळा तुला मी आज एक महत्त्वाची गोष्ट सांगणार आहे.'

सावकाशपणे आणि अडखळत बोलायला तिने सुरुवात केली तेव्हा प्रथम मी आश्चर्याने थक्क झाले. 'तुझ्या डोळ्यांना तू लहान होतीस तेव्हा इजा झाली आणि त्यामुळे इतर लोकांना त्याचा जसा उपयोग करता येतो, तसा तुला येत नाही.'

पण डोळ्यांचा – कपाळाखाली इकडे तिकडे हालणाऱ्या या गोट्यांचा – उपयोग तरी काय होत असेल असा मला प्रश्न पडला.

आईने सांगितले– 'मी तुला पुस्तकातून गोष्टी वाचून दाखवते. पुस्तकात काय लिहिले आहे हे डोळ्यांमुळे समजू शकते. तुला तुझ्या डोळ्यांनी वाचता येणार नाही, पण हेच वाचन तुला तुझ्या बोटांनी करता येईल.'

माझ्या बोटांनी? बोटे विस्फारून मी या नव्या देणगीचा आश्चर्याने विचार करू लागले.

'आणि हीच गंमत तुला सांगायला आले आहे. तुला आता शाळेत घातली आहे. तुझ्यासारख्या मुलींच्यासाठी तयार केलेली खास पुस्तके तुला वाचता येतील खूप नव्या नव्या गोष्टी तुला शिकता येतील. आणि ही तुझी बोटे...' माझ्या हातांना कुरवाळीत आई म्हणाली, 'ही तुझी बोटे डोळ्यांच्याऐवजी तुला... शिकवतील. परमेश्वर खरोखर दयाळू आहे. तो तुझ्या पाठीशी राहून तुला हे सगळं शिकायला मदत करेल.'

हे सगळं मला समजण्याच्या पलीकडचे होते. मी मूकपणे बसून

राहिले आणि आई हळूहळू मला झोका देत राहिली. शेवटी तिने विचारले, 'हॅझेल बेटा, गप्प का अशी ?'

माझ्या डोळ्यात एकच अति महत्त्वाचा प्रश्न होता. एक अतिशय गमतीची वस्तू माझ्या सर्व भावंडांना शाळेत जायच्या दिवशी मिळत असे. मलाही ती एक दिवस मिळणार याची मला खात्री होती. पण आता आई म्हणत होती, मी इतरांच्यापेक्षा वेगळी होते, वेगळ्या पद्धतीने वाचणार होते...

'आई,' मी विचारले, 'मला बाकी सगळ्यांच्यासारखी पेन्सिलीची पेटी आणशील ना ?'

मी काय विचारते देव जाणे असे आईला झाले असावे, पण ही मागणी तिला निश्चितच अपेक्षित नव्हती. मोठा सुस्कारा टाकून तिने मला जवळ ओढले आणि 'सगळ्यांच्यापेक्षा छान छान पेन्सिलीची पेटी आणू हं तुला' असे वचन दिले.

तो दिवस म्हणूनच माझ्या आयुष्यात जादूचा असल्यासारखा मला आठवतो. आनंदातिशयाने माझे हृदय भरून आले होते. एक नवीनच जग माझ्यापुढे उलगडणार होते. मी तर उत्साहाने ओसंडत होते. मी आता वाचणार, मोजणार, इतर सगळ्यांच्यासारखेच मी शिकणार, आणि माझ्या भावांच्यासारखे...आणि माझे स्वप्नाळू मन पुन्हा आठवण करी, 'मला पेन्सिलींची पेटीपण मिळणार !'

मी बालसुलभ अजाणतेपणाने हवेतून चालत होते, पण इकडे माझ्या आईवडिलांना अनेक नवे नवे प्रश्न भेडसावत होते. शाळेत माझं नाव घालणं ही नुसती सुरुवात होती. आज कोणाही अंध मुलाला ब्रेल लिपीतही विनामूल्य पुस्तके मिळतात. पण त्या काळी अशा पुस्तकांची किंमत जबरदस्त असे, आणि माझ्या पालकांच्याकडे आणि शाळेकडेही इतके पैसे नव्हते. शिवाय मला शाळेत नेण्याचा आणि आणण्याचा प्रश्न होताच...सायकलवरून जाणे मला शक्य नव्हते, वडिलांना कामावर जायचे असे आणि माझे भाऊ अगदीच लहान लहान होते.

पण या सगळ्या अडचणींचा मला एक क्षणभरही अडथळा आला नाही. आईच्या प्रार्थनेला जणू उत्तर म्हणून आणखी एक चमत्कार घडला आणि लगेचच मी टॅक्सीने शाळेत जाऊ-येऊ लागले.बाकीच्या मुलींना अर्थात माझा हेवा वाटे. थोड्याच दिवसांत न्यूयॉर्कहून माझ्याकरता पुस्तकेही येऊन दाखल झाली.या सगळ्यांचं कारण म्हणजे माझ्याबद्दलची माहिती कळल्यावर दयाबुद्धीने सार्वजनिक कार्यात लक्ष घालणाऱ्या एका संस्थेने माझा स्वीकार, त्यांची त्या वर्षाची सेवायोजना म्हणून केला होता.

काळजी करून करून डोके फिरून जायची वेळ आली असता, एकदम एक अनोळखी गृहस्थ घरी कसे आले त्याची हकीकत सांगायला आईला कधी कंटाळा वाटत नसे.

'ओग्डेन्सबर्ग, न्यूयॉर्कच्या रोटरी क्लबने तुमच्या मुलीला आमच्या सेवा योजनेप्रीत्यर्थ दत्तक घेतले आहे आणि तिला शाळेत नेण्या-आणण्याचा आणि फी-पुस्तकांचा खर्च केला. तुम्ही एवढेच करायचे की, तिला जास्तीत जास्त मदत करून उत्तेजन द्यायचं. हा एक नवा प्रयोग आहे-अंध मुलांना इतरांच्याबरोबरच शाळेत पाठवायचे ! तिला आणि तुम्हालाही ते बरंच जड जाईल. पण तुमची मुलगी फार हुशार आहे असं आम्ही ऐकलंय. मला खात्री आहे, ती नक्की शिकू शकेल !'

अशा रीतीने आमच्या छोट्या गावातील ३० रोटरी सभासदांची आणि पर्यायाने जगभरच्या दीड लक्ष रोटरी सभासदांची मी दत्तक मुलगी झाले. माझ्या देखभालीची जबाबदारी या समर्थ पालकांनी उचलली ती पुन्हा सोडलीच नाही.

मध्यंतरी मी ९ वर्षांची असताना आणखी एक अपघात झाला. व्यायामशाळेच्या कार्यक्रमात आम्ही केलेला मनोरा कोसळला आणि त्याखाली सापडून माझी कंबर मोडली. त्यामुळे मला पायाला आधार देणाऱ्या पट्ट्या वापराव्या लागत. आमचे डॉक्टर, घरचे लोक, मित्रमंडळी-थोडक्यात मी स्वतः सोडून सगळ्यांचंच असं मत पडलं की, मला या आधारपट्ट्या जन्मभर वापराव्या लागणार !

या जादा अडचणीचा मी कधी त्रास मानलाच नाही. आईने तिच्या नेहमीच्या गुणीपणाने हे सर्व सोसले. मी एक वर्षभर बिछान्याला खिळून होते. त्यावेळी खूप लोक भेटायला येत. पुन्हा शाळेत जाऊ लागले त्यावेळी सगळ्या वर्गाने व्यक्त केलेल्या शुभेच्छा अजून आठवतात. कोणीतरी मला रेडिओ दिला. त्याची एरिअल मी माझ्या बुटाच्या लोखंडी पट्टीला अडकवून जास्त चांगले 'रिसेप्शन' मिळवंत असे.

जेवण्याच्या टेबलाला धरून धरून चालत मी पुन्हा चालायला लागले. तेवढ्यात एक दिवस रोटरीच्या एका समारंभात मला स्टेजवर छोटेसे काम मिळाले. सुरेख आखूड झगा, नवे नवे रेशमी पायमोजे या सर्वांत माझ्या पायाच्या लोखंडी आधारपट्ट्या अगदीच बेडौल दिसत होत्या. हळूच पडद्यामागे जाऊन मी त्या पट्ट्या काढून टाकल्या आणि तशीच स्टेजवर आले. त्या दिवसापासून अगदीच लांबची चाल असली, तर मला पट्ट्या वापराव्या लागत. सहा महिन्यांनी त्या पूर्णपणे सोडूनच दिल्या. डॉक्टर म्हणाले, 'आश्चर्यकारक सुधारणा !' शाळेतल्या सिस्टर्स म्हणाल्या, 'दैवी चमत्कार !' पण आई म्हणाली, 'बरं का हॅझेल, अगदी, अगदी क्वचित अतिशय हट्टीपणासुद्धा चांगला असतो, तो असा !'

एकदा पायातल्या या 'शृंखला'तून मी मुक्त झाल्यावर मी किशोरवयाचा आनंद पूर्ण उपभोगला. शाळेच्या सहली, गर्ल गाईड, समाजसेवा मंडळ, या साऱ्यांत मी उत्साहाने भाग घेत असे. अशातच शालेय जीवन संपले. मला सर्व विषयांत उत्तम मार्क पडले होते आणि कोलंबिया विद्यापीठाची स्कॉलरशिप मी जिंकली होती.

माझी मदतनीस कुत्री 'बेब' हे अशा कुत्र्यांपैकी सर्वांत प्रसिद्ध कुत्री ठरावी. ॲडॉल्फ हिटलर, बेनिटो मुसोलिनी, एलेनॉर रुझवेल्ट शर्ले टेम्पल अशा विविध व्यक्तींच्याकडून पाठ थोपटून कौतुक करून घेण्याचे भाग्य फक्त याच कुत्रीला लाभले असेल ! तरीसुद्धा प्रथम मला 'बेब'ची मदत देऊ करण्यात आली त्यावेळी मी जरा साशंकच होते.

S. S. C. निकालानंतरच्या रोटरी सभेला मला बोलावले होते. अध्यक्ष हॅंडी मला म्हणाले, 'हॅझेल, आम्ही रोटरीतर्फे तुला एक मार्गदर्शक कुत्रा घेऊन देणार आहो. पुढच्याच आठवड्यात मॉरिसटाऊन, न्यू जर्सीला मार्गदर्शक कुत्र्यांच्या केंद्रावर आम्ही तुला शिक्षणासाठी पाठवणार आहो.' प्रथम मला धक्काच बसला. मग निराशा. या असल्या कुत्र्यांच्याबद्दल मी माझ्या ब्रेल पुस्तकात वाचले

होते आणि रेडिओवरही ऐकले होते. विश्वास बसणार नाही अशा त्या काही काही गोष्टी होत्या, कारण माझ्या माहितीतले सगळे कुत्रे मधे मधे येत, उड्या मारत आणि एकंदरीत अंध माणसाला त्रासदायकच असत. त्याहीपेक्षा म्हणजे कुत्र्याच्या आधाराने चालू लागल्यावर लोक मला हसतील. म्हणतील, 'अरे, ती मुलगी बघा. आंधळी दिसते. बिच्चारी!' शिवाय त्या कुत्र्याची काळजी घेणं आलंच–कुठल्या हॉटेलमध्ये कुत्रे ठेवायला परवानगी मिळेल तिथे!

हे विचार माझ्या डोक्यात घोळत असतानाच अध्यक्ष हँडी मला आणि इतर सभासदांना या मार्गदर्शक कुत्र्यांची माहिती देत होते. ही कल्पना अमेरिकेत नवीनच होती. स्वित्झर्लंडमध्ये जर्मन शेफर्ड जातीचे कुत्रे शिकवून सीमा रक्षणाकरता वापरत. मॉरिस फ्रँक नावाच्या एका अंध माणसाच्या विनंतीवरून हे काम करणारी डोरोथी युस्टिस अमेरिकेत आली होती. आणि अंध इसमांना साहाय्य करायला कुत्र्यांना शिकवण्याची शाळा त्यांनी काढली होती. या शाळेतील प्रमुख शिक्षक इलियट हंफ्रे हे रोटरी सभासद होते. त्यांनी २२५ कुत्रे शिकवून तयार केले होते. पण मागणी होती १०,००० कुत्र्यांची! पण मी रोटरीचीच मानसपुत्री असल्यामुळे माझा नंबर लागला होता...!

सर्वांनी टाळ्या वाजवून माझे अभिनंदन केले. पण मी मात्र या सज्जन लोकांना न दुखवता नकार कसा द्यावा याचा विचार करत होते. पण शेवटी त्यांना आणि माझ्या आई-वडिलांना आनंद वाटेल हे ओळखून मी होकार दिला.

मारिस टाऊनला जातानाही मी अशी आशा करत होते की, कुत्र्याची मदत घेऊन रोजचे व्यवहार करणे आपल्याला जमले नाही आणि त्यामुळे आपल्याला कुत्रा मिळालाच नाही तर बरे होईल. माझ्या वर्गात आणखी पाच अंध होते, त्यामुळे मी खूष होते. कारण आतापर्यंत इतर तरुण अंध व्यक्तींचा आणि माझा परिचय नव्हता. एकमेकांशी चर्चा करणे आणि इतरजण अडचणीतून कसा मार्ग काढतात ते ऐकण्यात मजा येत असे. या सर्वांना आपल्याला मार्गदर्शक कुत्रा मिळणार म्हणून आनंद झाला होता. मी मात्र अजूनही साशंकच होते. त्यातच सुरुवातीचा धडा म्हणून आमच्या शिक्षकांनी त्यांचा हात हातात घेऊन त्यांना कुत्रा समजून हुकूम करायला लावले. आणि बरोबर हुकूम सोडतो का नाही हे त्यांना पाहायचे होते. पण मला ते सगळे हास्यास्पदच वाटले. चांगल्या केसाळ बाप्या माणसाचा हात धरून 'शहाणी माझी बाई ती', 'बेब बेटी, मार उडी' असे म्हणायचे तरी कसे?

तिसऱ्या दिवशी आमची आणि कुत्र्यांची भेट झाली. 'आम्ही शक्यतो मालकाचे आणि कुत्र्याचे व्यक्तिमत्त्व जुळेल अशी खबरदारी घेतो' शिक्षक म्हणाले. मला जरा रागच आला. कुत्र्याला कसले आले आहे व्यक्तिमत्त्व? आणि माझे व्यक्तिमत्त्व एका निष्पाप चतुष्पाद प्राण्यावर लादायची मला इच्छा नव्हती. मी आपली चुप्पपणे काय होईल त्याची वाट पाहत बसले.

अखेर एक कुत्रा माझ्या हातात तोंड खुपसू लागला आणि शिक्षक म्हणाले, 'ही बेब बरं का. आणि ही हॅझेल, बरं का बेब! किती गोड कुत्री आहे ही. तुला नक्की आवडेल!'

पण मला काही ती आवडली नाही. दुसऱ्या दिवशी आम्ही मोकळ्यावर फिरायला बाहेर पडलो. मी तर घाबरलेच होते. इथल्या वाटा मला नीट ठाऊक नव्हत्या आणि बेबला तर नव्हत्याच याची मला खात्री होती आणि तरीही मी कोणीही माणूस बरोबर नसताना, या कुत्रीच्या पाठोपाठ भगवान जाणे कुठे चालले होते!

तेवढ्यात बेब मला डावीकडे ओढू लागली. मी तिला सरळ वाटेने न्यायचा प्रयत्न केला पण ती ऐकेचना. अखेर तिच्या मागे मला जावेच लागले. काही पावले गेल्यावर पुन्हा उजवीकडे वळून आम्ही पहिल्या सरळ वाटेला लागलो. 'हॅझेल,' अचानक आवाज आला. 'आता मी तुला परत आल्या वाटेने घेऊन जातो. म्हणजे बेबने मध्येच तुला वाट सोडून बाजूला का जायला लावले ते कळेल.' आमचे शिक्षक पाठीमागून येत होते त्याचा मला पत्ताच नव्हता. त्यांचा हात धरून मी परत फिरले. एकदम थांबून ते म्हणाले, 'आता पुढे काय आहे ते चाचपून पाहा!' मी हात पुढे केले. काही तरी लाकडी वस्तू, मोठी चाके, हातगाडी! आमच्या शिक्षकांनी ती मुद्दाम वाटेत टाकली होती आणि बेबने मला यशस्वीपणे पलीकडे नेले होते.

भावनोत्कटतेने मी भरून गेले. चटकन खाली वाकून मी बेबला हृदयाशी धरले. खरंच तू माझी मार्गदर्शक आहेस. तू नक्कीच माझी काळजी घेशील!

पुढच्या चार आठवड्यांत आमचे चांगले प्रेम जमले. माझे शिक्षण पूर्ण होताच मला वाटू लागले की, प्रत्येक अंध व्यक्तीला जर असा सोबती मिळाला तर किती बरे! आणि माझ्याकरता हे सर्व घडवून आणणाऱ्या गोष्टीबद्दल माझे अंतःकरण कृतज्ञतेने भरून आले.

कोणालाही सोबत न घेता मी आणि बेब ओडेनबर्गला परतलो तेव्हा स्टेशनवर आमच्या स्वागताला अर्धा गाव लोटला होता. सप्टेंबरमध्ये मी कॉलेजला जाण्यास निघाले तेव्हा इतर कोणत्याही व्यक्तीसारखीच निघाले. मला निरोप देणाऱ्या आई-वडिलांच्या डोळ्यात आनंदाश्रू दाटले होते यात नवल ते काय!

कॉलेज जीवन कसे संपले ते मला कळलेच नाही. समाजशास्त्र आणि कायदा या विषयांतल्या पदव्या मी नेहमीपेक्षा लवकरच पूर्ण केल्या आणि एक स्कॉलरशिप जिंकून पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी दोन वर्षे युरोपला भेट दिली. उन्हाळ्यात आणि सुट्टीत मी रोटरीतर्फे अंधजनांच्याकरता चालणाऱ्या कार्याला मदत करीत असे. संपूर्ण पूर्व अमेरिकेच्या रोटरी क्लबपुढे मी व्याख्याने दिली. अनेक वेळा रेल्वेगाड्यात कुत्र्यांना परवानगी नसे. अशा वेळी माझ्या कायद्याच्या ज्ञानाच्या आधारे मी रेल्वे नियमात सुधारणा करवण्याकरता प्रयत्न केले. रुझवेल्ट नुकतेच अध्यक्ष झाले होते. त्यांची मी भेट घेतली. पुढे एलेनॉर रुझवेल्टच्या हाताखाली मी गर्ल स्काऊटचे काम चालवले आणि पहिली अंध गाईडस्ची तुकडी उभारली. या कामाकरता मला अनेक वेळा वॉशिंग्टनला जावे लागे. त्यामुळे माझा फोटो वृत्तपत्रात अनेक वेळा येत असे. माझी मुलाखत घेणाऱ्या वार्ताहरांच्यामार्फत मी अंधजनांच्या सोयी–सवलतींसाठी प्रयत्न करीत असे. उदाहरण म्हणजे विमानात अंधांचे कुत्र्याला वेगळा आकार पडत असे. माझ्या आणि बेबच्या प्रयत्नाने एकच तिकीट घेण्याचा नियम विमान कंपन्यांनी मान्य केला.

१९३७ मध्ये रोटरीशी संबंधित माझ्या आयुष्यात अतिशय लक्षणीय गोष्ट घडून आली. रोटरीचे श्री. हॅमिल्टन यांनी मला बोलावून

सांगितले, 'आंतरराष्ट्रीय रोटरीच्या नीस (फ्रान्स) येथे होणाऱ्या परिषदेच्या कार्यक्रम प्रमुखांशी मी आताच बोललो. या जागतिक संघटनेच्या अधिवेशनापुढे बोलणारी पहिली स्त्री होण्याचा मान तुला मिळाला आहे!' माझ्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले.

हा अनुभव खरोखर अविस्मरणीय होता. प्रेक्षकांची प्रचंड संख्या अजमावण्यास डोळ्यांची जरूरी लागतेच असे नाही. माझ्यावर खिळलेले १२००० डोळे मला जाणवत होते. मी बेबच्या आधाराने संकोचून उभी होते. माझी ओळख करून देण्यात आली...' धिटुकली मुलगी...स्वतःच्या हिंमतीवर कॉलेज शिक्षण...उत्तम यश...स्वतःच्या प्रयत्नाने सर्व काही प्राप्त केले...

'आणि बेबच्या मदतीने'

'होय. बेबच्या मदतीने.' मला माईकपुढे नेण्यात आले.

भाषणाला सुरुवात करताच माझी भीती पळाली. किती झाले तरी रोटरीचे लोक मला घरच्यासारखेच होते. अनेक रोटरी क्लबपुढे मी वर्षानुवर्षे बोलतच होते. त्यामुळे मी मनापासून बोलत होते. माझ्या शिक्षणाकरता आणि प्रगतीकरता प्रयत्न करणाऱ्या रोटरी क्लबचे मी आभार मानले. माझ्यावर या लोकांच्याकडून होणाऱ्या प्रेमाच्या आणि मदतीच्या वर्षावाबद्दल मी आनंद व्यक्त केला. बेबचेही मी गुणवर्णन केले. आणि संपूर्ण आयुष्य अंधजनांना, समान अधिकार आणि समान संधी मिळवण्याकरता धडपडण्याचे माझे ध्येय मी सांगितले!

मला स्वतःला भाषण काही फार चांगले वाटले नाही. पण नंतर दीर्घकाळ झालेल्या टाळ्यांच्या प्रचंड कडकडाटाने मी भांबावून गेले. मला माझ्या जागेवर नेऊन बसवणारे रोटेरिअन म्हणाले, 'पोरी, तू आज मला रडवलंस. सध्या कुणाला जमत नाही हे!'

नीसचे संमेलन यशस्वी करण्याकरता तिथल्या रोटरी सभासदांनी विशेष मेहनत घेतलेली होती. विशेष गोष्ट म्हणजे २५० फ्रेंच आणि १५० जर्मन रोटेरिअनांनी आपले राष्ट्रध्वज आणि रोटरी चिन्ह या खाली उभे राहून मैत्रीची शपथ घेतली. (आपल्याकडे भारतीय आणि पाकिस्तानी रोटेरिअन्सनी अशी शपथ घेण्यासारखे हे आहे.) जुलै आणि ऑगस्टमध्ये २००० फ्रेंच आणि जर्मन मुलांना सांस्कृतिक देवाणघेवाण कार्यक्रमाद्वारे एकमेकांच्या देशात पाठवण्याचेही ठरले. या वातावरणात आणखी काही दिवसांतच महायुद्ध सुरू होईल, यावर कोणाचा विश्वासही बसला नसता!

नीस संमेलनानंतर मी आमच्या रोटरी क्लबतर्फे जर्मनीची सफर केली. जर्मन रोटेरिअन्स मनापासून मैत्रीला महत्त्व देणारे होते. मला आजही खात्री आहे की, आपले देशप्रमुख आणि त्यांचे साहाय्यक यांचे मनात घोळणाऱ्या योजनांची त्यांना त्यावेळी कल्पनाही नसली पाहिजे. त्यांच्याबरोबर मी म्युनिचला भेट दिली. बीअर बगीचे, पुष्पवाटिका, नौकाविहार, पुराण्या किल्ल्यांच्या सहली यात भाग घेतला. अंध स्त्रीपुरुषांना खास शिक्षण देऊन कारखान्यातील कामाकरता तयार करणाऱ्या खास शाळांना मी भेटी दिल्या. कारखान्यात काम करणारे अंध कामगार आणि त्यांनी दाखविलेली उत्तम कारागिरी अनुभवून मी थक्क झाले.

अपंग लोकांचा हिटलरला एवढा कळवळा येण्याचे खरे कारण मला तेव्हा कळले नाही. शक्य तेवढ्या अपंग लोकांना कारखान्यात अडकवून धट्टेकट्टे लोक लष्करी कार्यासाठी त्याला मोकळे करायचे होते.

'हिटलरसाहेबांना भेटायचं आहे का तुला?' एका रोटेरिअनने मला विचारले.

मला अर्थातच कुतूहल होतेच. आमची भेट ठरली गेली, पण संभाषण मात्र अगदीच असमाधानकारक झाले. हर हिटलर मला अगदीच बुजरे आणि बावरलेले वाटले. हस्तांदोलनाचे वेळी त्यांचे हात दमट लागले. त्यांचा आवाजही चाचरणारा आणि साधासुधा होता. बेबला कुरवाळण्यातच त्यांनी बहुतेक वेळ घालवला. मला तर वाटले की, त्यांना माणसापेक्षा प्राणीच जास्त आवडत असावेत.

इटलीमध्ये मुसोलिनीशी माझी झालेली भेटही अशीच साधीसुधी झाली, आणि मग लवकरच राजकीय नेत्यांना भेटण्यात मला रस वाटेनासा झाला. पण युरोपचे नागरिक मात्र अगदी वेगळे होते. थोड्याच दिवसांत बेब आणि मी दोघेच रेल्वेने सर्वत्र फिरू लागलो, लोकांना भेटू लागलो आणि हे लोकही आम्हाला आतिथ्यशील वाटले. मिलानहून मी व्हेसिसला गेले. तेथून पुन्हा आमच्या रोटरी गटाबरोबर मी इंग्लंडला गेले.

परत आल्यावर मी माझ्या गटप्रमुखांना धन्यवाद देऊन निरोप घेऊ लागले. पण ते म्हणाले, 'इतक्यात आपल्याला निरोप घेता येणार नाही. आम्ही तुझ्याकरता अमेरिकेच्या सगळ्या रोटरी क्लबमध्ये कार्यक्रम ठरवले आहेत. त्यानंतर तुझी हॉलिवुडला भेट आहे! अंधसेवेच्या आमच्या योजनेसाठी निधी उभारायला आम्हाला तुझी मदत पाहिजे. शिवाय हॉलिवुडमध्ये तुझ्या मदतीने काही शैक्षणिक चित्रपट काढायचा विचार चालला आहे. थोडक्यात 'तू आता चित्रपटतारका बनणार! आहे ना तयारी?'

मी तयार असण्याचा प्रश्नच नव्हता. माझे खरे आयुष्य आता कुठे सुरू होत आहे, या सुखद भावनेने मी या कार्यात स्वतःला झोकून दिले आणि अंधनिधी जमा करायला चित्रपटांतही कामं केली.

हॅझेल हर्स्ट निधीची सुरुवातही अशीच योगायोगाने झाली. एका अंध स्त्रीच्या ऑपरेशनकरता निधी जमवण्याकरता मी एका सभेत बोलत होते. कार्यक्रम संपल्यावर एक रोटरी सभासद आले आणि ५ डॉलर माझ्या हातात कोंबून म्हणाले, 'हे कोणातरी गरजू अंधव्यक्तीकरता खर्च करा.'

दुसऱ्या दिवशी न्याहारीच्या वेळी कालच्या कार्यक्रमावर चर्चा चालली असताना मी सभेच्या चालकांना ते पाच डॉलर्स दिले आणि त्याचे काय करावे असे विचारले. यावेळी अनेक रोटरी सभासद उपस्थित होते. त्यांतील एकाला कल्पना सुचली. 'आपण तुझ्या नावाने एक निधी उभारू. त्यातून मार्गदर्शक कुत्रे शिकवून अंधांना पुरवता येतील. तुझ्या व्याख्यानाद्वारे मिळणारे पैसे या निधीत जमा करता येतील...'

मला काही कळायच्या आत या निधीची स्थापना झालीही आणि कॅलिफोर्नियातील बडे बडे राजकीय नेते, शिक्षणतज्ज्ञ आणि चित्रपट व्यावसायिक त्याचे संचालक बनले. कार्यालयासाठी इमारत बांधायला लगेच सुरुवात झाली. मी जवळ जवळ स्वर्गातच होते... पण इमारतीच्या उद्घाटनाच्या थोडे आधीच– ९ वर्षांची बेब आजारी पडली आणि मरण पावली.

बेबला मृत्यू सहजपणे आला नाही. शूरपणाने ती मृत्यूशी झगडत होती. तिच्या प्रकृतीची वार्तापत्रे रोज देशभर पाठविली जात असत. एका हॉटेलात तिला खास खोली दिली होती आणि एक तज्ज्ञ प्राणिवैद्य तिच्यावर उपचार करीत होते. तिची प्रकृती जास्त खालावली तेव्हा सॅनफ्रॅन्सिस्कोहून आणखी एक वैद्य विमानाने आले. अनेक मित्र तिच्या समाचाराला येत असत. तीही शेपटी हलवून सर्वांचे स्वागत करी. सावध होती तोपर्यंत ती माझ्याकडे दृष्टी लावून होती. पण कशाचाही उपयोग झाला नाही. एका दुःखद संध्याकाळी मी अनिर्बंधपणे रडत असतानाच माझ्या मिठीतील तिचा देह निश्चल झालेला मला जाणवला.

बेबचे अंत्यसंस्कार हॉलिवुडमधील एका पाळीव प्राण्यांच्या दफनभूमीत पार पडले. तिच्या प्रेतयात्रेत १७ गाड्या सामील झाल्या होत्या. दुःखाने व्याकुळ झालेल्या मला त्यावेळी समजले की, आपण अभिमान बाळगत असलेला आपला स्वतंत्रपणा, बेबबरोबरच संपला होता.

एका दृष्टीने बेबचा अंत आणि अंधसंस्थेची सुरुवात हे थोड्याफार फरकाने घडून आले हे बरेच आहे. कारण मला पुन्हा एकदा असाहाय्य अंधांची अवस्था काय असते याचा अनुभव आला आणि अशा व्यक्तींना मदत मिळवून देण्याचे काम मी दुप्पट जोराने सुरू केले.

इतके दिवस मी कोणाही अपंग माणसाविषयी व्यक्तिगत विचार केलाच नव्हता. माझे काम होते निधी गोळा करण्याचे. रोटरीच्या आज्ञेनुसार मी गावोगाव जात असे. माझे काम मजेत आणि दणक्यात वजावीत असे. आणि मिळालेले पैसे चालकांचे स्वाधीन करताना कॅमेरेचे दिशेने हसत असे. काही तासांतच मी माझ्या पुढच्या कामगिरीवर निघे, आणि त्यामुळे उभारलेल्या पैशाचा ज्यांना प्रत्यक्ष उपयोग व्हायचा अशा लोकांची आणि माझी गाठही पडत नसे ! या दृष्टीने ही अंधसेवा अगदी वरवरची होती.

अंधसंस्था सुरू होताच हे सर्व बदलले. मी माझ्या नवीन कुत्र्याला स्वतःच शिकवून तयार केले होते आणि ती मला झिडकारणार तर नाही ना, या विचाराने मी घाबरलेही होते. (कारण काही वेळा मालकाबद्दल कुत्र्याची निराशा झाली तर तो त्याचं आज्ञापालन करायचं सरळ सरळ नाकारतोच !) बॉनीने माझा स्वीकार करताच मला आनंद झाला. अशा मदतीशिवाय पडणारी बंधने आणि त्यांतून मुक्त होण्याचा आनंद मी अनुभवला असल्यामुळे, मला हा अनुभव इतर सर्व अंधांना मिळायला हवा असे तीव्रतेने वाटू लागले. आमचे कुत्रे स्वीकारणाऱ्या अंधांच्याकडे मी व्यक्तिशः लक्ष देऊ लागले. या काळात मी मानसिकदृष्ट्या आणि आध्यात्मिकदृष्ट्याही बरीच प्रगती केली आणि याकरता आवश्यक असे योग्य कामही मला सुदैवाने करायला मिळाले.

तोपर्यंत बाहेरच्या जगात वेगळ्याच घटना घडत होत्या. रोजच्या बातम्यांत युद्ध जवळ येत चालल्याचे जाणवत होते. नाझी जर्मनीत रोटरी सभांना बंदी घालण्यात आली होती. जर्मन रोटेरिअन्सनी काही केले म्हणून नव्हे, तर रोटरी आंतरराष्ट्रीय होती म्हणून !

थोड्याच दिवसांनी इंग्लंड युद्धात उतरल्याची बातमी आली. स्वतः हिटलरनेच मला अंध आणि अपंग लोकांच्याकडून किती उत्तम काम करून घेता येते ते शिकवले होते. आता त्याचे ज्ञानाचा उपयोग करून घ्यायची वेळ आली होती.

लॉकहीड विमान कारखान्यात एक अपघात झाला आणि एका महत्त्वाची कामे पार पाडणाऱ्या कामगाराचे डोळे गेले. त्या कामगाराला पुन्हा शिक्षण देण्याकरता आमच्याकडे पाठवण्यात आले. थोड्याच दिवसांत तो पुन्हा कामावर रुजू झाला आणि पूर्वीच्याच शिताफीने आणि उत्पादनात घट न येऊ देता त्याने कामाला सुरुवात केली. वृत्तपत्रांनी मोठाले मथळे देऊन ही बातमी जाहीर केली आणि केवळ अंधपणामुळे निष्क्रियपणे दिवस कंठणाऱ्या, पण हुशार आणि धडधाकट लोकांच्या अर्जांचा लॉकहीडवर वर्षाव होऊ लागला. अल्पावकाशातच लॉकहीड कारखान्यात ३०३ जागांवर अंध व्यक्तींची नेमणूक करण्यात आली. एका मोठ्या यंत्रशाळेत ३०० लोक मन लावून कामात मग्न आहेत आणि प्रत्येकाच्या बाकाखाली एक एक कुत्रा बसलेला आहे, असे दृश्य कुणी कल्पनेतही रंगवले नसेल.

त्यानंतर गुडइअर आणि आणखी एक विमान कंपनी यांनी ही कल्पना उचलली. त्याचबरोबर आम्ही नाविक दलातील अंध होऊन आलेल्या सैनिकांच्या पुनर्वसनाची कामगिरी सुरू केली. आपली प्रेयसी अंधत्वामुळे आपल्याला सोडून तर देणार नाही, अशी त्यांना भीती वाटली होती. मी त्यांना सांगितले की, तुम्ही जिवंत आहात हीच या मुलींना भाग्याची गोष्ट वाटत असेल. माझा अंदाज खरा ठरला आणि अशा अनेक जोडप्यांच्या लग्नाला हजर राहण्याचे भाग्य मला लाभले.

मी स्वतः मात्र घरात एक अपंग आहे तेवढी पुरे, या विचाराने शक्यतो डोळस माणसाशी विवाह करण्याचे ठरवत होते. अशातच एकदा चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे मला व बॉनी कुत्रीला भोजन समारंभाचे मुख्य पाहुणे म्हणून बोलावणे आले, त्यावेळी मला ज्याचा आवाज आणि स्पर्श रोमांचकारी वाटला अशी एक व्यक्ती मला भेटली. त्याचे नाव जॉर्ज होते आणि तो चेंबरचा उपाध्यक्ष होता. लवकरच त्याने माझ्याशी विवाहाचा प्रस्ताव मांडला. बॉनीलाही तो पसंत असल्यामुळे मी होकार दिला आणि आमचा विवाह झाला.

मला मूलबाळ होण्याची शक्यता नव्हती, हे मला लहानपणापासून ठाऊक होते आणि हे माहीत असूनही जॉर्ज विवाहाला तयार झाला होता. पण घरट्यात पिले असल्याशिवाय कुठल्या स्त्रीला बरे वाटेल ! मी जॉर्जला म्हटले, आपल्याला मुले होणार नसली तरी अनेक मुले आईबाप नसणारी असतीलच आपण असेच एखादे मूल सांभाळू या !

आम्ही या विषयावर बरीच चर्चा केली. आपणाला मूल सांभाळणे परवडेल का, माझ्या कामाच्या वेळात मुलाची काळजी कुणी घ्यायची, असे अनेक प्रश्न होते. मला मूल सांभाळणे जमेल की नाही अशी शंका मात्र जॉर्जने कधीही व्यक्त केली नाही. त्याबद्दल मनातल्या मनात मी त्याला धन्यवाद दिले. आम्ही इतका वेळ बोलत होतो की, आम्हाला दोघांनाही आपापल्या कामाला जायला उशीर लागला. शेवटी एकच प्रश्न उरला.

'मुलगा की मुलगी ?' जॉर्जने विचारले.

'मुलगी.' मी ठामपणाने उत्तर दिले.

मला मुली फार आवडत. त्यांचे मऊ मऊ केस, लडिवाळ वागणूक, शिवाय मला मुलींच्या टोप्या बनवता येत. पण त्याहीपेक्षा महत्त्वाचे

कारण म्हणजे, मी हॉलिवुडमध्ये काम करत असताना, कुरळ्या केसांची आणि मोहक वागणुकीची शर्ले टेंपल नावाची बालनटी बेब बरोबर खेळायला माझ्या खोलीत येत असे तिची आठवण.

एके दिवशी फोन वाजला आणि न्यूयॉर्कमधल्या एका समाजसेवकाने आमच्याकरता एक मुलगा पैदा केल्याचे सांगितले. आम्ही त्याचे नाव छोटा जॉर्ज ठेवले. त्याचे खूप कौतुक केले आणि मी लगेच त्याच्याकरता बाजारहाट सुरू केला.

पण माझी मुलींची गलती काही वाया गेली नाही. सहा महिन्यांतच एका छोट्या मुलीला घराची जरूर असल्याचे आम्हाला कळले. तिलाही आम्ही घरात सामील केले आणि तिचे नाव कॅरोलीन ठेवले. तिचेही केस मला हवे होते तसे मऊ मऊ कुरळे होते. आणि ती हसताना घशातून खळखळ आवाज करत असे.

आता मात्र माझ्या आयुष्याला परिपूर्णता आली होती. एकेकाळी अंधसंस्था हेच माझे सर्वस्व होते. आता देखील माझ्या व्याख्यानाचे द्वारे मी संस्थेला पैसे मिळवून देत होते, पण क्वचित केव्हा. रोज रोज घरापासून दूर राहाण्याचा मला कंटाळा येई आणि मी जास्तीत जास्त काळ घरी राहाण्याचा प्रयत्न करी.

हळूहळू मुलांचे संगोपन मला छान जमू लागले. बॉनी देखील माझीच दोन उपांगे समजून मुलांची काळजी घेत असे...कोणी आगाऊपणा केला की बॉनी त्याला पकडून घरात आणत असे.

पण सुख कधी कायम राहत नाही. छोटा जॉर्ज ३॥ वर्षाचा असतानाच माझे पती अचानक अपेंडिसायटिसच्या दुखण्याने स्वर्गवासी झाले. सर्व काही इतक्या अचानक घडले मी अंत्यसमयी त्यांना भेटू शकले नाही. अतिव दुःखाने मी घरी आले आणि छोटा जॉर्ज, कॅरोलिन, मी आणि बॉना यांच्या जीवनातले वेगळेच पर्व सुरू झाले.

बऱ्याच काळानंतर मला अमेरिकन महसूल खात्यात काम मिळाले, आणि स्वतःच्या जोरावर दोन्ही मुलांना वाढवून त्यांचे शिक्षण पूर्ण केले. कॅरोलिनचा विवाह झाला असून ती माताही बनली आहे. छोटा जॉर्ज अणुवैद्यक क्षेत्रात नाव काढत आहे.

माझ्याबद्दल म्हणाल तर गेल्या तीन वर्षांत माझ्या हृदयावर दोन शस्त्रक्रिया झाल्या, मांडीचा सांधा चारवेळा मोडला आणि जोडला. ( नीट जोडला गेला नाहीच ) आणि सध्या चाकाच्या खुर्चीत बसून मी फिरत असते. माझा शेवटचा मार्गदर्शक कुत्रा माझ्या पहिल्या ऑपरेशनपूर्वीच मेला आणि सध्या मी चालतच नसल्यामुळे दुसरा कुत्रा आणलाच नाही. तरीही मी भरपूर काम करते. टी. व्ही. कार्यक्रमात मला चर्चेला बोलावतात, रेडिओवर कार्यक्रम मी लिहून पाठवते, रोटरी वा लायन्सतर्फे होणाऱ्या अंध-निवारण कार्यक्रमांना मदत करते.

मी कुठेही गेले तरी रोटरीने माझ्याकरता केलेल्या कार्याची मी माहिती सांगते. मी लहान असल्यापासूनच हे रोटरी चक्र माझ्याकरता फिरले नसते, तर माझे आयुष्य अगदीच रिकामे आणि निष्फळ झाले असते. रोटरीच्या मदतीने ते समृद्ध, सुखी आणि समाधानी झाले आहे.

त्यामुळेच जगातील सर्व रोटरी सभासदांना माझे अंतःकरणपूर्वक धन्यवाद !

□ □

---

## अविकसित जग : पृष्ठ ८ वरून

विकसनशील राष्ट्रांच्या दृष्टीने आणखी एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे कच्च्या मालापासून तयार माल बनविणारे कारखाने उभारण्यासाठी त्यांना मदत करण्याचा. संपन्न राष्ट्रे आणि गरीब राष्ट्रे यांच्यातील हितसंबंधांचा संघर्ष यात येतो. अविकसित राष्ट्रे स्वतःच कच्च्या मालापासून तयार माल बनू लागली तर, मग संपन्न राष्ट्रांचा तयार माल ही राष्ट्रे कशाला घेतील ? आपला तयार माल खपविण्यास अविकसित राष्ट्रे ही त्यांची मोठी बाजारपेठ होती व आहे. या व्यापारातून मिळणाऱ्या उत्पन्नावरच विकसित राष्ट्रे गबर झाली. अविकसित राष्ट्रांची पिळवणूक करूनच त्यांनी मोठा नफा आतापर्यंत मिळविला. अविकसित राष्ट्रेच विकसित झाली तर, हे साधणार नाही म्हणून या राष्ट्रांना मागासलेले ठेवण्याचाच त्यांचा प्रयत्न असतो. असे धोरण उघडपणे ठेवता येत नाही म्हणून अविकसित राष्ट्रांना थोडीशी मदत दिली जाते, काही उद्योगधंदे, कारखाने उभारू दिले जातात, पण मदतीचा हा देखावा करताना या राष्ट्रांना अजून दीर्घकाळ अवलंबून राहावे लागेल हे धोरण ठेवूनच ही मदत दिलेली असते. संपन्न राष्ट्रे हा दृष्टिकोन बदलायला तयार होत नाहीत, तोपर्यंत श्रीमंत राष्ट्रे आणि गरीब राष्ट्रे यांच्यांतील दरी कमी होण्याचा संभव नाही. ही दरी कमी न होता वाढतच आहे असा एका पाहणीचा निष्कर्ष आहे.

विकसनशील राष्ट्रांनी विकसित राष्ट्रांशी संघर्षाची भूमिका न घेता सहकार्याची भूमिका घ्यावी असे अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री डॉ. किसिंजर यांनी परिषदेपुढील भाषणात सांगितले. संघर्षाची भूमिका घ्याल तर, त्यात तुमचीच हानि होईल. आम्ही तुम्हाला पुरून उरू अशी धमकीही त्यांनी दिली, पण अशा धमक्यांना विकसनशील राष्ट्रे आता भीक घालणार नाहीत. संघटित होऊन स्वतःच्या सामर्थ्याच्या बळावर आपल्या मागण्या त्यांनी मिळविल्या पाहिजेत. त्यासाठी एक आवश्यक गोष्ट म्हणजे बड्या राष्ट्रांच्या गटात सामील न होता व त्यांचे कोणतेही दडपण न मानता स्वतंत्र धोरण त्यांनी स्वीकारले पाहिजे. विकसनशील राष्ट्रांना या प्रयत्नात यश येणे त्यांची एकजूट टिकण्यावर अवलंबून आहे. □

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**१५।५।७६ ते २१।५।७६**

**मेष : उद्योग सुधारेल**

चौथा शनि-मंगळ व दुसरा शुक्र-रवी या ग्रहांच्या दृष्टिक्षेपात तुमचे या आठवड्याचे दैनंदिन जीवन प्रवासकारक आहे. प्रामुख्याने आर्थिक बाजू बरीच भक्कम होणार आहे. लॉटरी व रेस यांपासून फायदा होईल. रमीपासून धनलाभ होण्याची शक्यता आहे. कापड व तयार कपडे यात भागीदार घेतल्यास खूपच फायदा होईल. कृषी पदवीधर व शेतीचे अभ्यासक यांना आठवडा लाभदायक होईल. नोकरीत प्रमोशन व पगारवाढ होईल. खते, सामान्य प्रशासन, इंजिनिअरिंग उद्योग, महसूल खाते व जमीन सुधारणा यात काम करणारे लोक नशिबवान ठरावेत. शुभ दिनांक १५–१८–१९

**महिलांना :** नोकरीसाठी प्रयत्न करावेत. जमिनीसाठी प्रयत्न करावेत. आर्थिक बाजू सुधारेल. चालू व्यापारात प्रगती होईल.

**विद्यार्थ्यांना :** प्रेमात सफलता मिळेल. छोट्या बचतीच्या योजनेत भाग घ्या.

**वृषभ : महत्त्वाचा बदल**

आठवडा छान आहे. रवी पहिला झाला आहे. शुक्र पहिला झाला आहे. ही ग्रहरचना तुम्ही लक्षात घेतली तर अनेक बाबतीत तुमची धाव प्रगतीकडे होऊ शकेल. उद्योगात सुधारणा करण्याचे मनोरथ पूर्ण होईल. प्रामुख्याने प्रकाशन, मुद्रण, इंजिनिअरिंग उद्योग, खते, कापड हे उद्योग व त्यांत काम करणारे लोक यांना भरभराटीचा जाईल. परदेशी जाण्यासाठी ज्यांना प्रयत्न करायचे असतील त्यांनी ते करावेत. पैशाची अडचण दूर होऊ शकेल. कर्ज व इतर मार्गाने पैसे मिळवण्याचे प्रयत्न सफल होतील. नोकरीत पुढे पाऊल पडेल. बेकारांच्या प्रयत्नाला यश येईल. शुभ दिनांक १६–१८–१९

**महिलांना :** भरतकाम व शिवणकाम; गायन अगर नृत्य या क्षेत्रांत काम करणाऱ्यांना हा आठवडा शुभदायक आहे.

**विद्यार्थ्यांना :** पैसे मिळवून शिक्षण घेणाऱ्यांना समाधान मिळेल.

**मिथुन : खर्च आटोक्यात ठेवा**

बारावे रवी-शुक्र बचतीच्या बाबतीत बरेच अडथळे आणणार आहेत. ज्यांना उद्योगासाठी कर्ज काढावयाचे असेल त्यांना ते मिळेल. पण व्याज मात्र जास्त द्यावे लागेल. विवाहेच्छु तरुणांनी तडजोडीची भूमिका ठेवावी. तुम्ही जर स्वतःचे प्रकाशन सुरू करणार असाल, तर त्याचे स्वरूप ललित व संमिश्र असे ठेवा. राजकारणात फारसा भाग घेऊ नका. राजकारणी व्यक्तींबरोबर फारसे संबंध ठेवू नका. नोकरीत मन लागणार नाही. परंतु नोकरी हाच तुमचा धर्म असल्यामुळे नोकरीत लक्ष घाला. चालू नोकरीत कष्ट व ताण पडणार असला, तरी चीज होईल. बेकारांच्या आशाअपेक्षा सफलतेच्या दृष्टिक्षेपात येतील. प्रवास टाळा. शुभ दिनांक १६–१७–१९

**महिलांना :** माहेरवास घडेल. शुभ घटना घडून मन आनंदी व प्रसन्न राहील. लॉटरीचे तिकीट घ्या. पैशाची बाजू भक्कम राहील. तब्येत सुधारेल.

**विद्यार्थ्यांना :** परदेशपर्यटन घडण्याची शक्यता आहे. भविष्याच्या नादी लागू नका. अभ्यासात लक्ष घाला.

**कर्क : महत्त्वाकांक्षा फुलतील**

तुमच्या राशीत शनि-मंगळाची युती होऊन गेली आहे ती प्रतिकूल नाही, याचा तुम्हाला प्रत्यय आलाच असेल. शुक्र-रवी लाभस्थानी ही एकच घटना तुमच्या मनात हिरवळीचे वारे निर्माण करण्यास पुरेशी आहे. एखाद्या सत्तास्थानावरील राजकारणी व्यक्तीबरोबर स्नेहाचे संबंध जुळून येतील व आगामी योजनांचे धागे गुंफले जातील. उद्योग व नोकरी याबाबतीत तुमच्या महत्त्वाकांक्षा फुलतील. स्वतःचा स्वतंत्र उद्योग सुरू करण्याची योजना कार्यान्वित होईल. त्यासाठी गाठीभेटी घेऊ शकाल. चालू नोकरीत सुखकारक व मन उत्साही होईल. असे काहीतरी घडू शकेल. आर्थिक बाजू सर्वसामान्य बरी राहील. बेकारांची वणवण निश्चित संपेल. शुभ दिनांक १७–१८–२०.

**महिलांना :** लॉटरीत धनलाभ होईल. माहेरची मिळकत व संपत्ती मिळण्याची शक्यता आहे. नोकरीचे प्रयत्न सफल होतील

**विद्यार्थ्यांना :** उद्योग व शिक्षण याबाबतीत प्रगतीचे नवे पर्व सुरू होईल.

**सिंह : स्थानांतराची शक्यता**

राशिस्वामी रवी व तूळ राशीचा स्वामी शुक्र दशमस्थानी आहेत, ही एकच शुभघटना या आठवड्यात महत्त्वाची आहे. विशेषतः राजकारण व नोकरीतही एक अत्यंत महत्त्वाची घटना ठरावी. तुम्ही जर यावेळी विशेष महत्त्वाची जबाबदारी उचलून किंवा एखादी खास योजना आखून वरिष्ठांकडे तुमची मागणी केली, तर ती मान्य होईल. व्यापारीवर्गाने वायदे करताना काळजीपूर्वक करावेत. सेवानिवृत्तांना पुन्हा काम मिळेल. उद्योगात प्रगतीचा नवा टप्पा गाठू शकाल. जमिनीच्या व्यवहारात फायदा झाला तरी खर्चही फार होईल. मानापमानाच्या कल्पनांना मनात फारसे स्थान देऊ नका. स्थानांतर घडणार आहे. ते वाईट असेल असे समजू नका. विवाहेच्छू तरुणांचे विवाह ठरतील. शुभ दिनांक १६–१७–१९.

**महिलांना :** सार्वजनिक सेवेचे योग्य फल पदरात पडेल. बेकारी असेल तर काम मिळेल. प्रवास टाळा. शेजाऱ्यांबरोबरच्या भांडणात भाग घेऊ नका.

**विद्यार्थ्यांना :** मनोरथ पूर्ण होतील. सिनेमाच्या नादी लागू नका मोहाला बळी पडू नका.

**कन्या : थोडी सुधारणा**

भाग्यस्थानी रवी-शुक्र तर लाभस्थानी शनी-मंगळ अशी ग्रहरचना असताना तुम्हाला कोणती चिंता आहे ? तुमची तब्येत नेहमीच तोळा-मासा असते. उन्हाळ्याच्या अतिशय त्रासाने तुम्हाला त्रास दिला, पण आता तब्येत सुधारणार आहे. थांबलेले उद्योग-व्यवसाय पुन्हा व्यवस्थित सुरू करण्याच्या दृष्टीने योजना आखू शकाल. त्यासाठी तुमच्याभोवती अनुकूल परिस्थिती निर्माण होईल. मन व शरीर उत्साही राहील. कामाचा वेग वाढेल. नोकरीत कामाचा ताण वाढला तरी कार्यक्षमतादेखील वाढेल. नव्या कामाची जबाबदारी घ्यावी लागेल. वरिष्ठांची मर्जी राहील. अनेक प्रकारच्या कल्पना सुचतील. त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी सहकार्य राहील. आर्थिक परिस्थितीत थोडीफार सुधारणा होईल. शुभ दिनांक १६–१९.

**महिलांना :** संशयाच्या आहारी जाऊ नका. तब्येत सुधारू लागेल. उन्हाळ्याचे विकार कमी होऊ लागतील. मन उत्साही राहील.

**विद्यार्थ्यांना :** थोडीफार पैशाची टंचाई भासली तरी फारसा त्रास होणार नाही. अभ्यास व्यवस्थित चालू होईल.

## तूळ : नोकरीत प्रगती

आठवे रवी-शुक्र शारीरिक असमाधान देणार असले, तरी त्यामुळे तब्येतीला त्रास नाही. मोह व अविचार यावर ताबा ठेवा. पत्नीला काही दिवस माहेरी पाठवून वाचन-चिंतन करा. नवविवाहितांनी याबाबतीत अधिक काळजी घ्यावी. व्यापारी क्षेत्रात नवे काही तरी घडू शकेल. तयार कपडे, साड्यांचा व्यापार तेजीत येईल. हा आठवडा एकूण प्रगतीचाच आहे. नोकरीत फार छान घटना घडू शकतील. विशेषतः कृषि, विज्ञान, वाणिज्य, संशोधन इत्यादी विषयांशी संबंधीत बेकारांना चांगले दिवस आहेत स्वतंत्र अगर नोकरी असे काहीही होऊ शकेल. तुमच्यापैकी एखादा भाग्यवान परदेशी जाऊ शकेल. चालू नोकरीत समाधान. शुभ दिवस १७–२०.

**महिलांना :** आठवडा लाभदायक आहे. सिने-नाट्य क्षेत्रात प्रसिद्धी मिळेल. लेखिकांना मागणी येईल. हातून प्रभावी लेखन होईल.

**विद्यार्थ्यांना :** अंगात असलेल्या गुणांना प्रोत्साहन व वाव मिळेल. प्रवास घडेल.

## वृश्चिक : थोडा लाभ होईल.

भाग्यस्थानी शनि-मंगळाची युती होऊन गेली आहे ती तुम्हाला वाईट नाही. सुधारणेचे युग सुरू होईल. नोकरी व धंद्यातील अडचणीतून मार्ग कसा काढावा हे सुचेल. अनेकांचे सहकार्य मिळेल. उद्योगपती व मोठे शेतकरी यांचे मार्गदर्शन मिळेल. शेतीचा व्यवसाय मार्गी लागेल. अडचणी दूर होतील. कर्ज मिळू शकेल. शेतीच्या कामात काही तरी नवे करू शकाल. नोकरीत अडचणी नाहीत. वरिष्ठांबरोबरचे संबंध सुधारतील. खासगी नोकरीत मालकांबरोबर जवळीक होईल. हिशोबाच्या कामात काटेकोर राहाणे हिताचे होईल. पैसा वापरताना काळजीच्या उसनवारीचे व्यवहार करू नका. शुभ दिनांक १८, २१, २२.

**महिलांना :** घरगुती कापड खरेदी वा इतर खरेदी करताना फसवणूक होणार नाही याची काळजी घ्या.

**विद्यार्थ्यांना :** नट होण्याच्या कल्पनेला बळी पडू नका. आठवडा प्रगतीचा आहे.

## धनु : विरोध मावळेल

शनि–मंगळाची युती अष्टमस्थानी झाली म्हणून तुम्हाला अनेकांनी घाबरून सोडले होते, परंतु तुम्ही त्यावर विश्वासून राहू नका असे मी तुम्हास यापूर्वीच सांगितले होते त्याचा प्रत्यय आता अधिक प्रकर्षाने येणार आहे. गेले काही दिवस पैशासाठी फार जिकजिक करावी लागली असेल परंतु त्यातून हळूहळू तुम्ही बाहेर पडणार आहात. एकदम जरी पैसा मिळाला नाही तरी तो गरजेपुरता निश्चितच मिळेल. जन्मस्थ ग्रह अनुकूल असतील तर यावेळी रेस–लॉटरीपासून लाभ होईल. परिश्रमाचे चीज होईल. पूर्वी काम करून ज्याचा मोबदला मिळाला नसेल त्याचा मोबदला आता मिळू शकेल. नोकरीची परिस्थिती सुधारणार आहे. संबंध सुधारतील प्रतिष्ठा उंचावेल. तुटलेले संबंध पुन्हा जोडले जातील. तब्येत सुधारेल. शुभ दिनांक १७, १९, २०.

**महिलांना :** शारीरिक त्रास कमी होईल. स्वतःच्या उद्योगात प्रगती करू शकाल. अनपेक्षित अर्थलाभ होईल.

**विद्यार्थ्यांना :** वाहन घेण्याची इच्छा दृष्टीपथात येईल. चांगले मित्र मिळतील. मन उत्साही राहील.

## मकर : सुधारणेची चाहूल

यावेळच्या तुमच्या यशापयशाची सूत्रे रवी, शुक्र यांच्या हाती आहेत. मात्र त्याचा चांगला उपयोग करून घेता येईल. तसा त्याचा प्रतिकूल परिणामदेखील होऊ शकेल. प्रामुख्याने ज्यांची उष्ण प्रकृती आहे, त्यांनी स्त्री सहवास कटाक्षाने टाळावा. व्यापारी क्षेत्रात जे लोक वावरत आहेत त्यांना सोने, चांदी, रेशीम, उंची कापड यापासून फायदा होईल. कायद्याला धरून सारे हिशेब ठेवणे मात्र अत्यंत आवश्यक आहे. नोकरीधंद्यात सुधारणा होईल. नोकरीची परिस्थिती सुधारणार आहे. कामानिमित्त प्रवास घडेल. बेकारांच्या पुढील समस्या चटकन सुटू शकतील. वरिष्ठांची मर्जी राहिली तरी गैरफायदा घेऊ नका. पैसा खर्च करताना काळजी घ्या. शुभ दिनांक १७, २०

**महिलांना :** आरोग्याच्या काल्पनिक त्रासाने मन अस्वस्थ करून घेऊ नका. रोज ठराविक उपासना करा. कार्यक्षमता वाढेल.

**विद्यार्थ्यांना :** शेतीची आवड उत्पन्न होईल. जिद्द व महत्त्वाकांक्षा यांनी मन भारावून येईल.

## कुंभ : अडचणीवर मात

मागच्या आठवड्यापेक्षा हा आठवडा जास्त लाभदायक व प्रगतीचा जाणार आहे. एखादा महत्त्वाचा पत्रव्यवहार अनेक दिवस चालू असेल तर त्याची आशादायक परिणती यावेळी दिसून येईल. अनेक लाभ दृष्टिपथात येतील. स्थावराच्या व घराच्या अनेक समस्या सुटू लागतील. पैशाची अडचण उरणार नाही. जमिनीच्या खरेदीचा अगर विक्रीचा व्यवहार सुरळीत पार पडू शकेल. वकिलीचा व्यवसाय बहराला येईल. बुद्धिमत्तेची कसोटी लागेल. शिक्षणाची इच्छा पुरी होईल. प्रतिष्ठा उंचावेल. दुय्यम व्यवसाय व व्यापार अंग धरील. नोकरीत स्थानांतर पण प्रमोशन मिळून होईल. सरकारी नोकरीत जास्त हितकारक घटना घडू शकतील. अनपेक्षित अर्थप्राप्ती होऊ शकेल. शुभ दिनांक १७, २०.

**महिलांना :** नोकरीत हिताचे घडू शकेल. हाती घेतलेले काम पुरे होईल. मनाला उत्साह राहील.

**विद्यार्थ्यांना :** सार्वजनिक कामात पुढाकार मिळेल. नोकरीचे प्रयत्न आकार घेतील.

## मीन : कमालीचे यश

हा आठवडा अनेक दृष्टीने महत्त्वाचा ठरावा असाच आहे. तिसरा रवी–शुक्र, दुसरा गुरू व पाचवा शनी–मंगळ अशी ग्रहरचना असताना तुम्ही केवळ हातावर बसून कसे चालेल ? लेखकांना नवी स्फूर्ती मिळेल. या राशीचा नाटककार व त्यात काम करणारा कलावंत यावेळी कमालीचे यश मिळवतील. पैसा व प्रतिष्ठा मिळू शकेल. साधुसंतांचे दर्शन घडेल. माया व ममता मिळू शकेल. नातेवाईक व मित्र यांच्याकडून कौतुक करून घेण्याची संधी मिळेल. बेकारांना आता कोणताच वनवास शिल्लक उरलेला नाही. नोकरीची स्थिती अतिशय उत्तम राहील. प्रमोशन मिळू शकेल. त्याचबरोबर नवी महत्त्वाची जबाबदारी पडेल. शुभ दिनांक १९, २१.

**महिलांना** धार्मिक कामात मान मिळेल. प्रतिष्ठेची जागा मिळेल. पैसा भरपूर मिळेल.

**विद्यार्थ्यांना :** परदेशी विशेष अभ्यासाची संधी मिळेल. परीक्षेचा निकाल आनंद मिळवून देईल.

□

# परंतू दादा कोंडके सोंगाड्ये इतुके झाले!



नंदू राजे

## लेखांक सात

**अलिकडेच या लिखाणाच्या संदर्भात मराठी साहित्यातले एक नामवंत कवी मला म्हणाले की, बाकी सर्व ठीक आहे पण लेखक म्हणून मी आणि विषय म्हणून दादा कोंडके यांपैकी कुणी तरी एक वसंतराव सबनिसांची वाजवी काँट्रिब्यूशन मान्य करत नाही असं त्यांना वाटतं....**

'बाबांनी सोंगाड्याच्या कथेचा आराखडा दिला आणि आपण आइच्यान टरकून गेलो. बाबांना म्हणाय लागलो की, हा नाम्या काही आपल्याला पडद्यावर उभा करता येणं शक्य नाही. सोंगाड्यातला नायक होता नाम्या नावाचा खुळा, बावळा, निष्पाप, खेडवळ पोरगा. आईवर लय माया असलेला. तिच्या शब्दाबाहेर न जाणारा. एकदा नाम्या त्याच्या एका इब्लिस दोस्ताखातर तमाशाला जातो आणि नाचणारीणीच्या...प्रेमात पडतो. याचं तमाशाला जाणं आईला कळतं तर, याला ती घरातून हाकून घालते. नाम्या अपघातानं तमाशाच्या बोर्डावर चढतो न पब्लिकला पसंत पडून सोंगाड्या बनतो. तमाशातली बाईदेखील याच्या भोळेपणावर भाळते आणि हा पुढं लई फेमस सोंगाड्या होऊन जातो.'

: टरकलास कशाला? केवळ भूमिका जमेल की नाही ह्या भीतीनं?

'ते एक–होतंच, शिवाय इतरपण लय कारणं होतीय की, आपण आत्तादेखील स्वताला काय ग्रेट अ‍ॅक्टर वगैरे मानत नाय. आपला एक बाज आहे तो पब्लिकला पसंत आलाय एवढंच. तर तेव्हाची गोष्ट काय असणार ते तुझं तूच बघ. शिवाय आत्तापर्यंत सिनेमाच्या तमाशातला हीरो असायचा कुणी चिकणा, पटकेवाला शाहीरबिहीर किंवा फारतर ढोलकंवाला देखणा मरद. सोंगाड्याला हीरो करायची हिंमत नव्हती कुणालाच. पद्धतच नव्हती. बरं या स्टोरीला फरशी

कुऱ्हाडवाली हाणामारी बी नव्हती. सगळा बोज्या होता सोंगाड्यावर. तो पब्लिकला धरून ठेवेल अशी खात्री कुणाला होती ? आणि माझ्या या असल्या थोबाडाच्या जोरावर ? तुला ठाऊकच आहे, पिक्चरबद्दल खात्री त्या परमेश्वराचा बा पण देऊ शकत नाय. इथं तर माझ्यापासूनच काळजी पडलेली. पण बाबांनी जोरदार तालीम द्यायला सुरवात केली आणि हळूहळू धीर चेपाय् लागला. विच्छातल्या सोंगाड्याची चळवळ काढून टाकली आणि त्याच्या जागी लय खुळं बावळं बेअरिंग बाबांनी दिलं. हजरजबाबीपणा कायम ठेवला पण तो नाम्याच्या भोळेपणातून काढायचं ठरलं. डायलॉगचं टायमिंग जरा स्लोमध्ये मारायचं ठरवलं. आणि याचं पुरं क्रेडीट बाबांनाच द्यायला पायजे. तू दिग्दर्शक म्हणून त्यांना ओळखतोस पण बाबा काय जबर-अ‍ॅक्टर आहेत हे तुला माहीत नसेल. अगदी बारीकसारीक अ‍ॅक्शन-देखील बाबांनी करून दाखवल्या न बसवून घेतल्या. एक आठवण सांगतो तुला. तांबडी मातीत अनुपमाची आई मरते म्हणून रडण्याचा शॉट होता तिला काय जमेचना डोळ्यांत पाणी आणायचं. बाबांनी धा वेळा तिला हा शॉट करून दाखवला न प्रत्येक खेपेला त्यांच्या डोळ्यातून सहज आसवं यायची. ह्याला म्हणतात अ‍ॅक्टर. आमची कसली गोष्ट त्यांच्यापुढं ' 'पण बाबांनी करून दाखवलं त्यांत तू भर घातली असणारच ?' मी दादाला मध्येच अडवलं. याच्याकडे जसा फालतू अहंकार नाही तशीच खोटी मॉडेस्टीदेखील नाही हे मला अनुभवानं पक्कं ठाऊक आहेय्.

मला निट आठवतं, यावेळी मी कोचावर बसलेलो होतो न दादा समोर उभा राहून नेहमीप्रमाणं सोंगाड्याची वळणं घेत बोलत होता. यावेळी दादा एक क्षणभर थांबला होता. नेहमीप्रमाणं फटाक्यासारखं फुटणारं हजरजबाबी तोंड अणुक्षण अवाक झालं होतं....

'खरे सांगतो तुला नंद्या, बाबांनी जे करून दाखवलं त्याच्या फक्त एक चतुर्थांश मी पडद्यावर आणू शकलो.'

कधी नव्हे तो दादाचा स्वर हेलावल्यासारखं मला जाणवून गेलं होतं. तो कदाचित भासही असेल. पण यानंतर आमचं संभाषण शॉट फ्रिझ् करावा तसं थोडा वेळ थांबलं होतं हे मात्र खरं.

अलीकडेच या लिखाणाच्या संदर्भात मराठी साहित्यातले एक नामवंत कवी मला म्हणाले की, बाकी सर्व ठीक आहे पण लेखक म्हणून मी आणि विषय म्हणून दादा कोंडके यांपैकी कुणी तरी एक वसंतराव सबनिसांची वाजवी कॉन्ट्रिब्यूशन मान्य करत नाही असं त्यांना वाटतं. बाबांचं मायेचं छत्र, त्यांनी दादाला दिलेलं सहकार्य, त्यांचं आत्ताचं वय किंवा दादाची त्यांच्याबद्दल वाटणारी जवळीक यामुळं दादा कदाचित त्यांना वाजवीपेक्षा जास्त श्रेय देत असल्याचा संभव जसा नाकारता येत नाही त्याचप्रमाणं संबंध तुटल्या कडवट-पणानं सबनीसांना डावलून टाकत असल्याची ही शक्यताही संपूर्ण असंभव नाही. सोंगाड्या लागल्यानंतरं सबनीसांच्या कथा संवादा-बद्दल किंवा त्यांच्या पहिल्यावहिल्या पण दणदणीत पटकथेबद्दल मराठी टीकाकारांनी त्यांची अनेक मुखांनी स्तुती केली होती. माध्यमाशी संपूर्ण अपरिचित असतानाही त्यांची पहिली पटकथा इनकी रेखीव उतरली याचंही कौतुक झालं होतं. सिनेमासारख्या मूलतः टीम अ‍ॅक्टिव्हिटीमध्ये श्रेयांची मोजून मापटी घालणं हे सुतराम शक्य जसं नाही तसंच तसा प्रयत्न करणं हे हास्यास्पददेखील आहे असं मला ठामपणे वाटतं. पण सबनीसांचं झालेलं हे कौतुक त्यांच्या कर्तबगारीपेक्षा दादाबद्दलच्या अज्ञानातून झालं असं मला ठामपणे वाटतं. विच्छानंतर त्यांनी लिहिलेल्या एक नार चार बेजार हा वग व त्यांचाच हऱ्या नाऱ्या झिंदाबाद ही मूळात अत्यंत झकास अफलातून असलेल्या गोष्टीची पडद्यावरली कथा, पटकथा, संवाद व चित्रीकरण ही माझ्या म्हणण्याची बोलकी उदाहरणं आहेत. या बोलपटाच्या वेळीदेखील सबनीसांबरोबर सोंगाड्याचेच दिग्दर्शक गोविंद कुळकर्णीच त्यांच्या साथीला होते हे देखील बरंच काही खरं सांगून जातं. मी तर याहीपुढं जाऊन असं ठामपणे म्हणेन की सोंगाड्यापासून ते थेट त्याच्या आताच्या पाचव्या–तुमचं आमचं जमलं–चित्रपटापर्यंत त्यातली कॉमेडी, त्यांचं चित्रीकरण, त्यात असलेले संवाद ही सगळी दादाच्या अफलातून भेजातून निर्माण झालेली फळं आहेत. त्यात लेखकाचा यत्किंचितही हातभार नाही असं नाही पण सिंहाचा वाटा निश्चितपणे दादा कोंडकेचाच आहे. 'सदाशिव' नंतरच्या आंधळा मारतो डोळ्याची पटकथा होती जगदीश खेबूडकरांची–कथेचा जनक तर सांगितलाच नव्हता. पांडू हवालदारची कथा, पटकथा, संवाद राजेश मुजुमदार या दादाच्या नात्यातल्याच पण नवख्या इसमाचे. तुमचं आमचं जमलंची कथा दत्ता केशवांची तर पटकथा, संवाद पुन्हा राजेशचे. पण ही मंडळी जर का त्या त्या गोष्टींचं संपूर्ण श्रेय स्वतः-कडे घ्यायला लागली तर ती माझ्या दृष्टीनं एक अत्यंत हास्यास्पद गोष्ट ठरेल. आणि त्याचं अत्यंत साधं कारण उघड आहे–दादाचा अंगात मुरलेला कॉमेडीचा भन्नाट सेन्स ! मुळातच कॉमेडीमध्ये कथानक हा दुय्यम महत्त्वाचा भाग असतोय. खरं तर धंदा-व्यवसाय व प्रेक्षक या दुहेरी तरवारीखाली दुय्यम का होईना पण कथानक असायलाच लागतं हेच मुळी दादा कोंडके किंवा महंमूदसारख्या माणसांचं इथलं दुर्दैव आहे. 'आयला कथाफिथा आली की कॉमेडी मेलीच.' परवाच 'तुमचं आमचं'च्या शराब पार्टीत दादा टाळीचं वाक्य म्हणून गेला, तेच खरं.

'मग सबनीसांचे न तुझे संबंध बिघडले केव्हा न कसे ?'

'एकटा जीवच्या चित्रीकरणापासून हळूहळू तणाव सुरू झाले आणि सबनीसांनी त्यांच्या हऱ्या नाऱ्याचा मुहूर्त केला त्या दिवशी संपले.'

'पण त्यानंतरही ते विच्छातून काम करत होतेच की ?'

'हो. विच्छा मात्र त्यांनी शेवटपर्यंत सोडलं नाय.'

दादाच्या म्हणण्याप्रमाणं एकटा जीव सदाशिवची पटकथा सबनीसांनी बांधून दिली तीच मुळात तद्दन भोंगळ होती. जीव नसल्यासारखी. त्यांनी मन घालून ती लिहून दिलीच नव्हती. या सुमारास दादाकडे सध्याचं ऑफिसबिफिस नव्हतय म्हणून त्यानं दादरच्या रामनिवास हॉटेलात एक परमनंट खोलीच घेऊन टाकली होती. एकटा जीवच्या निमित्तानं सबनीस व दिग्दर्शक गोविंदराव कुळकर्णी या खोलीत डिस्कशनं वगैरे करत पण ती एकटा जीवबद्दल नसत. 'एकटा जीवच्या पडद्यावर आलेल्या पटकथेचं बरचसं श्रेय शरद तळवळकराला आहे.' दादा म्हणाला होता. 'लिहिलेली पट-

कथा वाचली न शरद म्हणायला लागला यात काही बूडच नाही. तूच बघ ना शेवटपर्यंत त्यांच्यातली पुष्पा भोसलेची कॅरेक्टर अधुरीच राहिली. तुम्हा टीकाकारांच्या नजरेत हे आलं नाही हे बरं झालं. एकूणच तुम्हा मंडळींना फारसं काही कळत नाही हे आमच्या पथ्यावरच पडतं.'

शरद तळवळकरांची सक्रीय मदत आणि अर्थातच बाबांचं कन्सलटेशन मिळून दादानं एकटा जीव जवळपास अर्धअधिक बदलून स्क्रिप्ट तयार केलं. पण तरीही क्लायमॅक्सबद्दल दादा संपूर्ण असमाधानी होताच.

'आयला, आपण म्हणत होतो की, पिक्चरचं टायटल एकटा जीव सदाशिव. मग सदाशिवला पोरगी शेवटी मिळते, हे कसं काय शक्य आहे? शिवाय सोंगाड्याचा शेवट गोड होता म्हणून म्हटलं, या पिक्चरचा एन्ड ट्रॅजिक करूया. पब्लिकला पण एक धक्का बसेल...'

'बाय द वे दादा, सदाशिवचा शेवट ट्रॅजिकच व्हायला हवा होता.'

'तर नक्कीच. म्हंजे माणसापरीस मेंढरं बरी, हे जे त्यातलं थिम सॉन्ग आहे, त्यालाही उठाव मिळाला असता की नाय? म्हंजे मानसं साली फसवीच असतात, शेवटपर्यंत साथ देत नाहीत, तेव्हा उषा चव्हाणशी माझं लग्न शेवटी होईलच कसं? आणखीन एक पॉईंट आहे बघ. पडद्यावर माझ्यावर पोरगी भाळते हेच जरा कठीण लागतंय बघ. अशा खुळ्या बावळ्यावर हिरॉईन भाळते, तेच्याशी पाट लावते वगैरे सारखं सारखं दाखवायचं म्हंजे पब्लिकला गिळायला थोडं कठीन हाय की नाय?'

'हे तू एकदम चॅप्लिनसारखं बोललास बघ. तोदेखील पोरगी भाळली हे दाखवायला अशीच काचकूच करायचा. म्हणून एकदा तसं त्यानं दाखवलं तेसुद्धा पोरगी आंधळी दाखवूनच.'

'चॅप्लिनचं सोड रे. तो ग्रेटच—आणि आपण कुठं चॅप्लिनला एवढं पाह्यलंय. पण मनाला पटत नाय हे.'

माझ्या अंदाजानं दादानं 'एकटा जीव सदाशिव'चा शेवट सुखान्त करण्यात एक माफ न करण्याजोगा कलात्मक गुन्हा केला. व्यावसायिक तडजोड हा समजण्यासारखा मुद्दा असला तरी, एकटा जीवची जर ट्रॅजेडी केली असती, तर तो चित्रपट खूपच उंच गेला असता. आपण काही कलात्मक चित्रपट काढतो असा डांगोरा दादानं कधीच पिटलेला नाही. फार मोठं कलात्मक त्याच्याकडून अपेक्षितही नाही. मूठभर टीकाकार त्याला आता काही चांगलं काढा असं म्हणतील, पण तमाम प्रेक्षकांची अपेक्षा दादाकडून निखळ करमणुकीचीच आहे आणि दादा ती जाणीवपूर्वक पुरी करत आलेला आहेच. तरीही व्यावसायिक सिनेमाला थोडंफार का होईना, पण लॉजिक असतंय; त्या लॉजिकच्या व स्वतःच्या इन्स्टींक्टच्याविरुद्ध दादा सहसा जात नाही. पण सदाशिवच्यावेळी हे सगळेच असं म्हणताहेत, तर आपलं कदाचित चुकत असेल, ह्या हिशेबानं दादानं चित्रपटाचा शेवट गोड केला, पण त्याची रुखरुख त्याला अजूनही जाणवते.

'तर सबनिसांचं काय सांगत होतास?'

'तू थांब रे. एकदम फ्लॅश फॉरवर्ड कशाला घेतोस. अजून सोंगाड्या कुठं पुरा झालाय.'

मला कधी कधी वाटतं की, दादाचे बोलपट हीच दादाची सर्वांत मोठी जिव्हाळ्याची गोष्ट. त्याबद्दल बोलतानाच हा फुलून, उभारून येतोय.

'या क्षणी मला 'तर तुमचं आमचं जमलं'बद्दल बोलावसं वाटतंय.'

'पिक्चर कसा वाटला?'

'इंटरव्हलपर्यंत सॉलीड मजा आली. मागाहून तुझी एकदमच स्टोरीबिरी चालू झाली. पण पिक्चर सॉलीड धंदा करणार. पुन्हा, दोन गाण्यांचं टेकिंग पण मस्त जमलंय.'

'धंद्याचं गणित कुणी सांगावं बाबा. बघू या, पहिल्या शोला पब्लिक काय म्हणतंय. पण एन.सी. थ्री मधलं हे पहिलंच रंगीन पिक्चर बरं का.'

'दादा हे इतर मंडळींना सांग.'

'साल्या तुला कळत नाही म्हणून तर तुला सांगतो.'

माझ्या नशिबानं माझे नं दादाचे संबंध निर्माता व टीकाकार असे नाहीत. आम्हा दोघांनाही एकमेकांना स्पेअर करायची जरूरी भासत नाही. तरी एनी वे ही तुमचं आमचं जमलंच्या प्रेस शो वेळची गोष्ट. त्या आधी पुन्हा दादाच्या एअरकण्डिशण्ड म्युझिक रूममध्ये जायला हवं.

'तर आयला काय सांगत होतो...' माझ्याजवळ सिग्रेट नाहीय् आणि दादाच्याजवळ पान नाही. फक्त बैठक मस्त जमलेली. जुळलेल्या तंबोऱ्यासारखी.

'एकदा स्टोरी डोक्यात घुसली न माझं डोकं दणादणा धावायला लागलं. हे एकाहून एक पंचेस सुचायला लागले. कास्ट मुक्रर व्हायचीच होती. तेव्हा जयश्री गडकरबाई फॉर्मात होती. ती म्हणाय् लागली प्रथम स्क्रिप्ट वाचायला द्या मग काम करते. आम्ही उडलोच. आयला जयश्री गडकरबाई काम करणार. तिला स्क्रिप्ट नेऊन दिलं. चार दिवसांनी बाईचा निरोप आला आपल्याला हे काम करायचं नाही. यात आपल्याला काही रोलच नाही. म्हणणं खरं होतं. भूमिका होती ती फक्त तांबडी मातीत दणकून आपटलेल्या मला. दोस्ताचं बत्ताशाचं काम करायला निळू तयार होताच पण हिरॉइन गवसेना. मग बाबांना सुचलं, म्हणाले, बघा एक उषा चव्हाण नावाची पोरगी आहे. नाचते झकास. दिसायलाही फाकडू आहे. फक्त फारशी प्रसिद्ध नाही. आयला रिस्क घ्यायचंच होतं, तर म्हटलं हे आणखीन घेऊया. बाबांची पैशाची ऑफर होतीच पण ठरवलं होतंनव्हतं, विच्छात कमवलेलं ह्याच्यात घालायचं आणि मुहूर्त केला. रत्नाप्पा कुंभारांनी क्लॅप मारली, बाबांनी कॅमेरा स्विच केला. शॉट माझ्यावर घेतला.'

दादा कोंडके पिक्चर काढतोय, तेदेखील स्वतः हिरो म्हणून अशी जेव्हा बोलबाला झाली तेव्हा बऱ्याचजणांनी या फंदात न पडण्याचा सल्ला दादाला दिला. बहुतेकांचं म्हणणं होतं, विच्छात मिळालेलं सर्व काही ह्याच्यात गमावून बसाल. ह्याच्याच जराशी आधी दादाची नं त्याच्या बायकोची फारकत झालेली होती. बहुतांशी पत्रकारांनी, प्रेमानीच का होईना पण ह्या सिनेधंद्यात, तेसुद्धा माध्यमाची काहीही माहिती नसताना निर्माता होणाऱ्या दादाला ह्या भलत्या फंदात न शिरण्याचाच सल्ला दिला. एका साप्ताहिकानं

तर 'दादा कोंडकेला वेड लागलं आहे काय ?' अशा मथळ्याखाली दादाला हाणलं होतं. पण दादाचा निश्चय डळमळला नाही. त्यानं विच्छाचे दणादणा प्रयोग हाणायला आणि पिक्चर बनवायला सुरुवात केली.

'पण साला पिक्चर बनत असतं ती झिंग काही औरच असते बघ. डोक्शात दुसरं काही घुसतच नाही. काय पंचेस् करावेत, शॉट असे घ्यावे. डिस्कशनं, चर्चा, नवे नवे सुचणारे डॉयलॉग, प्रसंग. एक सीन होता नाम्या बताश्याबरोबर प्रथमच तमाशाला जातोय त्याचा. लई डोकं खाजवलं तवा आलं. की साला स्टेजवर द्रोपदी वस्त्रहरणाचा प्रसंग चाललाय, तिचं पातळ संपूर्ण सुटायला आलंय तरी कृष्ण काही साडया घेऊन बोर्डावर येत नाहीय. कारण भगवान कृष्ण तर बेवडा मारून तर्र. मग नाम्या प्रेक्षकांतून धावत जातोय. गदा घेऊन कृष्णासकट सगळ्यांना हाणतोय... दुसरा मला मारून मुटकून मारुती बनवतात. कारण हादेखील कृष्णाचं काम करणारा बेवडा. साला अशोकवनात शितेचा शिण चाललाय. माझ्या बोटातली अंगठी पडतेय ती थेट रावणाच्या टकुऱ्यांत. भुभुत्कार करून मी झाडावरून खाली उडी मारतोय तर शेवटी झाडावरच पिक्चर पुरं झालं. लई ट्रायल केल्या. साला आपण तर पिक्चरवर खुष होतो. पण एकाही वितरकाच्या मनास येईना. ट्रायल करून दमलो – ट्रायलला पण काही कमी खर्च येतोय – पण डिस्ट्रीब्यूटर मिळेना. शेवटी ठरलं काय होईल ते होवो पिक्चर आपणच लावायचं – डिस्ट्रीब्यूशनमध्ये देखील आपणच उडी घ्यायची. पिक्चर पुण्याला प्रथम लावायचं ठरवलं न भानुविलासमध्ये लावलं. तीन आठवडयाचं बुकिंग केलं होतं. पहिला हप्ता तसा नरमच गेला. भानुविलासचे दामले म्हणायला लागले, काय पिक्चर चालू ठेवायचं का नाही: पण दुसऱ्या आठवडयापासून पब्लिक उसळायला लागलं. आपण निःश्वास टाकला... आयला श्रमाचं, पैशाचं, धडपडीचं पब्लिकनं चिज केलं होतं...

सोंगाडया मुंबैत झळकला तो तब्बल पुण्यातील १५ हप्त्यांची अखंडित लोकप्रियता पाठीशी ठेवूनच. आणि दादरमधल्या कोहीनूर थेट्रांत सोंगाडयानं इतिहास घडवला. गेल्या तब्बल तेवीस वर्षांत जिथं मराठी पिक्चरची रजतजयंती झालेली नव्हती – त्या कोहीनूर थेट्रांत दादाचा सोंगाडया तब्बल तेहतीस आठवडे हाऊस फुल्ल चालला. तेवीस वर्षांपूर्वी या थेट्रांत सिल्व्हरज्युबिली करणारा बोलपट होता...मीठभाकर...निर्माते दिग्दर्शक होते भालजी पेंढारकर. दादाला सिनेसृष्टीत आणणारे बाबा, सोंगाडयाचे जनक आणि दादाचे पितृतुल्य गुरु ! 'दादा पण सोंगाडयाच्या निमित्तानं शिवसेनीची निदर्शनं कसली झाली होती. थिइटेरसमोर मला आठवतं बाळासाहेब ठाकरेंनी आणि तू भाषणं बिषणं देखील हाणली होतीस ?'

जुन्या आठवणीत गुंतलेला दादा हसायला लागला... 'च्याआयला तुला आठवतं काय आठ वर्षांपूर्वीची भंकस ? पण एक लय स्टोरीच होती बघ, फर्मास फक्स्त पटकथा सबनिसांनी लिवली नव्हती,'

[ क्रमशः ]

☆ ☆ ☆

दुसऱ्या आवृत्तीच्या वाटेवर असलेली

# राजहंस प्रकाशने

- **सांगत्ये ऐका**
  हंसा वाडकर
  (तिसरी आवृत्ती)
- **टॉलस्टॉय - एक माणूस**
  सुमती देवस्थळे
- **श्रीग्रामायन**
  श्री. ग. माजगावकर
- **शतपावली**
  रवींद्र पिंगे
- **पुरंदऱ्यांची दौलत**
- **पुरंदऱ्यांची नौबत**
  ब. मो. पुरंदरे

☆ ☆